Dusty Sandals - Version 1.0

लूक सुवार्ता

*लूक सुवार्ता*

*लूक सुवार्ता*

# लूक सुवार्ता

## 1 1

**1:1** *"दुसऱ्या लोकांनी"*- मत्तय, मार्क, लूक आणि योहान हयांशिवाय, इतर लोकांनी देखील येशूंच्या जीवनाविषयी लिहिले होते. 2

**1:2** *"प्रत्यक्ष डोळयांनी पाहणाऱ्या"*- अर्थात प्रभु येशूंचे प्रारंभीचे शिष्य. तुलना – योहान 15:27; इब्री 2:3,4; 2पेत्र 1:16; 1योहान 1:1; प्रेषि 4:20. 3

**1:3** बारीक गोष्टींचा नीट उलगडा केल्याविना लूकाने, म्हाताऱ्या लोकांच्या दंतकथा लिहिलेल्या नाहीत अर्थात त्याने त्या घटनांचा सावधगिरीने शोध केला होता. घटना घडत असतांना तो जिवंत होता. त्याने प्रत्येक गोष्ट – घटना पारखली आणि तपासून घेतली. थियफीलाविषयी आपल्याला अधिक ठाऊक नाही. त्याचा नांवाचा अर्थ, "जो परमेश्वरांवर प्रेम करितो" असा आहे. 4

**1:4** *"कळावे – निश्चिती व्हावी"*- देवबापाने लूकाला हे सत्य लिहावयास लावले कारण तो परमेश्वरांचा व लूकाचाहि विशेष हेतू होता. कोणालाहि संशय होऊ नये कोणीहि अनिश्चितता बाळगू नये म्हणून, येशूंचे जीवन, मरण, पुनरूत्थान त्यांची महत्कृत्यें व उपदेश ही सर्व प्रेषितांनी आणि प्रामाणिक इतिहासकारांनी लिहून ठेवलेली आहेत त्यांच्याद्वारे ती आपल्याला प्राप्त झालेली आहेत. योहान 20:31; 21:24; 2पेत्र 1:16. 5

**1:5** *"हेरोद" - मत्त 2:1. "अबीयाच्या गटांत"*- इस्त्राएलाचा राजा दावीद हयाने, जखऱ्याच्या एक हजार वर्षापूर्वी, याजकांचे विभाजन 24 गटांत केले होते. त्यापैकी अबीया हा एक गटाचा संरक्षक किंवा अधिकारी होता. (1इति 24:10; नहेम्या 12:12) अहरोन हा इस्त्राएलांचा सर्वप्रथम याजक होता (निर्ग 28:1-3). 6

**1:6** *"नीतिमान-सात्विक"*- म्हणजे प्रामाणिकपणे जीवन जगणारे पण त्यांच्याजवळ, त्यांच्याठायी वाईट स्वभाव नव्हता, अशातली ही बाब नाही. (मत्त 7:11 चे नोट्स). 7

**1:7** वचन 25; उत्प 16:2; 25:21; 30:23; 1शमु 1:2-5. 8,9

**1:8,9** याजक प्रत्येक समयी याजकाचे कार्यच/सेवाच करीत राहत नसे, घरी राहून घरातील कौटुंबिक जबाबदाऱ्या व कर्तव्येंहि ते पार पाडित असत. "धूप जाळण्याचे कार्य" - निर्ग 30:1, 34-36. 11

**1:11** *"प्रभूंचा देवदूत"*- मत्त 1:20; उत्प 16:7 वरचे नोट्स. 12

**1:12** यहूदा 6:22,23; 13:22 शी तुलना. 13

**1:13** *"भिऊ नको"*- जो निर्दोष ठरविला गेला आहे, ज्याला येशूंचे सत्य आणि पवित्रता मिळालेली आहे त्या व्यक्तिला कोणत्याहि प्रकारचे भय नसावे. ज्याला क्षमा प्राप्त झालेली नाही, त्याला भिण्याची अनेक कारणें

आहेत. "योहान हे नाव इब्री भाषेतून आले आहे आणि त्याचा अर्थ आहे, "याहवे कृपाळू कृपा करणारे आहेत." **15**

**1:15** योहानाची वैशिष्टयें मत्तय 11:7-14 हयांत आढळतात. त्याने द्राक्षारसाला कधीच स्पर्श केला नाही हयावरून कळते किंवा अंदाज येतो की तो जीवनभर परमेश्वराचा पवित्रजण म्हणूनच राहिला असेल. गणना 6:1-4 पहा. संपूर्ण बायबलमध्ये योहानच एक असा व्यक्ती होता जो जन्मापासूनच आत्म्याने परिपूर्ण/भरलेला होता. त्याच्यासाठी परमेश्वरांजवळ एक वैशिष्टयपूर्ण हमखास असा अभिप्राय होता आणि त्याच हेतू प्रित्यर्थ त्याला तयार व सिद्ध केले जात होते. पवित्र आत्म्याची भरपूरी/विपुलता - प्रेषि 2:4; इफि 5:18 चे नोट्स. **16**

**1:16** पहा 3:4-6; मत्त 3:1-6. **17**

**1:17** *"एलीया"*- मत्त 11:14; 17:10-13. मला 4:5,6. **18**

**1:18** हे शब्द 'अविश्वास' दाखवितात (वचन 20). नीतिमान व सात्विक मनुष्य देखील शंका, संशय आणि अविश्वासाची लढत असतो हे हयावरून सिद्ध होते. पहा उत्प 17:17; 18:9-12; गणना 20:12; 1शमु 27:1; मत्त 14:31; 17:17; योहान 20:25. हयावरून आपण शिकतो की ज्यावेळी परमेश्वर काही बोलतात किंवा सांगतात, जेव्हां ते मनुष्यांकडे आपला संदेश पाठवितात तेव्हां ते शंभर टक्के सत्य व खरे असेलच, हयावर शंका करण्याची काही एक गरज नाही. **19**

**1:19** जखऱ्याला "गब्रीएलाचे" नाव खचितच ठाऊक असावे. दानी 8:16; 9:21. **20**

**1:20** ही संशय करण्याची शिक्षा होती आणि त्याचबरोबर गब्रीएल सत्य बोलत होता हयाचे एक प्रमाण व चिन्ह होते. **21**

**1:21** धूप जाळण्याचे कार्य कांही समयासाठीचेच असायचे. हयानंतर याजक बाहेर येऊन लोकांना आशीर्वाद देत असे (गणना 6:24-26). **25**

**1:25** इस्त्राएलांत वांझ असणे लज्जास्पद बाब होती - (वचन 7). परमेश्वरांची इच्छा अशी नव्हती की तिने तसेच राहावे. कांही प्रसिद्ध स्त्रिया वांझ होत्या - उत्प 16:2; 25:21; 30:23; 1शमु 1:2,5. **26**

**1:26** *"सहा महिने"*- अलीशिबा गर्भवती होऊन तिला सहा महिने झाले होते तो समय. **27**

**1:27** हया सत्यांवरून जाहिर होते की येशू कुमारीपासून जन्मले होते, त्यामुळे यश 7:14 चे वचन पूर्ण झाले होते. मत्त 1:18-23 नोट्स. "दावीदाच्या वंशातील" - मत्त 1:1. **28**

**1:28** परमेश्वरांनी मरीयेची निवड करून तिला सन्मान दिला की तिच्याद्वारे येशूंनी (तारणहार) जगात यावे - प्रियांनो, हे परमेश्वरीय कृपेचे एक चिन्ह होते. उत्प 6:8; प्रेषि 7:46; "उल्हास व आनंद कर" - अर्थात प्रसन्न रहा, आनंदी रहा. **29**

**1:29** मरीया पेचांत पडली आणि गोंधळली, तिला कांही समजले नाही की त्याचा अर्थ काय आहे आणि तिच्याकडून त्याला काय अपेक्षा आहेत. परमेश्वरांचे उत्तम आणि महान कार्य पाहून ज्यावेळी लोकांनी आनंदी व्हावयाचे असते त्यावेळी ते गोंधळून अस्वस्थ होतात. **31**

**1:31** मत्त 1:1,31. **32**

**1:32** *"महान" - जिवंत सर्वसामर्थी, सत्य परमेश्वरांचे हे ते नांव आहे, ज्याविषयी आपण बायबलमध्ये वारंवार*

*वाचतो. "सर्वसामर्थी परमेश्वरांचा पुत्र" - मत्त 1:18; 3:17; योहान 3:16; "दावीदाच्या सिंहासनावर"*- 2शमु 7:11-16; स्तो 89:3,4; मत्त 1:1. 33

**1:33** स्तो 45:6; 89:3,4; यश 9:6,7; यिर्म 33:14-18; दानी 2:44; 7:14,27; मीका 4:7. "याकोबाच्या घराण्यावर" - याकोबापासूनच इस्त्राएल देशाचा प्रारंभ झाला होता. (इस्त्राएल – उत्प 25-50). 34

**1:34** *"संबंध"*- अर्थात मरीयेला असे म्हणावयाचे होते तिचा यौन संबंध कोणत्याहि पुरूषाशी झालेला नव्हता. 35

**1:35** मत्त 1:18 चे नोट्स. देशोदेशीच्या दंतकथा, पौराणिक कथा ज्यामध्ये देवता/देव आणि पार्थिव स्त्रीचे जसे विवाह (गोष्टींमध्ये) आपण वाचतो, तशाप्रकारचा हा विवाह संबंध नव्हता. अदृश्य परमेश्वरीय आत्म्याने मरीयेच्या शरीरांत पुत्राचे शरीर आणि मानवी स्वभाव उत्पन्न केला. 37

**1:37** एखादया म्हाताऱ्या, वांझ स्त्रीला किंवा कुमारीला गर्भधारणेची आणि बाळ उत्पन्न करण्याची क्षमता देणे हे महासामर्थी परमेश्वरांकरिता अशक्य किंवा कठीण गोष्ट नाही; त्यांच्यासाठी कांहीहि असंभव नाहीच मुळी. लोक ज्याला आश्चर्यकर्म किंवा चमत्कार म्हणतात, ती परमेश्वरांकरिता, त्यांनी केलेल्या इतर कार्याइतकीच स्वाभाविक व सोपी गोष्ट आहे. उत्प 18:14; ईयोब 42:2; यश 40:29; 50:2; 51:9; यिर्म 32:17,27; मत्त 19:26; रोम 4:21. 38

**1:38** "माझ्याकरिता हे माझ्या कल्याणाचेच असेल" अशी भूमिका घेऊन आणि विश्वास बाळगून मरीयेने तिच्या स्वतःकरिता परमेश्वरांची इच्छा पूर्णपणे स्वीकारून घेतली. आपणहि मरीयपासून शिकावे – तुलना रोम 12:1,2. 41

**1:41** हया गोष्टीचे अवलोकन करा की हया सर्व घटनांमध्ये परमेश्वरांचा आत्मा कशाप्रकारे सर्व करीत होता (वचन 15,35,67). त्यांच्याविषयी सांगितलेल्या गोष्टी आणि घटना, हयाविषयीची चिन्हें होती की पुढे परमेश्वर हया पृथ्वीवर काहीतरी विशेष आणि अद्भुत कार्य करणार होते. 42

**1:42** वचन 28 - इतिहासांत केवळ आणि फक्त एकाच स्त्रीला येशूंची आई व्हावयाचे होते आणि ती स्त्री होती मरीया. 11:27,28 आणि शब्द "धन्य-आशीर्वादीत" वरचे नोट्स पहा – उत्प 12:3; गणना 6:22-27; स्तो 1:1 पहा. परमेश्वरांनी अब्राहामाशी करार केला होता आणि तो करार अब्राहामाच्या वंशजासाठी आणि जगाच्या दुसऱ्या लोकांसाठीहि पूर्ण करावयाचा होता. 43

**1:43** *"आईने" - येशू ख्ृरिस्त दैहिक रूपाने मरीयेद्वारे हया पृथ्वीवर आले आणि केवळ हयाचप्रकारे ती येशूंची आई होती. देवाची उत्पत्ति कशी झालीच नाही कारण ते सदैव युगानुयुग राहणारे देव आहेत. अशा सदाकाळ असणाऱ्या परमेश्वरांची आई एखादी (कोणतीहि) स्त्री असू शकतच नाही म्हणून मरीयेला परमेश्वरांची आई म्हणजे योग्य नाही. "माझ्या प्रभूंच्या"*- केवळ परमेश्वरांच्या आत्म्याच्या साहाय्यानेच, स्फूर्तिने व प्रेरणेने ओतप्रोत होऊन अलीशिबा, येशूंना 'माझे प्रभु' म्हणू शकली होती. तुलना स्त्रो.2:11; 110:1; मत्त 22:41-45; प्रेषि 2:36; फिलि 2:10,11. 45

**1:45** वचन 38,42. 46-55

**1:46-55** मरीयेठायी सौदर्यपूर्ण काव्यात्मक भाषाशैली होती. आत्मिक सत्यावरची तिची भक्कम पकड आणि परमेश्वरीय प्रेमाविषयीचे तिचे विपुल ज्ञान, ही सर्व मरीयेची क्षमता, पात्रता आणि लायकी ठरवितात. हया

सर्व वैशिष्टयांवरून हेच प्रमाणित होते की केवळ मरीयाच येशू ख्‍्रिस्तांची आई होण्याच्या योग्यतेची होती – 1शमु 2:1-10; हन्नाशी तुलना. **46**

**1:46** इतर सुवार्तेच्या तुलनेत, लूकाच्या सुवार्तेत स्तुतिचे अत्याधिक संदर्भ आढळतात. स्तो 33:1-3 हयावरचे स्तुतिचे नोट्स. **47**

**1:47** येथे पहा, मरीया परमेश्वरांना आपला तारणारा असे उल्लेखिते. ख्‍्रिस्त येशूंची आई होण्याचा आदर मिळाला असला तरी तिला नीट ठाऊक होते की दुसऱ्यांना जशी तारणाऱ्याची, मुक्तिदात्याची गरज आहे तशी तिलाहि आहे. प्रियांनो, "तारणारा" हया शब्दाचा पहिला उपयोग, नव्या करारांत हयाच ठिकाणी झाल्याचे आढळते. हया शब्दाचा अर्थ आहे, सोडविणारा, सुटका करणारा – तो जो आपल्या लोकांना पापांपासून सोडवितो आणि त्यांचे रक्षण करून त्यांना राखून ठेवितो. **48**

**1:48** वचन 28,30,42. **49**

**1:49** स्तो 71:19. परमेश्वरांची पवित्रता – लेवी 20:7; यश 6:3. **50**

**1:50** उत्प 20:11; स्तो 34:11-14; 111:10; नीति 1:7. **51**

**1:51** स्तो 98:1; 40:10. परमेश्वर आत्मा आहेत (योहान 4:24) आपल्यासारखे शारीरिक हात नसले तरी, काव्यात्मक पद्धतीने परमेश्वरांचे सामर्थ्य दाखविण्याची ही पद्धत आहे. गर्विष्ठ लोकांची प्रभु – परमेश्वर कशी दाणादाण करितात ते पहा – निर्ग 18:11; 2शमु 22:28; स्तो 31:23; 94:2; 49:16; याकोब 4:6. **52**

**1:52** 1शमु 2:7,8; मत्त 23:12. **53**

**1:53** 1शमु 2:5; स्तो 107:9; 81:10,16; मत्त 5:6. **55**

**1:55** बोलणे, प्रार्थना करणे आणि बायबल अभ्यासाची सहभागिता. **59**

**1:59** *"सुंता"*- नोट्स : उत्प 17:9-14. **60**

**1:60** वचन 13. **64**

**1:64** अविश्वासाने जो तोंड बंद करून ठेवले होते, ते विश्वासाने आणि आज्ञा पालनाने उघडिले. **66**

**1:66** वचन 51; उत्प 39:2; प्रेषि 11:21. **67**

**1:67** वचन 15,35,41. मत्तय आणि मार्काच्या सुवार्तेत, पवित्र आत्म्यावर जितकी वचनें आहेत ती एकटया लूकाच्या सुवार्तेत आढळतात. पवित्रात्म्याच्या स्फूर्तिने जखऱ्या भविष्यांतील त्या घटनांविषयी सांगतो ज्या आजपर्यंत घडलेल्या नव्हत्या. उत्प 20:7; गणना 11:25 च्या भविष्यवाणीचे नोट्स. **68**

**1:68** *"मुक्त केले आहे"*- मत्त 20:28; स्तो 78:35; रोम 9:24; 1करिं 1:30; गल 4:5; इफि 1:7; कल 1:14; तीताला 2:14; इब्री 9:12; 1पेत्र 1:18; प्रकटी 5:9. **69**

**1:69** 1शमु 2:1 हयांत दावीदाच्या घराण्यावर वचन 32 आणि मत्त 1:1. **70**

**1:70** उदाहरणासाठी यश 9:6,7; यिर्म 23:5. **71**

**1:71** जुन्या करारांतील भाषेसारखे आहे. स्तो 3:7 हयांत शत्रूवरचे नोट्स. दुसऱ्या लोकांच्या शत्रूंपेक्षा, परमेश्वरांच्या लोकांच्या शत्रूंची संख्या जास्त असते. इफि 6:10-12; 1पेत्र 5:8. हया सर्व गोष्टींपासून येशू, आपल्या लोकांचे रक्षण करितात, त्यांना वाचवितात, त्यांचा सांभाळ करितात. **72**

**1:72** उत्प 22:16-18; स्तो 105:8,9; 106:45; यहे 16:60; मीका 7:20. 74,75

**1:74,75** परमेश्वरांद्वारे मुक्त केले जाण्याचा हाच मुख्य हेतू असतो. परमेश्वर अशा पवित्र लोकांच्या शोधांत असतात जे संपूर्ण मनाने, अंतःकरणाच्या शुद्धतेने, नीतीने, निर्भय राहून जीवनभर त्यांची सेवा करीत राहतील. प्रभु येशू ख्रिस्तांत परमेश्वरांनी आपल्यासाठी सर्व प्रबंध करून दिलेला आहे. तुलना 2पेत्र 1:3,4. 76

**1:76** वचन 32 हयांत ख्रिस्तांसाठी जे कांही म्हटले गेले आहे, त्याची तुलना शब्द 'संदेष्टा' हयाशी करा. योहानाची सेवा कोणती व कशाप्रकारची होती ते पहा – वचन 14-17; मत्त 3:1-6. 77

**1:77** पापांच्या क्षमेशिवाय, मुक्तीचा प्रश्नच उद्भवत नाही आणि मुक्तिविषयीचे खरे ज्ञान देखील मिळू शकत नाही. पापांची क्षमा – नोट्स मत्त 6:12; 9:5-7; 12:31; 18:23-25. 78

**1:78** पापांची क्षमा मनुष्य कमवू शकत नाही आणि ती कमविण्याची त्याची लायकीहि नाही. पापांची क्षमा फक्त ईश्वरी कृपेनेच मिळविता येते. हयाठिकाणी येशूंची तुलना आकाशातील सूर्याशी केली आहे; एका दुसऱ्या ठिकाणी तारे आणि प्रकाशाशी केलेली आहे. गणना 24:17; यश 9:2; 60:1-3; मला 4:2; योहान 8:12; 2पेत्र 1:19; प्रकटी 22:16. लोकांना वाचविण्याकरिता येशू स्वर्गातून आले – योहान 3:13; 6:38; 8:23. 79

**1:79** यश 9:2; 59:9,10; मत्त 4:16. जेव्हां लोकांजवळ प्रकाश नव्हता, आशा नव्हती, मृत्यूपासून वाचण्याचा उपाय नव्हता, तेव्हां येशू आशा आणि प्रकाश होऊन अवतरले. सुवार्तेच्या संगीताचा मधुर स्वर "शांति" होय – 2:14; योहान 14:27; 16:33; प्रेषि 10:36; रोम 5:1; 14:17; 15:13,33; इफि 2:14. परमेश्वरांच्या आत्म्याच्या प्रेरणेने जखऱ्या ख्रिस्त येशूंचे जीवन आणि त्यांच्या कार्याचे दोन अद्भुत परिणाम आपल्यासमोर ठेवितो – अर्थात आत्मिक प्रकाश आणि शांति. 80

**1:80** 30 वर्षांचा होईपर्यंत योहान एकटा होता, तो दुसऱ्या लोकांसारखा नव्हता. (मत्त 3:4). त्याहून श्रेष्ठ कोणीहि नव्हता (मत्त 11:11). ज्याप्रमाणे योहान आत्म्यांत भक्कम बळवंत होता त्याचप्रमाणे प्रभु येशू ख्रिस्तांचा प्रत्येक शिष्य होऊ शकतो, इफि 3:16.

## 2 1

**2:1** जे रोमन साम्राज्य त्याच्या शासन काळांत प्रचंड सामर्थी होते, त्याच साम्राज्याचा औगुस्त हा राजा होता. त्या काळी या साम्राज्याचा उल्लेख

*"संपूर्ण दुनिया" किंवा "संपूर्ण जग" असा केला जात होता. "जनगणनेचे काम"*- अर्थात जनगणनेसाठी आपले नांव नोंदविणे किंवा दाखल करणे. 4

**2:4** मत्त 3:1-6 पहा. इस्त्राएल देशाला सोडविणाऱ्याचा जन्म बेथलेहेमात व्हावयाचा होता. (मीका 5:2). परमेश्वराने त्यासाठी रोमी साम्राज्याच्या आज्ञेचा उपयोग केला म्हणजे त्याद्वारे योसेफ आणि मरीया यांना बेथलेहेमापर्यंत येता यावे किंवा आणले जावे जेथे बाळ येशूंचा जन्म होणार होता. प्रियांनो, आपली योजना साकार आणि पूर्ण करण्याकरिता परमेश्वर सर्व परिस्थितींचा उपयोग करू शकतो .

*"बेथलेहेम"*- एक इब्री शब्द आहे ज्याचा अर्थ आहे "भाकरीचे घर". "जे जीवनाची भाकर" आहेत त्या प्रभु येशूंचा जन्म तेथेच झाला, (6:35 योहान) दावीद – 1:27,32,69; 2:4,11 आणि मत्त 1:1 चे नोट्स. याठिकाणी

"दावीदाच्या" या शब्दावर दिलेला भर पाहा. 5

**2:5** 1:27,35; मत्त 1:18. 7

**2:7** ही 'गव्हाणी' स्वर्गाच्या महाराजाला विश्रांती घेण्याची पहिली जागा होती, स्वर्गाचा श्रेष्ठतम बादशाहा सर्वप्रथम गव्हाणीत विश्रात करीत होता; ही त्यांची आणि परमेश्वर बापाचीच निवड होती. फिलि 2:5-8; मत्त 11:29 यात त्यांचे जे चरित्र प्रगट होते ते पहा. येशू ख्रिस्त आपले आदर्श आहेत आणि आपला व्यवहार त्यांच्यासारखाच असावा. बेथेलेहेम एक लहानसे गांव होते. त्याठिकाणी प्रवाशांना थांबणाच्या काही जागा होत्या आणि जनगणनेमुळे लोकांची गर्दी झालेली असावी. परंतु येशूंच्या संपूर्ण जीवनकाळांत अनेकवेळा त्यांना जागा मिळाली नव्हती - लूक 4:29; मत्त 2:13; 8:20; योहान 1:11; 19:15. 8

**2:8** या पृथ्वीवर आपल्या एकुलत्या एका पुत्राच्या जन्माची घोषणा करतांना (जी त्यासमयापर्यंत इतिहासातील एक प्रमुख आणि मोठी घटना होती), त्यांने धार्मिक पुढाऱ्यांची काही एक पर्वा केली नाही. शिक्षीत, श्रीमंत लोकांवर ही गोष्ट प्रगट न करिता परमेश्वरांनी गरीब आणि नम्र मेंढपाळांवर हे रहस्य प्रगट केले. तुलना -1करिं 1:26-28; यश 57:15; 66:2. परमेश्वरांची पद्धत आपल्या (माणसांच्या) पद्धतीपेक्षा आगळी-वेगळी आहे - यश 55:8,9. येशूंचा जन्म मेंढपाळ होण्याकरिता झालेला होता (योहान 10:11; इब्री 13:10). म्हणूनच सर्वप्रथम मेंढपाळांना ही बातमी मिळाली ते एकप्रकारे योग्यच होते. 9

**2:9** *"प्रभूंचा एक परमेश्वरदूत" - मत्त 1:20 चे नोट्स. "एक दिव्य प्रकाश - मोठे तेज"-* ख्रिस्त येशूंठायी परमेश्वरांचे गौरव आणि वैभव जाहिर होणार होते - (इब्री 1:3; योहान 1:14). कृपेने भरलेल्या सुवार्तेद्वारे ते प्रगट होणार होते - 1तीम 1:11. त्यांच्या जन्माच्या घोषणा समयी, हे कसे अशक्य होते की मोठे तेज चमकूं नये? एका मोठया घटनेचा समाचार/वर्तमान, एका दिव्य प्रकाशाद्वांरे दिला जाणार होता. 10

**2:10** *"सुवार्ता"-* या जगातील सर्वश्रेष्ठ बातमी/खबर परमेश्वरदूत घेऊन येतात. हजारों वर्षापासून गुन्हें-अपराध-पाप दुःख आणि जगातील तारणाऱ्याच्या प्रतिक्षेनंतर परमेश्वरदूत तेथे आले होते; आणि शेवटी, मोठया आनंदाचे स्त्रोत उगमस्थान आणि अनंतकाळाच्या आनंदाचे दाता तारक यांचा जन्म होतो. विश्वासू कांही अंशी आताहि या आनंदाचे सुख भोगित आहेत परंतु भविष्यकाळी ते त्यापेक्षा अधिक आनंद उपभोगितील (योहान 15:11; 17:13; रोम 14:17; 15:13; फिलि 4:4; 1पेत्र 1:8). 11

**2:11** मत्त 1:21; प्रेषि 4:12; 1योहान 4:14. नवीन करारांत येशूंना 16 दा मुक्ति देणारा असे म्हटले आहे (1:47 पहा). मत्त 1:1 चे नोट्स .

*"प्रभु"-* येशूंना परमेश्वरदूत काय म्हणून बोलावितात पहा - 1:43; मत्त 22:41-45; प्रेषि 2:36; 1करिं 8:6; फिलि 2:10,11; इफि 4:5. ग्रीक भाषेत शब्द हाच आह े

*"प्रभु"-* नवीन करारांत यहोवा शब्दाचे भाषांतर प्रभु असे केले जाते - निर्ग 3:14,15 चे नोट्स. नवीन करारांत येशूंना प्रभु (कुरीयोस) अनेकदा म्हटलेले आहे. ते सर्वाचे स्वामी म्हणजे प्रभु आहेत - प्रकटी 19:16. बायबलचा शेवट त्यांच्याच नावांने होतो - प्रकटी 22:21. खाली दिलेली वचनें सिद्ध करतात की याहवे परमेश्वर जो देहरूपांत आला तो येशूच आहे - मत्त 3:3; 23:37; योहान 8:24,25,58; 10:11; 12:41; प्रेषि 2:21; रोम 10:9,10,13; 1करिं 1:31; 2:8; 10:4; इफि 4:10; फिलि 2:10,11; तीताला 2:13; इब्री 1:10-12; यहूदा 5; प्रकटी

19:16. येशू परमेश्वर आहेत हे दाखविणारी वचने - फिलि 2:6. जुन्या करारांत उत्प 16:7; निर्ग 3:14; स्तो 23:1; 24:7-10; 96:10-13; यश 6:1; 9:6; जखऱ्या 12:10. **13**

**2:13** या वचनांत ही घटना जितकी स्वर्गासाठी अत्यंत महत्वाची व गोड आहे ती आमच्यासाठी तितकीच प्रिय असावी आणि त्याविषयी आमच्या अंतःकरणात स्तुति निर्माण व्हावयास हवी. **14**

**2:14** परमेश्वराचा गौरव हा कोणत्याही गोष्टीतील एक सर्वात मोठा हेतू असू शकतो (स्तो 19:1; 29:1,2; यश 42:8; 43:7; 1करिं 10:31; प्रकटी 4:11), येशूंच्या येण्याचा हेतू देखील (योहान 17:4) हाच होता. आपणाला हे ठामपणे कळावे की येशूंच्या जन्माद्वारे परमेश्वराचा मोठा गौरव झाला, त्यांना मोठा आदर मिळाला. येथे क्रम पाहा - सर्वप्रथम परमेश्वर, त्यानंतर लोक मनुष्यांत मेळ आणि शांति (शत्रूत्वाचा अंत) आणल्यामुळे येशूंनी परमेश्वराला गौरव दिला.

*"मनुष्यांत शांति व मेळ"*- ग्रीक भाषेचे भाषांतर वेगवेगळया प्रकारे केलेले आहे जसे - त्या लोकांच्यामध्ये, ज्यांच्यावर ते प्रसन्न आहेत किंवा त्या लोकांसाठी ज्यांच्यावर परमेश्वराची कृपा झालेली आहे. एक गोष्ट अगदी स्पष्ट आहे की जे लोक येशूंना आपला स्वामी-प्रभु-तारक (1:79) म्हणून स्वीकार करितात त्यांचाच मेळ परमेश्वराशी होतो; अशा लोकांना तारण प्राप्त तर होतेच पण त्यांना परमेश्वरीय पक्ष देखील प्राप्त होतो. येशू जन्माची घोषणा सर्वप्रथम परमेश्वरदूतांनी आणि नंतर मेंढपाळांनी केली होती. **20**

**2:20** लूकाची सुवार्ता परमेश्वराच्या स्तुतीने ओतप्रोत आहे - 1:46,64; 2:13,28; 5:25,26; 7:16; 13:13; 17:15,18; 18:43; 19:37; 23:47; 24:53; स्तो 33:1-3. मेंढपाळ प्रभुची स्तुति कां करितात त्याचे कारण पाहा, प्रभुने म्हटले ते होईलच, ही गोष्ट निश्चितच खरी आहे (स्तो 31:5; तीताला 1:2). **21**

**2:21** *"सुंता"*- 17:9-14. अब्राहामाच्या वंशाची आणि इस्त्राएल देशाची असल्यामुळे मरीया जिच्याद्वारे येशूंनी जन्म घेतला होता, येशूंची सुंता होणे ही आवश्यक बाब होती. **22**

**2:22** लेवी 12:2-8. **23**

**2:23** निर्ग 13:2,12,15; गणना 3:13. **24**

**2:24** यज्ञ किंवा ते केलेले बलिदान येशूंसाठीचे नव्हते, परंतु ते मरीयेसाठीचे होते. यावरून स्पष्ट कळते की ती आणि योसेफ श्रीमंत नव्हते त्यामुळे महागडे बलिदान देण्याची त्यांची ऐपत नव्हती - पहा लेवी 12:8. **25**

**2:25** ज्या ख्रिस्तांची प्रतिज्ञा/वचन दिले गेले होते त्याच मशीहाची तो वाट पाहात होता. तुलना यशा 40:1,2 .

*"पवित्र आत्मा"*- वचन 26,27; 1:15,35,41,67. **27**

**2:27** वचन 22-24. **29**

**2:29** वचन 26. **30**

**2:30** त्याला कळले होते की जुन्या करारांत ज्यांचा उल्लेख केला होता, तेच हे येशू आहेत जे वाचविणारे आहेत, तेच मुक्ति देणार होते. **32**

**2:32** शिमोनाला ठाऊक होते की ख्रिस्त इस्त्राएल आणि इतर सर्व देशांना ज्ञान देणार होते - पहा यश 42:6; 49:6. **33**

**2:33** येशू ख्रिस्तांचा जन्म कुमारीद्वारे, पवित्र आत्म्याच्या साहाय्याने झाला होता (1:34,35). योसेफाची यांत कोणतीच मदत किंवा भूमिका नव्हती, परंतु कायदेशीर पद्धतीने/रूपाने तोच येशूंचा पिता होता (3:23). **34**

**2:34** शिमोनाने याठिकाणी एक भविष्यवाणी केली जी नंतर पूर्ण झाली. गर्विष्ठ, कपटी आणि विश्वास न करणारे या सर्वांसाठी येशू ठेचाळण्याचे कारण आहेत - मत्त 21:42-44; रोम 9:32,33; 1पेत्र 2:7,8 ते सर्व हरले, त्यांचा पराभव झाला कारण त्यांनी परमेश्वरांच्या पुत्राला ठार केले आणि परमेश्वराचा क्रोध त्यांच्यावर भडकला. (1थेस्स 2:14-16). परंतु येशूंनी नम्र प्रामाणिक आणि विश्वास ठेवणाऱ्या लोकांना आध्यात्मिक उंची गाठण्यास मदत केली, त्यांना उंच केले, स्वर्गापर्यंत उंच प्रियांनो, 'येशूंचे काय करावे?' या एकाच गोष्टीवर एखादया देशाच्या लोकांचे भविष्य अवलंबून आहे. पृथ्वीवर असतांना लोक येशूंविरूद्ध कसे बोलत असत. मत्त 9:3,11,34; 12:24; 13:54-57; 26:65,66; 27:63; योहान 8:48. **35**

**2:35** लोक येशूंशी कसे वागत असत, त्यांच्या कार्या आणि शब्दांप्रति कशी प्रतिक्रिया व्यक्त करीत असत, या सर्व गोष्टींवरून त्यांच्या अंतःकरणाचे विचार उघडकीस आले. शिमोनावर ही गोष्ट प्रगट झाली की येशू दुःख सहन करतील आणि त्यामुळे मरीयेलाही पीडा-वेदना होईल; तिच्या समोर येशू आरोपी म्हणून तिरस्कृत केले जातील, त्यांची निर्भत्सना-तिरस्कार होईल व त्यांना दंड दिला जाईल. **36**

**2:36** दुसऱ्या आणखी स्त्रिया होत्या ज्यांनी भविष्यवाणी केली होती. निर्ग 15:20; शास्ते 4:4; 2राजे 22:14; प्रेषि 21:9. **37**

**2:37** या वचनांत म्हाताऱ्या स्त्रियांसाठी एक नमूना आहे - (पुरूषांसाठीचाहि). परमेश्वराची सेवा करण्यासाठी ही गोष्ट आवश्यक नाही की शरीर खूपच प्रबळ (सशक्त-मजबूत) असावे आणि सर्व ठिकाणी जाऊन जाऊन सुवार्ता गाजविली जावी.

*"उपास"*- मत्त 6:16. **38**

**2:38** या दोन गोष्टींत हन्ना आमच्यासाठी एक आदर्श आहे .

*"स्तुति"*- लेवी 7:12,13; स्तो 7:17; 50:14,15; 56:12; इफि 5:20; 1थेस्स 5:18.

*"यरूशलेमेच्या मुक्तीची"*- यशा 40:2; 52:9; 59:20,21. **39**

**2:39** वचन 22-24 लूक मिसर देशाच्या यात्रेविषयी काही बोलत नाही (मत्त 2:13-23). सुवार्ता लेखकांनी त्यांना ठाऊक असलेल्या सर्वच सत्य गोष्टीं समाविष्ट केल्या नाहीत (मार्क 4:1-20). हे शक्य आहे की मिसर देशांत जाण्यापूर्वी ते येशूंना नासरेथ येथे घेऊन गेले आणि येशूंबरोबरच बेथलेहेमास परतले. **40**

**2:40** वचन 52 सर्व मनुष्यांप्रमाणे येशूंचीही वाढ झाली, पण ते निष्कलंक राहिले (इब्री 4:15; 1पेत्र 2:22). त्यांच्याठायी अद्भुत ज्ञान होते ते आपण वचन 46-47 यांत पाहातो. केवळ परमेश्वरीय कृपेने ते विपुल झाले नाहीत तर चांगुलपणा आणि पावित्र्य यांत प्रबळ होत गेले, वाईट व दुष्टाईपासून अलिप्त राहिले, (वाचले) जगिक गोष्टीत वावरतांना हीच गोष्ट सर्वश्रेष्ठ आहे; हे समजून घ्यावे. **41**

**2:41** *"वल्हांडण"*- निर्ग 23:14-17; लेवी 23:4. **42**

**2:42** अनु 16:16. **46**

**2:46** शिक्षक म्हणजे धार्मिक शिक्षक आणि गुरू. **47**

**2:47** येशूंचे शब्द आणि कार्य पाहिल्यावर हीच प्रतिक्रिया होती, आश्चर्याने थक्क होणे - मत्त 8:28; 12:23; मार्क 1:27; 2:12; 9:15; 10:32. **48**

**2:48** 'तुझे वडील' - म्हणजे कायदेशीरपणे असलेला पिता (वचन 33). **49**

**2:49** येशूंचे तात्पर्य परमेश्वर बापांशी होते. फक्त बारा वर्षाचे असूनही येशूंना बापाशी असलेले अद्वितीय नाते ठाऊक होते. या उत्तरावरून कळते की मरीयेला हे ठाऊक असावयास हवे होते की येशूंना शोधण्याची गरज नव्हती आणि जर ते कोठे राहिले असतीलच, तर प्रार्थना भवनांतच येशू असण्याची शक्यता होती. **50**

**2:50** असे वाटते की ज्या ज्या वेळी येशू काही करित असत किंवा बोलत असत त्या त्या वेळी मरीया बेचैन आणि अस्वस्थ होऊन जात असे. येशूंविषयी लोक काय म्हणतात, या गोष्टीविषयी ती गंभीर व खोलवर विचार करीत असे (वचन 19, 33-51). **51**

**2:51** आपल्या सर्व संबंधाच्या संदर्भात येशूंनी पूर्णप्रकारे परमेश्वराचे विधान पूर्ण केले. त्यांनी कधीच आई बापाच्या अधिकारांचा विरोध केला नाही आणि त्यांचा अपमान होईल अशी वागणूकही केली नाही (निर्ग 20:12) **52**

**2:52** वचन 40; 1शमु 2:26. परमेश्वराचा पुत्र असले तरी येशू एखादया सामान्य माणसांसारखे वाढत गेले. परमेश्वराचा कृपेंत वाढण्याचा अर्थ - येशूंमुळे परमेश्वराला अधिकाधिक प्रसन्नता व आनंद प्राप्त होणे अगदी तसेच ज्याप्रमाणे जगिक आईवडील आपल्या मुलांच्या परिपक्वतेत आनंदीत होतात.

## 3 1

**3:1** तिबीर्य हा रोमी साम्राज्याचा राजा होता. या समयी येशू आणि योहान सुमारे तीस वर्षाचे होते (वचन 23). **2**

**3:2** कयफा, हन्ना याजकाचा जावई होता. रोमी लोकांनी त्याला यहूदी लोकांचा महायाजक (प्रमुख) म्हणून नियुक्त केले होते. सामान्यतः केवळ एकच प्रमुख याजक होत असे .

*"प्रभूंचा संदेश मिळाला"*- या भाषेचा वापर प्रामुख्याने, बहुधा जुन्या करारांत झाला होता. तुलना यिर्म 1:2; यहे 1:3; होशे 1:1; 3:3-18; मत्त 3:1-12. **3**

**3:3** याचा अर्थ असा नव्हे की बापतिस्म्याने पश्चत्ताप किंवा पापांची क्षमा मिळत असते. बाप्तिस्म्याआधी त्यांनी आपले मन बदलले, आपली दुष्टाई, वाईटपणा मान्य/कबूल केला (मत्त 3:6,11). पाप क्षमेसाठी अंतःकरण परिवर्तनाची आणि विश्वासाची आवश्यकता भासते. (मत्त 3:6; मार्क 16:15,16).योहानाच्या बाप्तिस्म्याद्वारे हेच प्रदर्शित/प्रगट होते. **5,6**

**3:5,6** यश 40:4,5. **10,14**

**3:10,14** मन परिवर्तनाचे परिणाम किंवा फळाचे वर्णन येथे पाहावयास मिळते (वचन 8). दया, प्रेम, प्रामाणिकता, सत्य बोलणे, संतोष-समाधान, लोभी नसणे ही कांही फळें पाहता येतात. जे लोक मन परिवर्तन/पालट करून येशूंच्या सहभागितेत राहूं इच्छीतात त्यांच्यात या सर्व गोष्टी असाव्यात असे परमेश्वराला हवे. **15**

**3:15** योहान 1:19,20. ख्रिस्त - मत्त 1:1. **18**

**3:18** उदाहरणाकरिता - पहा योहान 1:29-35. **19,20**

**3:19,20** मत्त 3:13-17; मार्क 1:11. **21**

**3:21** *"प्रार्थना - परमेश्वर बापाशी बोलणे"*- 5:16; 11:1. **23**

**3:23** लूक पुन्हा एकदा स्पष्ट स्पष्ट सांगतो की योसेफ हा येशूंचा कायदेशीर बाप होता. **23-28**

**3:23-28** दावीदापासून येशूपर्यंतची वंशावळी मत्तय 1:1-17 च्या वंशावळीपासून वेगळी आहे. असे का? बहुतेक ज्ञानी असे म्हणतात की मत्तय योसेफाची वंशावळी सांगतो आणि लूक मरीयेची. शब्द 'पुत्र' बायबलमध्ये अनेक प्रकारचे संबंध दर्शवितो. (वंशावळया आणि संबंधांविषयी मत्त 1:1,8; उत्प 5:5-32 पहा) संभाव्य अर्थ बहुतांशी हाच असावा. लक्ष दया, मत्तय येशूंची वंशावळी अब्राहामापासून दाखवितो. लूक आदामापर्यंत जातो. मत्तयाला दाखवावयाचे होते की येशू इस्त्राएलाचे राजे आहेत. लूक मानवजातीशी संबंध दाखवितो. **38**

**3:38** प्रथम मनुष्य आदाम याला कोणताच शारीरिक बाप नव्हता. तो परमेश्वराद्वारे निर्मित केलेला होता, म्हणून परमेश्वरच त्याचा पिता झाला. पहा उत्प 1:26,27; 2:7. ज्याप्रकारे येशू परमेश्वराचे अद्वितीय पुत्र होते, त्याप्रकारे आदाम नव्हता. (1:35; योहान 1:1,14; 3:16; 17:5).

## 4 1-13

**4:1-13** - मत्त 4:1-11. **2**

**4:2** लूक या गोष्टीचा उल्लेख करितो की सैतानाने येशूंची परीक्षा 40 दिवस घेतली. मत्तय मात्र त्या परीक्षांविषयी सांगतो ज्या 40 दिवसांच्या शेवटी आल्या. **6**

**4:6** सैतान सत्य बोलत होता काय? येशूंनी या गोष्टींना नकार दिला नाही, इतर वचनें देखील या सत्याचा उल्लेख करितात (योहान 12:31; 14:30; 1योहान 5:19; 2करिं 4:4; इफि 6:12). या जगाचे वैभव आणि अधिकार ही सैतानाने कशी प्राप्त केली? मत्त 4:9 चे नोट्स. **13**

**4:13** सैतानाने आपला पराभव स्वीकार केला नाही, पण दुसरा प्रतिकूल-योग्य समय आणि उत्तम परिणामाची आशा केली. म्हणूनच जेव्हा येशू विश्वासपूर्वक त्याचा प्रतिरोध करितात, तोंड देऊन त्याचा सामना करितात तेव्हां सैतान तेथून पळ काढतो. त्यांना जे कार्य साधावयाचे होते, त्यासाठी पवित्र आत्म्याने विपुल होऊन, तयार होऊन येशू परत येतात. **15**

**4:15** मत्त 4:23-25 .

*"आराधनालयांत"*- मत्त 4:23. **16**

**4:16** *"शब्बाथ दिवशी"*- निर्ग 20:8-11. येशूंचा नियम पहा, त्याकडे लक्ष दया. इब्री 10:25 शी तुलना करा. येशूंनी जुन्या करारांतून वाचन केले - धार्मिक शिक्षक, जे यहूदी सभेत जात असत, त्यांना बहुधा वाचावयास किंवा बोलावयास सांगितले जात असे. **17**

**4:17** *"पुस्तक"*- यहूदी याचप्रकारे जुना करार रेकॉर्ड करून आराधनालयांत ठेवित असत. **18,19**

**4:18,19** यश 61:1,2 आणि नोट्स. यहूदयांची अशी मान्यता होती की भविष्यकाळी येणारे जे ख्रिस्त आहेत

त्यांच्याकडेच हा संकेत केलेला आहे. येशू जे सुंदर कार्य करावयास आले त्या कार्याकडे लक्ष दया. **21**

**4:21** येशू असा उल्लेख करितात की ते इस्त्राएलाकरिताचे प्रतिज्ञा केलेले उद्धारक आहेत. मत्त 1:1 यांत ख्रिस्तांवरचे नोट्स. **22**

**4:22** या वचनांत दाखविल्याप्रमाणे त्या लोकांना आश्चर्य तर वाटले, पण त्यांच्यावर त्यांनी विश्वास केला नाही. मत्त 13:53-58. **23**

**4:23** गालीलांत येशूंनी आश्चर्यकर्मे केली होती. मत्त 4:13,24,25; 8:1-17. **24**

**4:24** मत्त 13:57; योहान 4:44. **25,26**

**4:25,26** पहा 1राजे 17:1-8-16. **27**

**4:27** पहा 2राजे 5:1-14. इस्त्राएली लोकांच्या वर्तनामुळे एलीया आणि अलीशा यांनी बरीच पीडा सहन केली होती. परंतु परमेश्वरांनी त्यांना दुसऱ्या लोकांकरिता खूप वापरले आणि दुसऱ्या लोकांकरिता त्यांचा भरपूर उपयोग केला. त्याच्यासमयी इस्त्राएल परमेश्वराला विसरला होता आणि त्यांनी त्यांच्याशी मूर्तिपूजकांहूनदेखील अधिक वाईट व्यवहार केला होता. येशू ख्रिस्तांना ठाऊक होते की यहूदी बंड आणि विद्रोह करतील, ते कधीच विश्वास करणार नाहीत. येशूंना हे देखील ठाऊक होते की सुवार्ता गैरयहूदी लोकांपर्यंत गाजविली जाईल. **28**

**4:28** हे यहूदी लोक दुसऱ्यांना नीच समजत असत, त्यांना क्रोध आला होता आणि येशू त्यांच्या चुकांकडे बोट दाखवित असल्यामुळे ते त्यांच्यावर प्रचंड संतापले होते. येशू यहूदी लोकांपेक्षा दुसऱ्या लोकांची वाहवा अधिक करीत होते. **29**

**4:29** हा पहिला प्रयत्न होता (शेवटचा नव्हे), यहूदयांनी येशूंना मारून टाकण्याचा प्रयत्न केला होता, त्यांना येशूंचे मरण हवे होते. कारण काय होते? येशूंनी त्यांना सत्याचे दर्शन घडविले. त्या सत्याद्वारे त्यांच्या वाईट अंतःकरणावर परमेश्वरांच्या पवित्रतेचा प्रकाश चमकला. पहा योहान 3:19; 7:7; 8:40. **30**

**4:30** येशूंच्या मरणाचा समय येऊन ठेपलेला होता. त्यांच्या मर्जीशिवाय कोणीच त्यांचा प्राण घेऊं शकत नव्हता. पहा योहान 7:30; 10:17,18. **31-37**

**4:31-37** मार्क 1:21-28. **38-41**

**4:38-41** मत्त 8:14-17 .

*"शिमोन"*- पेत्र. **41**

**4:41** मत्त 8:4; 9:30; 12:16; मार्क 1:34. **42-44**

**4:42-44** मार्क 1:35-39. **43**

**4:43** *"परमेश्वर राज्य"*- मत्त 4:17.

## 5[1]

**5:1** गालीलांचे दुसरे नांव गनेसरेत असे होते. येथे येशूंच्या शब्दांना, परमेश्वराचे वचन म्हटलेले आहे. पहा योहान 7:16,17; 12:49,50; 14:24; 17:8. **4**

**5:4** येशू ख्रिस्तांना सर्वकांही ठाऊक आहे, त्यांना माहित होते की मासे कोठे आहेत. पाहा योहान 21:4-7.

या दोन्ही गोष्टींपासून बरेंच कांही शिकता येते - येशूंच्या निर्देशाने, त्यांच्या नेतृत्वाने आणि मार्गदर्शनाने केलेली परमेश्वर राज्याची कार्ये फायदेशीर आणि फळदायक असतात परंतु आपल्या इच्छेने केलेली कामे फळहीन होतात. **5**

**5:5** *"स्वामी" - हा ग्रीक शब्द आहे आणि याचा अर्थ असा आहे - "तो ज्यांच्याजवळ अधिकार आहे."* **8**

**5:8** पेत्राला हा आभास झाला की येशू केवळ मनुष्य नाहीत; त्यांच्या पवित्र उपस्थितीत त्याने स्वतःचे परीक्षण केले, तेव्हां त्याला आढळले की तो किती अयोग्य आहे. तुलना करा : यश 6:5; ईयोब 40:4; 42:6; प्रकटी 1:17. येशू ख्रिस्तांच्या पवित्रतेत/पावित्र्यांत लोकांना त्यांची स्वतःची अपवित्रता दिसून येते. या घटनेनंतर पेत्र येशूंप्रति शंभर टक्के आज्ञाधारक झाला आणि येशूंनी त्याला कधीही सोडूं नये अशी इच्छा त्याने नेहमी बाळगली. **9**

**5:9** 'मासेमारी' हा त्या लोकांचा व्यवसाय होता (मत्त 4:18), परंतु येथे नासरेथात राहणारा सुतार त्यांना सांगतो की मासे कोठे होते. **10**

**5:10** पेत्राला स्वतःची अयोग्यता आणि पापी दशा दिसली, पण या कारणांनी त्याला भयभीत व्हावयाचे नव्हते. खरे पाहिले तर या विलक्षण अनुभवाद्वारें पेत्र शिकला की लोकांना सत्याच्या मार्गावर कसे आणिले जावे. माणसांना धरणारा - वचन मत्त 4:19. **11**

**5:11** मत्त 4:18-22. **12-14**

**5:12-14** मत्त 8:2-4. **16**

**5:16** *"परमेश्वराशी सहभागिता"*- 3:21; 6:12; 9:28; मत्तय 14:23; 26:36; मार्क 1:35; 6:46; इब्री 5:7; 7:25. **17-26**

**5:17-26** मत्त 9:2-8. **17**

**5:17** *"परूशी"*- मत्त 3:7. आपण खात्रीने असा विचार करूच शकतो की जर येशू तेथे होते तर बरें व स्वस्थ करण्याचे सामर्थ्य देखील त्यांच्याबरोबर होते. ही गोष्ट बहुतांशी सत्य होती. पहा मार्क 6:5. **19**

**5:19** मार्क 2:4. **27-32**

**5:27-32** 9:9-13 पहा. मत्तयाचे दुसरे नांव लेवी आहे. **33-39**

**5:33-39** मत्त 9:14-17. **39**

**5:39** येशू ख्रिस्तांच्या सुवार्तेचा द्राक्षारस पापांची क्षमा बहाल करितो, परमेश्वराबरोबर समेट व मेळ, आनंद आणि अनंतकाळचे जीवन देतो, पण ते मिळवून घेण्याच्या प्रक्रियेत लोक किती मंद आणि हळू व्यवहार करणारे आहेत. लोकांच्याठायी त्यांच्या स्वतःच्या पूर्वधारणा असतात, ते प्रत्येक नवीन गोष्टीचा विरोधच करितात, त्यांना त्यांच्या जुन्या रीतिविधींचा गर्व व अभिमान असतो; या सर्व कारणांमुळे ते कोणत्याही नवीन गोष्टीची (जी त्यांनी अनुभविली नाही) थट्टा करितात. जर आपण दावीदासारखे बुद्धीमान होऊन कार्य केले तर किती बरें होईल! स्तो 34:8.

## 6 1-11

**6:1-11** मत्त 12:1-14. **5**

**6:5** *"मनुष्याचा पुत्र"*- मत्त 8:20. **8**

**6:8** मत्त 9:4; योहान 2:24,25. **9**

**6:9** मार्क 3:4. **11**

**6:11** पहा 4:28 त्यांचे ढोंग किंवा रहस्य उघडकीस आले की कांही धार्मिक लोकांना खूप राग येतो, गर्विष्ठ असल्यामुळे ते अतिशय संतापतात. **12-16**

**6:12-16** मत्त 10:2-4. **12**

**6:12** आपल्यासाठीचे प्रेषित निवडतांना येशू ख्रिस्त प्रचंड सतर्क व सावध होते. ते सर्वाधिक सतर्क या गोष्टीविषयी असत की सर्वकांही परमेश्वराच्या इच्छेप्रमाणेच व्हावे. **15**

**6:15** *"गिलोत"*- मत्त 10:4 चे नोट्स. **16**

**6:16** एक संपूर्ण रात्र, परमेश्वराच्या संगतित/सहभागितेत व्यतित केल्यानंतरच येशूंनी यहूदाची निवड केली होती आणि त्यांना त्याच्या वागणुकीविषयीचे ज्ञानसुद्धा होते (योहान 6:64,70). कदाचित हा यहूदा, याकोबाचा मुलगा होता, परंतु हे ठाऊक नाही की हा याकोब, यहूदाचा भाऊ होता किंवा त्याचा बाप. **17-19**

**6:17-19** मत्त 4:23-25 शी तुलना. **19**

**6:19** 5:17 आणि 8:46 पहा. **20-49**

**6:20-49** मैदानांत दिला गेल्यामुळे या उपदेशाला मैदानी उपदेश असे म्हणतात (17). मत्तय 5-7 यांतील काही सत्य यांत मिळते केवळ शब्द वेगळे आहेत. येशूंनी इतर ठिकाणी ज्या गोष्टी शिकविल्या होत्या, त्या येथेही आहेत. या गोष्टी येशूंनी एकाहून अधिक वेळा, एकापेक्षा अधिक ठिकाणी शिकविल्या. तुलना करे 11:2-4 पासून मत्तय 6:9-13; 11:9-3 पासून मत्तय 7:7-11 आणि 12:22-31 ची मत्तय 6:25-33शी. **20**

**6:20** हे शब्द येशूंच्या शिष्यांना म्हटले गेले होते, ते शिष्य ज्यांनी येशूंचे अनुयायी होण्याकरिता सर्वकांही त्यागिले होते (5:11,28; 14:33; 18:28), सर्व गरीब लोकांकरिता हे शब्द नव्हते, मग त्यांनी ख्रिस्तांवर विश्वास ठेविला असो किंवा नसो. त्यांचा लाभ (परमेश्वराचे राज्य) त्या सर्व गोष्टींहून कितीतरी अधिक होता, (जे त्यांनी गमाविले होते). तुलना करा - मत्तय 19:27-30; फिलि 3:7-9; नीति 19:22. **21-23**

**6:21-23** या वचनांवरून स्पष्ट जाहिर होते की शिष्यांचे जीवन किती कठीण व खडतर आहे; कधी-कधी याचा अर्थ भूक, दुःख आणि दुष्टांपासून आलेला तीव्र विरोध. परंतु खरे आणि सदैव राहणारे आर्शीवाद त्यांचेच होते. मत्त 5:6; 10-12 शी तुलना. **24-26**

**6:24-26** मत्तयाच्या सुवार्तेत जो डोंगरी उपदेश आहे त्यांत ही वचनें आढळत नाहीत. याठिकाणी त्या लोकांवर येणाऱ्या कठीण प्रसंगाविषयी आणि दुःखाविषयी लिहिलेले आहे जे लोक माणसाची प्रशंसा आवडून घेतात, ज्यांना माणसांची स्तुति परमेश्वराच्या स्तुतीपेक्षा अधिक आवडते; आणि जे लोक ख्रिस्तांसाठी कांहीही त्यागण्यास तयार नसतात. पहा योहान 5:44; 12:43; 1तीम 6:9,10; याकोब 5:1-4. यश 5:8-25 यांतही असेच काही शब्द आहेत, त्यांशी तुलना करा. **26**

**6:26** *"लबाड संदेष्टे"*- मत्त 7:15. **27,28**

**6:27,28** मत्त 5:44. **29,30**

**6:29,30** मत्त 5:39-42. **31**

**6:31** मत्त 7:12. **32-36**

**6:32-36** मत्त 46-47. **36**

**6:36** मत्त 5:48; इफि 4:32; याकोब 2:13. **37**

**6:37** मत्त 7:1; 6:14. **38**

**6:38** लक्ष दया – कशाप्रकारे येशूंनी विपुलता, मिळवून घेण्याचा मार्ग दाखविला – ही विपुलता ही भरपूरी दुसऱ्यांना मागून मिळत नसते; दुसऱ्यांना दिले तर ती विपुलता प्राप्त केली जाऊ शकते. हे काही अंशी परमेश्वराचे कार्य आहे की जेव्हा आम्ही दुसऱ्यांना देतो तेव्हां लोकांनी आम्हांला दयावे, असे परमेश्वराने होऊ दयावे; हीच त्यांची इच्छा आहे. जे लोक मनाच्या औदार्याने, मोठेपणाने देतात त्यांच्यासाठी एक मोठी प्रतिज्ञा आहे – 2करिं 9:6-8; स्तो 18:25,26; नीति 11:24,25; 22:29; उपदेशक 11:1. याठिकाणी येशू धन-संपत्ति आणि वस्तूंविषयी देण्याचे सांगत नाहीत; या सर्व भौतिक गरजांहून जे श्रेष्ठ, त्याविषयी ते बोलतात – वेळ, मेहनत, सल्ला आणि दुसऱ्यांसाठीची प्रेम सेवा. जर ख्रिस्तांचे अनुयायी असेच आणि याच श्रेष्ठ हेतूसाठी औदार्य दाखवितात तर त्यांना कधी न कधी, कोणते न कोणते प्रतिफळ मिळेलच. **39**

**6:39** मत्त 15:14. **40**

**6:40** मत्त 10:24,25. योहान 13:16. **41-44**

**6:41-44** मत्त 7:3-5, 16-18. **45**

**6:45** मत्त 12:34,35. **46**

**6:46** मत्त 7:21; योहान 13:13; मलाखी 1:6. खऱ्या शिष्याचे लक्षण आणि चिन्ह आज्ञापालन होय. **47-49**

**6:47-49** मत्त 7:24-27.

## 7 1-10

**7:1-10** मत्त 8:5-13. **3**

**7:3** मत्तयाच्या लेखाच्या आधारे, रोमी अधिकारी स्वतःच आला होता. **4**

**7:4** त्या व्यक्तिचे त्याच्या स्वतःविषयीचे काय विचार होते (6,7) यांशी तुलना करा. फार क्वचितच असे होई की एखादा यहूदी, एखादया रोमी नागरिकाविषयी किंवा कोणत्याही दुसऱ्या माणसांविषयी कांही चांगले बोलीत असे. **5**

**7:5** *"आराधनालय"*- मत्त 4:23. **11**

**7:11** नासरेथाहून सुमारे 10 कि.मी अंतरावर नाईन नांवाचे गाव होते. **13**

**7:13** पहा 19:41; मत्त 9:26; 14:14; 15:32; योहान 11:35,38; इब्री 4:15 आणि योहान 11:43,44. येशूंच्या अद्भुत कृत्यांविषयी मत्त 8:3 चे नोट्स पहा. **16**

**7:16** पहा 1:64,65; 2:13,20,28; 5:25; 13:13; 17:15; 18:43; 23:47; 24:53. स्तो 31:1-3 यांत स्तुतीवरचे नोट्स पहा. लोक येशूंना एक मोठा संदेष्टा (मत्त 16:13,14; 21:11) समजत असत. ते संदेष्टयांहून कितीतरी

अधिक श्रेष्ठ व महान आहेत हे त्यांना कळलेच नाही (मत्त 16:15-17). **18-35**

**7:18-35** मत्त 11:2-19. त्या समयी योहान लोकांना शिक्षण देण्याच्या आरोपामुळे तुरूंगात होता. **29,30**

**7:29,30** ही वचनें मत्तयात नाहीत. अनेक सामान्य लोकांनी पश्चात्ताप केला आणि योहानाकडून बाप्तिस्मा घेतला. पहा मत्त 3:5,6. परंतु धार्मिक पुढाऱ्यांनी योहानाचा संदेश फेटाळला, त्याला नकार दिला होता, मत्त 3:7-10. असे करून, त्यांच्यासाठी परमेश्वराचा जो उत्तम हेतू होता, तो त्यांनी ओळखला नाही .

*"धर्मशास्त्र्यांनी"*- मत्त 22:35 चे नोट्स. **36-50**

**7:36-50** केवळ लूक या घटनेविषयी सांगतो. मत्तय, मार्क आणि योहान दुसऱ्या समयाकडे इशारा करितात, त्यासमयी जेव्हां येशूंचा अभिषेक केला गेला (मत्त 26:6-13; मार्क 14:3-9; योहान 12:1-8). **36**

**7:36** *"परूशी"*मत्त 3:7. **37**

**7:37** *"चरित्रहीन"*याचा अर्थ कदाचित असा असावा की ती स्त्री एकतर वेश्या होती किंवा अनैतिक यौन संबंधात होती. पण ही गोष्ट अगदी ठळक आणि स्पष्ट व स्वच्छ आहे की तिने येशूंचे ऐकले, तिचे परिवर्तन झाले आणि तिने विश्वास धरिला (वचन 50). **38**

**7:38** तिच्या कृत्यांमुळे तिने असेच प्रदर्शित केले की तिच्या अंतःकरणाचा पालट झाला आणि त्याद्वारे तिने विश्वास दर्शविला आणि येशूंसाठीचे जे प्रेम तिच्या हृदयांत होते ते प्रगट केले. **39**

**7:39** कदाचित परूश्यांनी कधीच असा विचार केला नव्हता की येशू संदेष्टयांहून सर्वश्रेष्ठ आहेत. जसे इतर परूशी स्त्रियांना नीच लेखित असत, तसेच त्यांनीहि केले. पहा 18:9-12. **41**

**7:41** *"चांदीचे नाणें"* - *"दीनार"*एक मजूराची एका दिवसाची मजूरी (मत्त 20:2). **44-46**

**7:44-46** जसे पाहुण्यांचे स्वागत केले जाते त्याप्रमाणे यांनी केले नव्हते. येशू त्यांच्याविरूद्ध तक्रार करित नव्हते पण परूश्यांना धडा शिकवित होते; तो धडा म्हणजे पाहुणचारापेक्षा आणखी जे महत्वाचे होते ते त्या स्त्रीने येशूंकरिता केले होते. प्रियांनो लक्ष दया, कारण येशू आमचा व्यवहार आणि वागणूक नीट-नीट पाहतात, ही गोष्ट आपण सर्वांनी समजून घेतली पाहिजे. **47**

**7:47** तिचे परमेश्वरांवर प्रेम होते म्हणून तिला क्षमा मिळाली नव्हती; पण तिला क्षमा मिळाली होती म्हणून ती परमेश्वरावर प्रेम करीत होती; वचन 41-43 चा हाच आशय अर्थ आहे. ख्रिस्तांप्रति तिने जो व्यवहार दाखविला, त्यावरून तिने दाखविले की तिला क्षमा मिळाली आहे आणि ती परमेश्वरांवर प्रेम करिते. मत्त 25:32-46; 12:31; 18:23-25 चे नोट्स. **48,49**

**7:48,49** मत्त 9:2-6 शी तुलना. **50**

**7:50** परमेश्वराप्रति तिचे जे प्रेम होते त्यामुळे ती वाचली नाही, त्यामुळे तिला शांति लाभली नाही, येशूंच्या पायांशी रडल्यामुळे तिचे पाप धुतले गेले नाहीत, प्रियांनो केवळ आणि केवळ तिच्या विश्वासाने तिला वाचविले. येथे 'वाचविले जाणे' म्हणजे क्षमा मिळविणे, वाईट-पापी जीवनापासून मुक्त होणे किंवा सोडविले जाणे आणि परमेश्वरांशी संबंध नीट होणे, बरोबर होणे असा आहे. पहा 3:22-24; 5:1; गल 2:16; 3:26; इफि 2:8,9.

**8**1

**8:1** "परमेश्वराचे राज्य" - मत्त 4:17. **2**

**8:2** तिला मग्दालीया म्हणत असत कारण ती मग्दाली नांवाच्या जागेपासूनची होती. हे गांव गालील सरोवराच्या पश्चिमेकडे होते. **3**

**8:3** येशू ख्रिस्तांकडे जगिक वस्तूंचा भांडार नव्हता (मत्त 8:20). येशूंचे शिष्य आपले सर्वस्व त्यागून त्यांच्यामागे निघाले होते (5:11,28; 18:28). अद्भुत कृत्यैं करून त्यांनी आपले पोट भरिले नाही; आपण कुठेच वाचत नाही की त्यांनी कोणालाही कधी पैसा मागितला. जे लोक त्यांच्या सेवाकार्यात आर्थिक सहयोग देऊं इच्छीत होते, त्यांच्याकडून येशूंना मदत मिळत असे. 10:4-7; मत्त 10:9-11; तुलना 1करिं 9:6-14; लेवी 7:14. **4-15**

**8:4-15** मत्त 13:2-23. लूकाच्या पुस्तकांत हा दाखला दुसऱ्या शब्दांत आणि दुसऱ्या समयी सांगितला गेला. **5**

**8:5** *"तुडविले गेले"*- हा वाक्यांश मत्त 13:4 यांत आपण वाचित नाही. ही एक प्रकारची 'बेपर्वाई' 'हलगर्जीपणा' आणि दुर्लक्ष करण्यासारखेच आहे, त्यावरून परमेश्वराच्या उत्तम वचनाचा लोकांना किती द्वेष आणि तिरस्कार आहे हे प्रगट होते. **6**

**8:6** मत्त 13:6 - यांत मातीच्या वाईट गुणावर (नापीक) भर दिलेला आहे. वाईट-नापीक किंवा पोकळ मातीत, ओलावा कायम राहू शकत नाही; त्याचप्रमाणे परमेश्वराकडून येणारे आध्यात्मिक पावसाचे थेंब अंतःकरणात ओलावा आणू शकणार नाहीत; अर्थात वाईट माती आणि वाईट हृदय हे एकसारखेच आहेत. **14**

**8:14** *"सुख-चैन-सम्पत्ति"*हा शब्द मत्त 13:22 यांत आढळत नाही. माणसाच्या मनांत परमेश्वराचे वचन पेरिले जाते, “ते खुंटणे”, ज्याप्रकारे चिंता आणि भय कार्य करितात, त्याचप्रमाणे आमोद-प्रमोद देखील परमेश्वरांचे वचन दाबून टाकतात, त्याची वाढ खुंटवितात. **15**

**8:15** परमेश्वरसाठी जे लोक पीक उत्पन्न करितात, त्यांच्या सद्गुणांवर येथे भर दिलेला आहे. जन्मापासून, स्वाभाविक रूपांत असे मन मनुष्यात नसते (पहा मत्त 15:18-20; यिर्म 17:9). जर एखादयाकडे योग्य आणि उत्तम अंतःकरण आहे तर ते केवळ यासाठीच की परमेश्वराने त्याच्या अंतःकरणात खोलवर मोठे कार्य केलेले आहे. आणि त्याला नवीन व्यक्ती केले आहे. सुपीक मातीप्रमाणे, परमेश्वरानी तयार केलेले सुपीक अंतःकरण परमेश्वरांचे वचन सांभाळून ठेविते - पहा 2करिं 5:17; इफि 2:1-10. प्रियांनो, येथे विशेष लक्ष या गोष्टीकडे असू दया की परमेश्वराकरिता त्याच वेळी पीक आणले जाऊ शकते, जेव्हा आपण त्यांचे वचन-संदेश आपल्या अंतःकरणात जपून ठेवितो आणि परमेश्वराच्या सेवाकार्यात सतत लागलेले असतो. पहा 1करिं 15:58. **16**

**8:16** मत्त 5:14,15. येथे येशू आपल्या शिष्यांविषयी बोलत आहेत. **17**

**8:17** मत्त 10:26. **18**

**8:18** मत्त 13:12. **19-21**

**8:19-21** मत्त 12:46-50. **21**

**8:21** पहा 6:47; 11:28; योहान 14:21. येशू आवश्यकता पाहून, केवळ त्याच गोष्टीवर भर देतात जेथे गरज आहे. अर्थात परमेश्वराप्रति आज्ञाधारक होणे किंवा तसेच करणे जसे परमेश्वर त्यांना करावयास सांगतो. **22-25**

**8:22-25** मत्त 8:23-27. **26-37**

**8:26-37** मत्त 8:28-34; मार्क 5:1-20. **31**

**8:31** अधोलोक म्हणजे दुष्टात्म्यांचे आणि सैतानाचे निवास स्थान प्रकटी 9:1,2; 20:1-3. परमेश्वराने सुरवातीपासूनच आत्म्यांना, नेहमीसाठी, अधोलोकांत का बांधून टाकिले नाही? पहा – 1इति 21:1 चे नोट्स. **40-56**

**8:40-56** मत्त 9:18-26; मार्क 5:22-43. **43**

**8:43** *"सर्व पैसा डॉक्टर/वैदयांवर खर्च केला"*- आजसुद्धा हीच गोष्ट सत्य आहे.

## 9 1-6

**9:1-6** मत्त 10:1; 7:14. **7-9**

**9:7-9** मत्त 14:1,2. **8**

**9:8** मार्क 6:15. **10-17**

**9:10-17** मत्त 14:13-21. **11**

**9:11** *"परमेश्वराचे राज्य"*- मत्त 4:17. **18-20**

**9:18-20** मत्त 16:13-16. **21**

**9:21** मत्त 8:4; 16:20; मार्क 8:20. **22-27**

**9:22-27** मत्त 16:21-28. **22**

**9:22** मत्त 8:20 यांत 'मनुष्याचा पुत्र' वरील नोट्स. **23**

**9:23** *"क्रूस"*- क्रूस मृत्यु दर्शवितो (पहा मत्त 10:38; 16:24 चे नोट्स). हा शब्द प्रत्येक दिवशी 'विशेष' असा आहे. आपल्या स्वतःसाठी आणि ख्रिस्तांसाठी आपला व्यवहार, पद्धत आणि वागणूक नवीन करीत राहावयास हवी; कारण जर नवीनीकरण एकदा करून आपण निश्चिंत झालो तर आपली वाट चुकेल, दिशाभूल होईल. योग्य व बरोबर वागणूक अशी असेल : आपल्या 'स्व' चा त्याग (मारणे) ख्रिस्त येशूंची ही पात्रता आहे की आपण संपूर्ण रीतिने त्यांच्याप्रति समर्पित व्हावे आणि त्यांच्या सेवाकार्यात मग्न व व्यस्त राहावे. आपण येशूंना सन्मान दयावयाचा आहे, स्वतःला उंच करावयाचे नाही. आधुनिक शिक्षक किंवा मनोविज्ञान शिक्षकांकडून आपण सहसा असे ऐकत नाही. **24**

**9:24** हे सत्य सोडून येशूंनी आणखी कोणत्या गोष्टीवर भर दिला होता काय? मत्त 10:38,39; 16:24,25; मार्क 8:34,35; लूक 14:26,27; 17:33; योहान 12:25. ही गोष्ट पुन्हा म्हटली गेली, त्याची पुनरावृत्ति झाली असल्यामुळे आपल्याला त्याचे महत्व कळते (दर्शविले जाते). **26**

**9:26** मत्त 10:33; मार्क 8:38. **28-36**

**9:28-36** मत्त 17:1-8. **28**

**9:28** लूक म्हणतो की हे आठव्या दिवसानंतर घडले; मत्तय आणि मार्क सहा दिवसांचा उल्लेख करितात. स्पष्ट कळते की त्यांनी वचन 18-27 यां दरम्यान घडलेल्या घटनांच्या मधल्या दिवसांविषयी सांगितले आहे, पण लूकने त्या दोन्ही घटना जोडून टाकिल्या. **31**

**9:31** लूक केवळ मोशे आणि एलीयाच्या चेहऱ्यांविषयी सांगतो की त्यांचे चेहरे अलौकिक तेजाने भरलेले होते आणि हे देखील की त्यासमयी ते लोक काय म्हणाले - "अर्थात येशू जे निर्गमन यरूशलेमेत पूर्ण करणार होते त्याविषयी. **32**

**9:32** केवळ लूकच शिष्यांच्या झोपेच्या अवस्थेविषयीचा उल्लेख करितो. मत्त 26:40,43शी तुलना. जगाचा इतिहास प्रगट करितो की विशिष्ट समयी शिष्य किती नीरस आणि कमजोर होऊ शकतात, या महत्वपूर्ण विशेष वेळी शिष्य किती बेजबाबदार आणि मंदबुद्धि होते हे आपल्याला पाहावयास मिळते. आपण स्वतःला त्यांच्यापेक्षा अधिक ज्ञानी समजू नये. **36**

**9:36** मार्क 9:9,10. **37-42**

**9:37-42** मत्त 17:14-18. दुष्टात्म्याचा छळ झालेले लोक कशाप्रकारे दुष्टात्म्याद्वारे त्रस्त केले जातात ती लक्षणें पहा. **44,45**

**9:44,45** मत्त 17:22,23. **46-48**

**9:46-48** मत्त 18:1-5; 10:40; 20:25-28. **49,50**

**9:49,50** मार्क 9:38-40. **51**

**9:51** पहा 24:51. मार्क 16:19; प्रेषि 1:9. येशूंना नीट-स्पष्ट ठाऊक होते की यरूशलेमेत त्यांच्याशी कशी वागणूक होणार आहे, तरीही येशू गेले (वचन 22,44). **52,53**

**9:52,53** यहूदी आणि शोमरोनी यांच्यात आपसांत वैर होते. पहा योहान 4:9. येशू यहूदी होते आणि शोमरोनांच्या गावातून जाणार होते, म्हणून त्यांनी येशूंना तशी परवानगी दिली नाही. याविषयी शिष्यांना खूप वाईट वाटले; त्यांना हे अजिबात आवडले नाही. **54**

**9:54** मार्क 3:17. "राख करून टाकावे काय?" असे वाटते की याकोब आणि योहान यांना 2राजे 1:9-12 विषयी ठाऊक होते. येशूंचा अपमान होत आहे म्हणून त्यांना संताप आला होता. त्यांना हे कळतच नव्हते की एलीयाच्या समयापेक्षा त्यांचे दिवस किती वेगळे होते. **55**

**9:55** शिष्यांनी डोंगरी उपदेश ऐकला होता, पण ते तो विसरले होते. (मत्त 5:1-10). **56**

**9:56** मनुष्याचा पुत्र (येशू) लोकांचा नाश करावयास नाही, पण त्यांना वाचविण्यासाठी आला होता - लूक 19:10; योहान 3:17. **57-62**

**9:57-62** पहा मत्त 8:19-22 (वचन 61,62 मत्तयांत नाहीत) "पण त्याआधी" (वचन 61) वचन 59 असल्याप्रमाणे याच्याजवळहि कांही असे कार्य होते, जे त्याला आधी करावयाचे होते. यावरून आणि त्या शब्दांवरून जे येशू त्याला म्हणाले स्पष्ट कळते की त्याच्या जीवनातील प्राधान्याच्या बाबी बरोबर नव्हत्या. येशूंचे उत्तर न्यायोचित नाही काय, न्यायास धरून नाही काय? येशूंवर भरंवसा ठेवून त्यांची सेवा करणारे जे लोक आहेत, त्यांच्याकडून येशूंनी जास्त कांही मागितले नाही आणि विशेष मागणी केली नाही; पण वास्तविकता हीच आहे की ज्यांचे येशूंवर खरे प्रेम नसते किंवा कांहीच प्रेम नसते त्यांना थोडके (मागणी) अधिकच वाटते. असे वाटते की येशूंनी या व्यक्तिठायी मागे वळून पाहण्याची प्रवृत्ति अर्थात पस्तावा होण्याची वृत्ती पाहिली. ही एक नाशदायक बाब आहे, मग नांगर चालविणे असो की परमेश्वराची सेवा करणे असो.

फिलि 3:13,14; इब्री 12:1,2 आपली दृष्टि आपल्या लक्ष्याकडे, हेतूकडे लागलेली असावी.

# 10[1]

**10:1** इतर शिष्यांना पाठवण्याविषयीचा उल्लेख लूक करितो; म्हणजे बारा शिष्यांबरोबर इतर दुसरे देखील पाठविले गेले होते. जे निर्देश येशूंनी त्यांना येथे दिले तेच इतर ठिकाणी दिलेले होते. **2**

**10:2** मत्त 9:37,38. **3**

**10:3** मत्त 10:16. **4**

**10:4** 10:9,10. येशू यरूशलेमेस (9:51) जात होते. त्यांना ही यात्रा हा प्रवास लवकरच पूर्ण करावयाचा होता. **5-12**

**10:5-12** मत्त 10:12-15. **9**

**10:9** मत्त 4:17 यांतील परमेश्वर राज्याचे नोट्स पहा. **12**

**10:12** *"त्या दिवशी"*- न्यायाच्या दिवशी - मत्त 10:15. **13-15**

**10:13-15** मत्त 11:20-24 .

*"अधोलोक"*- ग्रीक "हेडीस" म्हणजे अधोलोक - पहा 16:23 चे नोट्स. **16**

**10:16** पहा 9:48; मत्त 10:40; 18:5; योहान 12:44; 13:20. **17**

**10:17** येशूंच्या नांवाचे सामर्थ्य आणि प्रभाव पाहा - मत्त 10:1; मार्क 16:17; प्रेषि 5:16; 8:7; 16:18. **18**

**10:18** भुत-प्रेतांचे काढीले जाणे हे सिद्ध करिते की परमेश्वराचे राज्य जवळ आहे आणि सैतानाचा पराभव निश्चित आहे. तुलना करा - मत्त 12:22-29; योहान 12:31; मत्त 4:1-11 यांत सैतानावरचे नोट्स; 1इति 21:1. **19**

**10:19** येशूंनी खरोखर साप-विंचू आणि त्यांच्याचसारख्या भयंकर दुष्टात्म्यांवर अधिकार दिला होता. प्रमुख शत्रु सैतान होता. पहा मार्क 16:17,18; स्तो 91:13; इफि 6:12; याकोब 4:7; 1पेत्र 5:8,9; प्रकटी 12:10,11. **20**

**10:20** शिष्यांचा आनंद दुष्टात्म्यांवरच्या अधिकारांवरचा नव्हता, तर त्यांचा आनंद आणि त्यांची मुक्ति अनंत जीवनामुळें होती; त्यावर आधारलेली होती .

*"स्वर्गात लिहिलेली आहेत"*- निर्ग 32:32; इब्री 12:13; प्रकटी 3:5; 20:12. **21,22**

**10:21,22** मत 11:25,26. सुवार्तेत, आणखी दोन ठिकाणी येशूंच्या ( आनंदाविषयी म्हटले गेले आहे - योहान 15:11; 17:13. पाहा की त्यांना कोणी प्रसन्न केले - परमेश्वर आपले सत्य केवळ त्याच लोकांवर प्रगट करितो जे नम्र आणि लीन आहेत, जे गर्विष्ठ नाहीत. **23,24**

**10:23,24** मत्त 13:16,17. **25**

**10:25** *"शास्त्री"*- हे लोक जुन्या करारचे (नियमाचे) विशेष ज्ञान ठेवणारे होते. येशूंचा प्रश्न मत 19:16 याप्रमाणेच होता. हा एक आवश्यक प्रश्न होता. पण जो कोणी येशूंना हा प्रश्न विचारतो, त्यांपैकी प्रत्येकजण येशूंचे उत्तर ऐकण्यासाठी तयार नसतो. **26**

**10:26** येशूंना एखादी सूचना हवी होती म्हणून येशू हा प्रश्न विचारित नाहीत. त्यांना हे ऐकावयाचे होते, मनुष्य जो काही विचार करितो, ते त्याने मुखाने बोलावे. **27**

**10:27** हे एक सुंदर उत्तर होते - मत्त 22:36-40 पहा. ज्या दोन वचनांचा उल्लेख केला गेला ती अनुवाद 6:5 आणि लेवी 19:18 यांतील वचनें होती. **28**

**10:28** परमेश्वराच्या सत्याविषयीचे ज्ञान असणे किंवा त्याची पुनरावृत्ति करणे, यांपासून कोणालाच अनंत जीवन मिळत नाही. रोम 2:13; याकोब 1:22-25 शी तुलना करा. या व्यक्तिला ते सत्य ठाऊक होते पण तो त्याप्रमाणे करीत नव्हता. आपण असे यासाठी म्हणू शकतो की तो स्वतःला धार्मिक आणि न्य्याय व बरोबर प्रगट करू इच्छीत होता (वचन 29). दुसऱ्यांसारखे त्यानेपाप केले होते (रोम 3:23). एखादया व्यक्तिने जर पूर्ण प्रकारे या दोन खास आज्ञांचे पालन केले असते तर तो जगू शकत होता, पण येशूंशिवाय आजवर कोणताच इतर व्यक्ती, परमेश्वराला पूर्ण मनाने प्रेम करू शकलेला नाही. **29**

**10:29** *"स्वतःला धार्मिक"*- अनेक लोकांची ही एक विशेष समस्या आहे, पहा 16:15; 18:9-12. जोपर्यंत कोणताच व्यक्तीसाठी आपल्या स्वतःला निर्दोष प्रभावित (सिद्ध) करणे बंद करित नाही, थांबवित नाही आणि परमेश्वरांसमोर स्वतःला पापी मानित नाही तोपर्यंत कोणत्याच व्यक्तिसाठी कधीही कोणतीच आशा नाही. (रोम 3:19,20). **30-37**

**10:30-37** केवळ लूक या दाखल्याविषयी बोलतो. वरवर पाहता "शेजारी" आणि "प्रेम" याचा काय अर्थ आहे, ते दाखवितो. वचन 29 आणि 25 यांत आध्यात्मिक रूपाने एक दुसरा अर्थ होऊ शकतो. आध्यात्मिक गोष्टी शिकण्याकरिता, एखादया गोष्टीवर खूप भर देणे, मूर्खपणाचे ठरेल (पहा मत्त 13:18-23 चे नोट्स). **30**

**10:30** समुद्र सपाटीपासून यरूशलेम 800 मीटर वर आणि यरीहो 27 कि.मी दूर होते, पण ते समुद्र सपाटीपासून 250 मीटर खाली होते. यरूशलेम महान राजा आणि परमेश्वराचे नगर होते (मत्त 5:35). यरीहोवर परमेश्वरांचा क्रोध होता (यहो 6:26). थेट खाली जाणारी ही डोंगराळ वाट जी यरोहाला जात होती, ती डाकू आणि लुटारू लोकांना लपण्यासाठी एक चांगली जागा होती. हे जग डोंगरामुळे वरखाली आहे आणि सैतान व त्याचे सेवक, संधि शोधत असतात की कोणाला फाडून त्यांचा नाश करावा (योहान 8:44; 1पेत्र 5:8). यांनी मनुष्याचा तो निर्दोषपणा (धार्मिकता) हिसकून घेतला, जो त्यांना दिला गेला होता आणि त्यांना तशाच वाईट स्थितीत सोडून दिले - अर्थात शारीरिक रूपाने/रीतीने ठीकठाक, अगदी व्यवस्थित पण आध्यात्मिक रूपाने, मेलेल्या दशेत. उत्प 2:17; 3:1-5; इफि 2:1-3. **31,32**

**10:31,32** निर्ग 28:1 याजकांवरचे नोट्स पहा. यांपैकी कोणीही परमेश्वरावर आपल्या सारखे प्रेम करित नव्हता, आपण असेही म्हणू शकतो की याजक आणि लेवी यांच्याकडचा हा संकेत आहे. पहा प्रेषि 13:38,39; रोम 8:3; गल 2:16; इब्री 8:7,8; 9:9,10; 10:1-4,11. **33-35**

**10:33-35** योहान 4:4-9 यांत शोमरोन्यांवरचे नोट्स पहा. यहूदी त्यांना तुच्छ व नीच समजत असत, त्यांच्याशी कोणताच व्यवहार करित नसत. हा दाखला शिकवितो की, प्रेम काय आहे आणि आपला शेजारी कोण आहे. स्पष्ट कळते की शेजारी तो आहे जो आपल्या संपर्कात येतो, तो कोणत्याही जातीचा, देशाचा, रंगाचा आणि धर्माचा असू शकतो. या वचनांचा आध्यात्मिक अर्थ वचन 25 च्या प्रश्नाचे उत्तर देतो. दाखल्यातील व्यक्ती असहाय्य होता, तो आपली मदत स्वतः करू शकत नव्हता. तुलना करा - रोम 5:6; 8:7; इफि 2:4,5. शोमरोन व्यक्तिचा संकेत येशू ख्रिस्तांकडचा होऊ शकतो, ज्यांना ठेचाळले गेले आणि सोडून

त्यागून दिले गेले. (यश 53:3). असहाय ते शोमरोनी म्हणून बोलाविले गेले (योहान 8:48,49). मनुष्य जे स्वतः करू शकत नाही, ते येशू त्याच्यासाठी करितात - पाप क्षमा देतात, अनंत जीवन देतात (19:10; योहान 3:16,17; 10:27,28). **36,37**

**10:36,37** हे गहन आध्यात्मिक सत्य आपण शिकतो, पण धार्मिक लोकांना येशू जे शिकवू इच्छीतात, ते आपण विसरता कामा नये. ही शिकवण अतिशय व्यावहारिक आहे, आपण सर्वांवर प्रेम करावे असे येशूंना हवे आहे. आपण गरजू लोकांची मदत करावी, कोणी का असेना! (मत्त 5:43-48; योहान 13:34; रोम 13:8-10; गल 6:10; 1योहान 3:16-18). **38**

**10:38** बेथानी हे गाव यरूशलेमेपासून 3 कि.मी अंतरावर होते. मत्त 21:17; योहान 11:1 पहा. **40**

**10:40** मार्क 4:38. ती येशूंवर राग प्रगट करीत होती. तिला ठाऊक नव्हते की त्यांच्याजवळ किती मोठे ह्रदय आहे, त्यांना पूर्ण दुनियेची कशी चिंता व काळजी आहे. ती केवळ दैहिक कार्याविषयी विचार करीत होती. तिचे शब्द दर्शवित होते की जणूकांही ती येशूंना म्हणते आहे की माझ्यावर दया दाखवा. **41,42**

**10:41,42** दैहिक किंवा भौतिक कार्य, घरघुती कार्य बेकार किंवा व्यर्थ आहेत असे येशूंना म्हणावयाचे नव्हते; जी गोष्ट त्यांहून महत्वाची आहे त्यांवर ते भर देत होते. फार थोडा समय त्यांच्याबरोबर राहून, मर्यादित समयांत त्यांना पुष्कळ कांही शिकवायचे होते. मरीयेने त्या संधिचा लाभ घेतला पण मार्था दुसऱ्या कामात मग्न राहिली.

## 11 1

**11:1** प्रार्थना करित राहणे ही येशूंची सवय झाली होती. लूक ही गोष्ट वारंवार सांगतो, इतर सुवार्तेत याविषयी तेवढे नाही (5:16). त्यांची विनंती दर्शविते की त्यांना प्रार्थनेविषयी किती थोडके ठाऊक होते, कदाचित ते येशूंचे प्रार्थनामय जीवन पाहात होते आणि त्यावरून त्यांना देखील व प्रेरणा मिळाली असावी. विश्वासू प्रार्थनेचे महत्व कदाचित समजू लागले होते (रोम 8:26). जर आपण प्रार्थना करणे शिकलो तर जगाचे सर्वाधिक महत्वाचे आणि आवश्यक काम शिकून घेऊ. 18:1-7; उत्प 18:32; मत्त 6:5-13; रोम 8:26,27; इफि 1:17; 6:16; फिलि 4:6,7; कल 1:9; 1थेस 5:17; इब्री 4:16; 10:19-22; 11:6; याकोब 1:5-8; 5:16-18; 1योहान 5:14,15. **2-4**

**11:2-4** मत्त 6:9-13 .

*"जे आमचे नुकसान करितात"*- अर्थात त्यांचा व्यवहार. **5-8**

**11:5-8** ही गोष्ट प्रार्थनेच्या आवश्यकतेवर भर देते आणि तसेच प्रार्थनेच्या एका खास पैलूवर देखील अर्थात धीर ठेवण्यावर आपण स्वतःहून कोणाचीहि मदत करू शकत नाही, जो सर्वकांही परमेश्वर(परिपूर्ण)आहे, त्याच्याजवळ आपण येतो. प्रभूंजवळ येणाऱ्याची मदत प्रभु करितो पण ते आपला विश्वास पारखतात. मत्त 15:21-28; 1पेत्र 1:6,7; इब्री 11:6; यिर्म 29:13. परमेश्वरावर प्रेम करित गेल्याने, आपण एकसारखी प्रार्थना करीत राहिल्याने हळूहळू परमेश्वरांच्या इच्छेनुसार प्रार्थना करण्याच्या स्थितीत आपण पोचतो. **8**

**11:8** *"कळकळीची विनंती आणि आग्रह"*- वचन 9-13 या वचनांवरून स्पष्ट कळते. मत्त 7:7-11; रोम 8:32; फिलि 4:19. **11**

**11:11** मत्त 7:9. **13**

**11:13** मत्त 7:11 यात "पवित्र आत्म्याविषयी" लिहिले आहे "चांगली उत्तम दानें" येथे येशू या विशेष महत्वाच्या गोष्टीवर भर देतात आणि जगातील सर्वात मोठया बक्षिसाची प्रतिज्ञा करितात, पवित्र आत्मा दिला जाण्यापूर्वीच ही प्रतिज्ञा केली होती (योहान 7:39). येशूंच्या प्रत्येक विश्वासूजवळ पवित्र आत्मा आहे - रोम 8:9. जर शंका असेल तर या वचनांच्या शब्दांकडे विशेष लक्ष दया. ही प्रतिज्ञा कदाचित पवित्र आत्म्याच्या विपुलतेसाठीचीदेखील आहे आणि त्यावरून परमेश्वराचे मन आणि दयाळू चरित्र देखील प्रगट होते. खात्रीने परमेश्वरावर भरंवसा केला जाऊ शकतो (आत्म्याची विपुलता - योहान 7:37-39; प्रेषि 1:5; इफि 5:18 चे नोट्स). परमेश्वराच्या अनेक "बक्षिसांपैकी" हे एक आहे, एका लहान बाळकाप्रमाणे आपण येशूंजवळ यावे. (1योहान 5:14,15). 11:14-23 मत्त 12:22-30. **16**

**11:16** वचन 29; मत्त 12:28. **24-26**

**11:24-26** मत्त 12:43-45. **27,28**

**11:27,28** लोक आर्शीवादित आणि धन्य कसे होतात याविषयीच्या येशूंच्या शिकवणुकीकडे बारकाईने लक्ष दया. हा कोणत्याच प्रकारचा दैहिक किंवा नाते असलेला संबंध नाही. मग आपण आर्शीवादीत होतो कसे? प्रियांनो परमेश्वराच्या गोष्टींचे पालन केल्याने, त्यांवर खास ठेविल्याने आणि वैयक्तिक संबंध राखून ठेवल्याने ते शक्य होते .

*"आर्शीवादित"*- उत्प 12:1-3; गणना 6:22-27; अनु 28:3-14; स्तो 1:1; 119:1; मत्त 5:3-10; प्रेषि 3:26; गल 3:14; इफि 1:3. **29-32**

**11:29-32** मत्त 12:38-42. **34-36**

**11:34-36** मत्त 5:15; 6:22,23. **35**

**11:35** जेथे आवश्यक आहे तेथेच येशू लोकांच्या जबाबदारीवर भर देतात, त्यांवर विशेष प्रकाश पाडतात. याठिकाणी प्रकाशाचे तात्पर्य सत्य आणि आध्यात्मिक समज किंवा ज्ञान आहे. परमेश्वर प्रत्येकाला प्रकाश देतो, परंतु मनुष्य मात्र प्रकाशाऐवजी अंधारातच आनंदी असतो, त्याला उजेड नको अंधारच प्रिय वाटतो. लोक प्रकाश सोडून, अंधाराकडे वळू शकतात. योहान 1:9; 3:19-21; 8:12; 12:46; रोम 1:18-23,25 शी तुलना. **37**

**11:37** 7:36; 14:1. परूशी सामुहिक गटाच्या रूपांत येशूंचे विरोधी होते. पण वैयक्तिक रूपांत त्यांच्यापैकी कांहीजण येशूंविषयी उत्सुक आणि येशूंच्या उपदेशांसाठी भुकेले होते - पहा योहान 3:1,2. **38**

**11:38** मत्त 15:2. **39,40**

**11:39,40** मत्त 23:25,26. **41**

**11:41** त्यांना आंतरिक लोभ आणि दुष्टात्म्यांपासून मुक्ति प्राप्त करण्याची गरज होती; तसे केल्याने ते गरीबांचे सहाय्य करू शकतील. हीच गोष्ट येशू श्रीमंत, तरूण अधिकाऱ्यांशी करू इच्छीत होते. (मत्त 19:21-24). ज्या लोकांचे आंतरिक परिवर्तन झाले आहे आणि ज्यांची अंतःकरणें बदलली आहेत ते बाहय रीतिविधींची पर्वा करणार नाहीत. **42**

**11:42** मत्त 23:23. **43**

**11:43** 23:6,7. **44**

**11:44** मत्त 23:27,28. लोकांचा असा विचार होता की कबरेवरून चालत गेल्याने ते अशुद्ध होतात. हे धार्मिक लोक स्वतःला दुसऱ्यांपेक्षा उत्तम समजत होते, त्यांच्या गर्विष्ठपणावर चांगला वार केलेला होता. **45**

**11:45** *"एक विद्वान"*- 10:25 चे नोट्स. त्याचा विवेक असे म्हणत होता काय की परूश्यांसारखेच ते लोकसुद्धा आहेत? **46**

**11:46** मत्त 23:4. **47,48**

**11:47,48** मत्त 23:29-32. **49**

**11:49** मत्त 23:34 शी तुलना. **50,51**

**11:50,51** मत्त 23:35,36. **52**

**11:52** ते शिक्षक होते; असे शिक्षक ज्यांचे ऐकण्यास लोक उत्सुक होते. शिकविणे हा त्यांचा व्यवसाय होता. खरे आणि सत्य आध्यात्मिक ज्ञान देण्याऐवजी त्यांनी परमेश्वरीय गोष्टींना वेडे-वाकडे करून तोडून टाकिले आणि लोकांपासून सत्य लपवून ठेविले. परमेश्वरीय सत्याचा त्यांनी चुराडा केला. ते स्वतःहि आत प्रवेश करीत नव्हते आणि जो प्रवेश करू इच्छीतो त्यांला देखील अडवीत होते. असे करणारे केवळ तेच लोक नव्हते. **53,54**

**11:53,54** त्यांनी पश्चत्ताप करावयास हवा होता, पस्तावा होऊन त्यांनी येशूंच्या चरणाशी लोटांगण घालावयाचे होते, लाजिरवाणे व्हावयाचे होते, हाय-तोबा करावयाची होती. या विपरीत त्यांनी आपले मन कठोर करून घेतले, कारण त्यांच्याठायी गर्व आणि स्वधार्मिकता भरलेली होती.

## 12 1

**12:1** मत्त 16:6,12. **2,3**

**12:2,3** मत्त 10:26; मार्क 4:22; इब्री 4:13; स्तो 33:13-15; 139:11,12; नीति 5:21. **4,5**

**12:4,5** मत्त 10:28; इब्री 10:31. **6,7**

**12:6,7** मत्त 10:29-31. **8,9**

**12:8,9** पहा 9:26; मत्त 10:33; 8:38; रोम 10:9,10. केवळ तोंडाने अंगिकार केल्याने लोकांना मुक्ति मिळत नसते, परंतु लोक विश्वास ठेवितात आणि त्यांच्यावर प्रभु-कृपा असल्यामुळे त्यांना मिळते. (इफि 2:8,9). ज्या लोकांना पापांची क्षमा मिळते तेच लोक ख्रिस्तांचा अंगिकार करितात. येशूंना स्वीकार करण्याचे, ग्रहण केल्याचे हे एक चिन्ह आहे. **10**

**12:10** मत्त 12:31,32. **11,12**

**12:11,12** मत्त 10:17,19. **14**

**12:14** *"न्याय करणारा"*- येशू या कारणास्तव आलेले नव्हते. योहान 3:17, 12:47. दुसऱ्यांदा जेव्हां येशू येतील तेव्हां ते न्याय करतील - प्रेषि 10:42; 17:31; 2तीम 4:1. **15**

**12:15** लोभाविषयीची सावधगिरी आजही तितकीच बरोबर व अपेक्षित आहे. 6:20; मत्त 19:23,24; 1करिं 6:10; इफि 5:3,5; कल 3:5; 1तीम 6:9-11. **16**

**12:16** *"दाखला"*- हा दाखला केवळ लूकच्या सुवार्तेत आढळतो. हे सत्य संपूर्ण बायबलमध्ये आढळते - मत्त

13:3, 18-23. **17-19**

**12:17-19** मनुष्याची वागणूक, त्याचा व्यवहार आणि चरित्र त्याच्या शब्दांवरून कळते. पाहा, या ठिकाणी परमेश्वरांसाठी कोणत्याच प्रकारचे आभार मानलेले नाहीत, परमेश्वराला धन्यवाद दिला गेलेला नाहीच; परमेश्वरांच्या कार्यासाठीहि आभार नाहीत. दुसऱ्यांना मदत करण्याविषयीहि कांहीच उल्लेख नाही. मनुष्यप्राणी केवळ स्वार्थी आहे, स्वतःविषयी, स्वतःपुरताच विचार करणारा आहे, स्वतःच्या आमोद-प्रमोदाविषयी मर्यादित राहणारा आहे. **20**

**12:20** त्याचा विचार होता की तो खूप बुद्धिमान आहे, परंतु जो स्वतःला ज्ञानी समजतो त्याला परमेश्वर मूर्खात काढतो, मूर्ख ठरवितो (यश 55:8,9) दुष्ट मनुष्याला जे बरोबर आणि उत्तम वाटते ते परमेश्वराच्या दृष्टीत घाणेरडे आहे (लूक 16:15). स्वार्थीपणा बाळगणे हा मूर्खपणा आहे. आपल्या विचारांतून आणि योजनांतून परमेश्वराला बाजूला करणे हा शुद्धमूर्खपणा आहे. आम्ही खूप खूप वर्षे आपल्या इच्छेने जगूं शकतो, असा विचार करणे मूर्खपणा आहे. (याकोब 4:13-17). जसे येशूंनी सांगितले तसेच करणे म्हणजे शहाणपणा आणि बुद्धीमानी आहे, मत्त 6:19-21. **21**

**12:21** बायबलमध्ये हीच एक जागा आहे, जेथे "परमेश्वराच्या दृष्टीत श्रीमंत" हा शब्द आलेला आहे. वचन 33,34; नीति 19:17; हे "स्वतःच्या दृष्टीत श्रीमंत" याच्या अगदी विपरीत आहे. (वचन 17-19). **22-31**

**12:22-31** मत्त 6:25-33 पहा. **29**

**12:29** विश्वासूंचे लक्ष केवळ परमेश्वर आणि त्याच्या राज्यावर खिळलेले असावे. लक्ष केंद्रिंत करण्याचे दोनच मुद्दे असावेत. (1) परमेश्वर (2) परमेश्वराचे राज्य. पहा कल 3:1,2; फिलि 3:19,20 शी तुलना. **32**

**12:32** याचा अर्थ असा आहे की जीवनाच्या गरजा भागविण्यासाठी परमेश्वरावर अवलंबून राहण्यास संकोच करू नये, भिऊं नये; कारण परमेश्वर कधीच आपल्या लोकांना निराश होऊं देणार नाही; त्यांची जी आवश्यकता असेल ते त्यांना देईलच. रोम 8:32; फिलि 4:19. **33**

**12:33** पहा 3:11; 6:30; 11:41; 14:33; 18:22,28. स्वर्गीय संपत्ति सदैव कायम आणि स्थिर असते. **34**

**12:34** मत्त 6:19-21. **35**

**12:35** मत्त 25:1-13 यातील दाखला पहा. **37**

**12:37** मत्त 24:42,46; 25:13. **38**

**12:38** येशूंच्या येण्याकडे केलेला हा इशारा आहे. राजांचे राजे आणि प्रभूंचे प्रभु जेव्हा दुसऱ्यांदा येतील त्यावेळची कल्पना करा. येशूंना शिष्यांबरोबर सेवा करणे नेहमी आवडत असे, त्यांत त्यांना समाधान मिळत असे 22:27; मत्त 20:28; योहान 13:4,5,12-16. वैभवाने पुन्हा येत असतांना त्यांच्यात कोणताच बदल होणार नाही. जे लोक येशूंचे सेवक आहेत, त्यांनी देखील इतकेच लीन-दीन असावे. **39-41**

**12:39-41** मत्त 24:43-51. **47,48**

**12:47,48** न्यायाच्या दिवशी हे पाहिले जाईल की लोकांनी संधी आणि प्राप्त झालेल्या ज्ञानाचा किती फायदा घेतला. **49**

**12:49** बायबलमध्ये आग याचे अनेक अर्थ आहेत. निर्ग 3:2; 13:21; 19:18; अनु 32:32; स्तो 18:8; मत्त 3:11

याठिकाणी

*"आग" याचा अर्थ आहे, छळ आणि वेदना, पीडा, समस्या ज्या सुवार्ता गाजविण्याशी जुळलेल्या आहेत. "आग"-* याद्वारे इतर गोष्टींकडे संकेत होऊं शकतो - स्तो 66:12; यश 43:2; उपदेशक 1:13. पण प्रश्न हा आहे की अशाप्रकारच्या अग्निची अपेक्षा येशू कां करितात, उत्तर आहे, यासाठी की त्यांना माहित आहे की ते त्यांचे राज्य आणि त्यांचे सत्य गाजविण्याच्या कार्याशी निगडीत आहे. **50**

**12:50** येथे बाप्तिस्म्याचा आशय असा आहे की, ते दुःख वेदना आणि मृत्यु ज्यांमध्ये येशू बुडणार होते .

*"पेचांत"-* परमेश्वरीय दाब येशूंनी अनुभविला, मनुष्य प्राण्याची मुक्ति त्यांत समाविष्ट होती. केवळ याच एका दाबामुळे येशूंनी प्रत्येक प्रकारचे दुःख आणि शेवटी पापी लोकांच्या क्षमेकरिता मरण सुद्धा स्वीकारिले. **51-53**

**12:51-53** मत्त 10:34-36. **54**

**12:54** *"पश्चिम"-* म्हणजे भूमध्यसागरावरून वर येणारा ढग, ज्यामुळे आर्द्रता अनुभविली जाते. **55**

**12:55** दक्षिणेचा वारा, वाळवंटातून वाहात असतो. **56**

**12:56** आध्यात्मिक सीमेतील बदल (चिन्ह) अगदी तसेच स्वच्छ ठळक दिसतात जशी भौतिक सीमेतील बदलाची चिन्हें; असे येशू येथे सांगत होते. पहा 7:18-23. **57**

**12:57** वचन 54 - लोकांना याविषयीची परवानगी दिली जाऊं नये की दुसऱ्यांनी काय विचार आणि कसा विश्वास करावा; येशू उद्धारकर्ता आहेत, आणि परमेश्वराचे पुत्र आहेत, याचे प्रमाण स्पष्ट दिसत होते. दुःखाची बाब हीच आहे की अधिकांश लोक आपला निर्णय स्वतः घेणार नाहीत, येशू काय प्रमाण देतात हे स्वतः ठरविणार नाहीत, पण ते दुसऱ्या लोकांच्या किंवा गुरूंच्याद्वारे मार्ग भटकून दुसऱ्या दिशेकडेच जातात (मार्ग सांपडत नाही). **58,59**

**12:58,59** या वचनांचा अर्थ मत्त 5:25,26 पेक्षा वेगळा होऊ शकतो. याविषयीचा संदर्भ (49-57) आपल्याला तसा विचार करावयास लावतो. न्यायाधीशाचा संकेत परमेश्वराकडे असू शकतो, कारण परमेश्वर सर्वांचा न्याय करणार आहे. परमेश्वर, "विरोधकाच्या" भूमिकेत असूं शकतो, कारण परमेश्वरीय नियम सर्वांना दोषी ठरवितात. (तुलना करा - इफि 2:13-17; कल 2:13,14) किंवा शक्यतोवर येशू, ज्यांच्याशी यहूदी नेहमी झगडत असत. "तुरूगांत"- नरकाकडे केलेला इशारा आहे. (तुलना - 2पेत्र 2:4; यहूदा 6). आध्यात्मिक शिकवण - परमेश्वर, त्याची इच्छा आणि त्याच्या पुत्राशी मेळ करून घ्या; जोपर्यंत संधी उपलब्ध आहे त्याचा लाभ घ्या, अशी आहे. (2करिं 5:18-21).

## 13[1]

**13:1** "पिलात" - मत्त 27:2. ही घटना कोठेच आढळत नाही. यांत आपल्याला पिलाताचे चरित्र दिसते. ज्यावेळी ते मंदिरात/आराधनालयांत आराधना करीत होते त्याचवेळी त्याने, त्या लोकांचा घात केला. त्याविषयीचे कोणते कारण दिलेले नाही. **2,3**

**13:2,3** जेव्हां लोकांवर संकटाचे डोंगर कोसळते तेव्हां आपण असा विचार करितो की ते दुसऱ्यांपेक्षा अधिक

वाईट होते म्हणून असे झाले. पहा ईयोब 4:7-9; 8:3. कांही घटनांविषयी असे म्हटले जाऊं शकते (2पेत्र 2:5-7). पण या गालीलकरांविषयी असे म्हटले जाऊं शकत नाही. दुर्घटनांपासून आपण शिकावे असे येशूंना हवे आहे. म्हणजे आपण अंतःकरणाच्या पालटाची गरज समजून घ्यावी आणि स्वतःला दुसऱ्यांपेक्षा अधिक योग्य, ज्ञानी व उत्तम समजूं नये. विपत्ति कोणांवरही येऊं शकते. मत्त 3:2 यांत 'परिवर्तन' वरचे नोट्स पहा. 4

**13:4** शिलोह बुरूज यरूशलेमेत होता (नहे 3:15; योहान 9:7); या घटनेचा उल्लेख आणखी कोठेच नाही. 6-9

**13:6-9** हा दाखला वर दिलेली वचनें जोडतो आणि परमेश्वराविषयी शिकवितो. अर्थात मनुष्याच्या कार्यांवर परमेश्वरांची दृष्टि लागलेली असते आणि परमेश्वर आपल्या बुद्धि व ज्ञानानुसार न्याय करितात आणि दंड/शिक्षा देतो. पिलातासारख्या व्यक्तिचा परमेश्वर उपयोग करूं शकतात किंवा बुरूज पडण्याचा किंवा इतर आणखी कांहीही. लेवी 26:14-33; अनु 28:20-29; यहूदा 2:14,15; यश 10:5,6; यिर्म 14:11,12. 6

**13:6** अंजिराविषयी सांगतांना येशूंच्या मनांत 'व्यक्ती' आणि इस्त्राएल ही दोन्ही राहिली असावीत. मत्त 21:18-22 आणि नोट्स. ज्या माणसाचा तो बगीचा होता, तो परमेश्वराकडे केलेला इशारा आहे. जो बगिच्याची देखरेख करतो (माळी) ते परमेश्वराचे सेवक किंवा कदाचित स्वतः येशूच आहेत. आपण या गोष्टीविषयी निश्चित असावे की परमेश्वर सतत लोकांवर दृष्टि लावून असतो. कांहीना तो पृथ्वीवरून उचलून घेतात आणि कांहीकरिता मर्यादित समयापर्यंत कदाचित प्रतीक्षा करितात. असे प्रत्येक जीवन जे उत्तम फळ देत नाही ते धोक्यांत आहे - मत्त 3:10; 7:19; यश 51:1-7; योहान 15:2,6. 7

**13:7** जे लोक परमेश्वरासाठी कांहीच फळें आणित नाहीत, ते हेतूहीन लोक आहेत, असे लोक पृथ्वीवर ओझे आहेत, पृथ्वीवर ते व्यर्थ जागा घेऊन बसले आहेत; अशा लोकांना ते नेहमी असूं देतील काय? 8,9

**13:8,9** माळयाने अंजिराच्या झाडाकरिता निवेदन केले, बगिच्याची देखरेख केली आणि कांही काळ न्याय (दंड) होण्यास उशीर लाविला. पण समजा, ते अंजिराचे झाड, फळ देऊं लागले, तर त्याच्यावरचा दंड खात्रीने टाळला गेलेला असेल. उत्प 18:22-33; निर्ग 32:7-14,31,32; यहे 22:30,31. जर प्रभु येशू ख्रिस्तांनी आपल्यासाठी सतत प्रार्थना-विनंती केली नसती तर आपण कोठे राहिलो असतो, आपले काय झाले असते? रोम 8:34; इब्री 7:25. 10

**13:10** *"आराधनालय" - मत्त 4:23. "शब्बाथ"*- निर्ग 28:8-11. 11

**13:11** एक अशुद्ध आत्मा अनेक प्रकारच्या शारीरिक पीडा उत्पन्न करूं शकतो. मत्त 9:32,33; 12:22; मार्क 9:25. पण याचा अर्थ असा नाही की प्रत्येक प्रकारचा आजार, दुष्टात्म्यामुळेच असतो. 13

**13:13** मत्त 19:13; मार्क 5:23; 6:5; 7:32; 8:23; 16:18. 14

**13:14** मत्त 12:2; 9-14. 15

**13:15** कारण त्यांच्याजवळ दोन प्रकारचे जीवन होते. एक स्वतःकरिताचे आणि दुसरे इतर लोकांकरिताचे. त्यांना आपल्या जनावरांची जास्त काळजी होती, मनुष्यांची नव्हे; परमेश्वरांने मनुष्यांवर प्रेम करण्याचे सांगितले होते - लेवी 19:18. 16

**13:16** ती बाई अब्राहामाच्या वंशाची होती, अब्राहाम यहूदी राष्ट्राचा पूर्वज होता.

*"सैतान"*- इति 21:1; मत्त 4:1-10; योहान 8:44; 12:31. 17

**13:17** *"फजिती झाली"*- स्तो 25:3; 44:7; 78:66; 83:16; 132:18 **18-21**

**13:18-21** मत्त 13:31-33. **23**

**13:23** पूर्ण जनसंख्येच्या तुलनेत, एका समयी, कांही लोकच वाचू शकतील (मत्त 7:14); अर्थात मुक्ति प्राप्त करू शकतील. ज्यावेळी सर्व युगांतील आणि स्थानांतील लोकांची गणना केली जाईल त्यावेळी ती पुष्कळ होतील. तुलना – प्रकटी 7:9. **24**

**13:24** येशू सांगत आहेत की परमेश्वर किती लोकांना वाचवतील याविषयीची कल्पना कोणी करता कामां नये .

*"प्रयत्न करा"*- परमेश्वराच्या आध्यात्मिक राज्यांत प्रवेश होण्यासाठी लोकांमध्ये भूक आणि गांभीर्य असावे; कठोर परिश्रमाने व्यक्ती त्यात दाखल होऊं शकतो असा त्याचा अर्थ नाही किंवा त्याने उत्तम कार्यें केली तर त्याला प्रवेश मिळू शकतो असेही नाही. यावरून स्पष्ट होते की जे अरूंद मार्गाने प्रवेश करू इच्छीतील त्या लोकांना त्रास होईल; त्यांचा विरोध होईल. यावरून असेही कळते की जे अरूंद मार्गाने प्रवेश करणार नाहीत ते अधिकाधिक धोक्यांत राहतील, धोक्याचा सामना करतील. जे लोक प्रवेश करितात आणि संकटांना तोंड देतात,( सामना करितात) त्यांच्यासाठी काहीतरी महान आणि अद्भुत वाट पाहत आहे, असे दर्शविले जाते. मत्त 7:13,14; 11:12 पहा आणि मत्त 5:29,30 शी तुलना. **25**

**13:25** संधी नेहमी उपलब्ध असणार नाही – मत्त 25:10,11; नीति 1:20-33. **26**

**13:26** त्यांनी याविषयी सतर्क आणि सावध असावे की जी संधि त्यांच्याजवळ आहे, त्या संधिचा त्यांना लाभ घ्यावा. "वचन ऐकत राहणे पण त्यानुसार न करणे" यामुळे त्यांचा अपराध मोठा मानिला जाईल. **27**

**13:27** मत्त 7:23; 25:12. **28-30**

**13:28-30** मत्त 8:11,12; 19:30. **31**

**13:31** मत्त 14:1. त्यांनी ही कल्पना व्यर्थ केली काय, की येशूंना भीति दाखवून, धमकी देऊन ते आपला बेजबाबदारपणा खपवू शकतील? **32**

**13:32** कोल्हा एक भित्रा प्राणी असतो, परंतु येशू हेरोदालाही भीत नव्हते आणि दुसऱ्या कोणाचीच त्यांना भीति वाटत नव्हती. त्यांचे डोळे त्यांच्या लक्ष्यावर लागलेले होते. येशूंना जाणीव होती की ते काय करतील आणि त्यांच्याशी कसा व्यवहार केला जाईल; किंवा ते कसे आणि केव्हां, पृथ्वीवरचे आपले कार्य समाप्त करतील. वचन 33; मत्त 16:21; 17:22,23; योहान 7:30. **33**

**13:33** येशूंनी सहज गंमत म्हणून असे म्हटले होते. अनेक संदेष्टे यरूशलेमेंत मारले गेले होते. येशूंना पुरेपूर ठाऊक होते की ते देखील तेथेच घात केले जातील (मरण येईल). **34,35**

**13:34,35** मत्त 23:37,38.

## 14 1

**14:1** "परूशी" - मत्त 3:7. त्यांचे डोळे येशूंवर लागलेले होते, 13:10-17 मुळे .

*"शब्बाथ"*- निर्ग 20:8-11; **2**

**14:2** *"जलोदर"*- या आजारांत (हात-पाय) अवयवांवर सूज येते. **3**

**14:3** येशूंना उत्तर ठाऊक होते. 13:15,16; मत्त 12:11,12. त्यांनी लक्ष देऊन नीट विचार करावा, योग्य ते ठरवावे असे येशूंना हवे होते .

*"शास्त्री"*- नोट्स 10:25. **7**

**14:7** मत्त 23:6,7. **11**

**14:11** वरील गोष्ट येशू आध्यात्मिक रीतीने लागू करितात. परमेश्वरच केवळ लोकांना मोठे-लहान करू शकतो. लोकांची वागणूक आणि व्यवहार पाहून तोतसे करितात. 11:43; 18:14; 20:46; नीति 3:34; 25:6,7; मत्त 18:4; 23:12; याकोब 4:10; 1पेत्र 5:6. **12-14**

**14:12-14** येथे एका उत्तम आणि श्रेष्ठ सिद्धांताचे पालन करण्याविषयी येशू सांगतात. पण किती लोक असे करितात? अधिकतर लोक केवळ ऐकतात, करीत नाहीत. **14**

**14:14** *"परतफेड" - ही परतफेड परमेश्वर करेल - नीति 19:17; 14:21; मत्त 10:42. "निर्दोष (नीतिमान) ठरविलेल्यांच्या पुनरूत्थाच्यासमयी"*- योहान 5:28,29; 1करिं 15:22,23,51,52; 1थेस्स 4:16; प्रकटी 20:4-6. **15**

**14:15** *"भाकर खाईल!" - म्हणजे एका मेजवानीत सामिल होणे, भाग घेणे. तुलना - यश 25:6; मत्त 8:11; 25:1-10; 26:29; प्रकटी 19:9. "परमेश्वराच्या राज्यांत"*- मत 4:17. धन्य आणि आर्शीवादीत आहेत ते लोक, या मेजवानीत भाग घेतील. पण, पुढच्या दाखल्यांत येशू ख्रिस्त संकेत देतात की अनेक लोक ही गोष्ट समजत नाही आणि त्यामुळे ते प्रीतिभोजात येण्यास नकार देतात. तुलना मत्त 22:1-14. **16**

**14:16** *"एका माणसाने"*- परमेश्वराकडे केलेला हा इशारा आहे. सर्वप्रथम येशू यहूदयांना आमंत्रण देतात. मत्त 10:6; 15:24; रोम 1:16; त्यानंतर सर्व लोकांना आमंत्रण दिले गेले - मत्त 28:18-20; मार्क 16:15; लूक 24:46,47. **17**

**14:17** मुक्ती आणि परमेश्वर राज्याशी संबंधित असलेली प्रत्येक गोष्ट, परमेश्वराने तयार केलेली आहे. येशू ख्रिस्त स्वतः "ती मेजवानी" आहेत "भोज" आहेत. तुलना - योहान 6:27,33,35,53-58. मनुष्याला फक्त इतकेच करावयाचे आहे की त्याने परमेश्वराचे आमंत्रण स्वीकारावे आणि त्यांवर विश्वास बाळगावा. **18**

**14:18** ही एक विचित्र बाब आहे. असा कोण आहे जो मेजवानीत जाऊ इच्छीणार नाही? हे लोक असे वागत होते, जसे त्यांना एखादया समस्या असलेल्या जागेवर बोलाविले जात आहे आणि ती जागा इतकी भयंकर आहे की त्यांनी तेथे जाण्यापासून कसेकां होईना वाचून राहावयाचे आहे, दूर राहावयाचे आहे. याचे कारण खालील वचनांवरून दिसते : योहान 3:19,20; 7:7; 15:18; रोम 8:6,7; 2करिं 4:3,4; इफि 4:18. येथे पाहिल्यावर कळते की येशूंना ग्रहण करणे माणूस कसे टाळतो, काय काय निमित्त शोधतो. न पाहता, चौकशी न करीता, एखादा व्यक्ती शेत विकत घेईल काय? किंवा न पारखता, न पाहता कोण ते विकत घेईल? असा कोण समजंस पति असेल, ज्याची पत्नी त्याच्याबरोबर मेजवानीस जाणार नाही (वचन 20)? वास्तविकता ही आहे की त्यांना मेजवानीत जाण्याची इच्छाच असणार नाही. **21**

**14:21** त्या व्यक्तिला क्रोध येणे स्वाभाविकच होते. निमंत्रणाला तुच्छ लेखून लोक, नियंत्रण पाठविणाऱ्याची निंदा करीत होते. जे लोक मुक्ति आणि मृत्यूनंतर, आर्शीवादीत जीवनाला आणि स्वर्गाला तुच्छ लेखितील,

त्यांच्यावर प्रभु क्रोधित होणार नाहीत काय? पण सरतेशेवटी प्रभूंचे घर भरून जाईल, गरीब लोक, अपंग लोक, कोणी का असेना, प्रभूंचे घर विश्वासूंनी विपुल होईल; 1करिं 1:26-29. **23**

**14:23** यावरून स्पष्ट कळते की, लोकांच्या मुक्तीसाठी प्रभूंना किती उत्कंठा लागलेली असते, किती लालसा लागलेली असते, ते लोकांच्या मुक्तीसाठी किती आसुसलेले असतात. केवळ इतके पुरेसे नाही की ख्रिस्तांठायी सर्व पूर्ण करून, आपले सेवक पूर्ण जगात आमंत्रण देण्यासाठी पाठवावे. प्रत्येक मनुष्याठायी, जो सर्व प्रकारचा संकोच आहे, मुक्तीच्या प्राप्तीसाठी जी बाधा आहे, त्या सर्वांवर विजय प्राप्त करण्यासाठी प्रभु सर्व प्रकारच्या मार्गाचा, पद्धतींचा अवलंब व उपयोग करितात. महान सृष्टीकर्ता, निर्मिती करणारे स्वामी आपल्या रचनेला, निर्मितीला (मनुष्य) म्हणतात की त्यांनी आर्शीवादीत होण्याकरिता त्यांच्याकडे यावे. त्यांच्यात आध्यात्मिक समजंसपणा असता तर त्यांनी मुक्ति मिळविण्यासाठी आपली भूक-तहान दाखविली असती. (यश 55:1-3; यहे 18:30-32; 2करिं 5:18-21). **24**

**14:24** ही सूचना, ही ताकीद यहूदी राष्ट्रासाठी होती जे सतत येशूंना अमान्य करीत होते, त्यांना नकार देत होते (मत्त 21:43). इतकेच केवळ नव्हे तर ते दुसऱ्यांना जे येशूंचे होऊ पाहात होते त्यांना दिशाहीन करीत होते, त्यांची वाट चुकवीत होते. **25**

**14:25** येशूंना नीट ठाऊक होते की त्या लोकसमुदायांत सगळेच काही येशूंचे शिष्य नव्हते आणि शंकाच नाही की ते 16-23 च्या बाबींविषयी चुकीचा अर्थ लावित होते. त्यांना कदाचित वाटले असावे की शिष्यत्वाच्या अटी काही विशेष कठीण नाहीत आणि म्हणून येथे येशू त्यांची ही चुकीची धारणा, समज दूर करण्याचा प्रयत्न करीत होते. ज्या लोकांना येशूंचे शिष्य व्हावयाचे आहे, त्यांची आज्ञापालन करावयाची आहे, त्यांच्यासाठी तीन गोष्टी आवश्यक आहेतः (1) दुसऱ्या लोकांप्रति शिष्यांचा व्यवहार बरोबर योग्य असावा. (वचन 26). (2) आपल्या स्वतःप्रति त्याचा व्यवहार उचित असावा (वचन 26-27). (3) त्याचा व्यवहार दुसऱ्या वस्तूंप्रति योग्य असावा (33). या अटी अंतःकरणातील व्यवहार आहेत आणि अंतःकरणातील परमेश्वराची कार्ये त्याद्वारे प्रगट होतात. स्वाभाविक रीतीने हा व्यवहार माणसाठायी नसतोच. पण तो पवित्र आत्म्याने उत्पन्न होतो. शिष्यत्वाच्या अटींचे बुद्धि, ज्ञान, शिक्षण, समाजातील स्थान, राष्ट्रीयता आणि इतर दुसऱ्या गोष्टींशी कांहीएक संबंध नाही की देणेघेणे नाही. **26**

**14:26** येशूंना शिष्याच्या अंतःकरणात आदय (प्रथम) स्थान हवे आहे. पहा मत्त 10:37. हा क्रम अशा प्रकारचा आहे : प्रथम ख्रिस्त, मग दुसरे आणि सर्वात शेवटी स्वतः असणे. येशूंच्या पुष्कळ लोकात हा क्रम अगदी उलटा आहे, अर्थात प्रथम ते स्वतः, मग इतर दुसरे लोक आणि सर्वात शेवटी येशू किंवा येशूंना कोणतेच स्थान नाहीच मुळी .

*"आपला बाप...माझ्याशी लळा लावावा"*- याची तुलना मत्तय 10:37 शी करा. आवश्यकता भासली तर, येशूंवर विश्वास केल्यामुळे आपल्याला आपले नातेवाईक देखील सोडावे लागू शकतील. म्हणजेच जो तसा नाही तो माझा शिष्य होऊं शकत नाही असा भाव त्यांमध्ये आहे. मत्त 5:43-48; 22:37,38 .

*"शिष्य"*- मत्त 10:1 चे नोट्स - एक सात्विक, खरा विश्वासूच केवळ खरा शिष्य होऊ शकतो. ज्या लोकांना केवळ विश्वासू होऊन राहावयाचे आहे पण शिष्य व्हावयाचे नाही ते लोक येशूंवर किंवा त्यांच्या शिकवणीवर

प्रेम करीत नाहीत असेच प्रदर्शित होते; आणि जर ते येशूंवर आणि त्यांच्या शिक्षणावर प्रेम करीत नाही तर स्वतःला विश्वासू म्हणणे बेकार नाही काय? 1करिं 16:22 पहा. 27

**14:27** मत्त 10:38; लूक 9:23. 28,29

**14:28,29** शिष्यत्व म्हणजे एक जीवन घडविणे, परमेश्वराकरिताचे एक खरे सात्विक जीवन (मत्त 7:24). ख्रिस्तांच्या अटी पूर्ण न करू शकणारे विश्वासू मजबूत होणार नाहीत आणि सर्वकांही पूर्ण करू शकणार नाहीत. लोक सुरवात नीट करितात, पण कायम ठेवित नाहीत, कारण प्रारंभीच त्यांचा व्यवहार खरा-योग्य नसतो. 31,32

**14:31,32** 'शिष्यत्व' एका आध्यात्मिक युद्धासारखे आहे - इफि 6:10-18. येशूंच्या अटी पूर्ण न करणारे, विजयी होणार नाहीत. सैतानाला जिंकण्याचा एकच मार्ग आहे, तो म्हणजे येशूंवर प्रेम करणे. प्रकटी 12:11 शी तुलना. 33

**14:33** प्रत्येक गोष्टीत शिष्याचा व्यवहार योग्य असावा (6:20-24; 12:15; मत्त 6:19; 1तीम 6:6-11). जोपर्यंत आपण आपले सर्वस्व देण्यासाठी तयार नसतो, तोपर्यंत आध्यात्मिक इमारत बांधण्यासाठी किंवा आध्यात्मिक युद्ध जिंकण्यासाठी परमेश्वर आपल्याला साहाय्य उपलब्ध करून देणार नाहीत. तुलना - फिली 3:7,8. हा न बदलणारा सिद्धांत होय, जे त्याग करितील, ते प्राप्त करितील, जे लोभी होऊन अधाशीपणा दाखवितील, गर्व बाळगतील, ते गमावतील (तुलना 9:24; 17:33; मत्त 10:39; योहान 12:25). येथे आणखी एक गोष्ट आहे, आपल्याजवळ जे कांही आहे ते ख्रिस्तांसाठी त्यागण्यास आपण तयार नाही तर, त्यावरून कळते की आम्ही येशू आणि त्यांचे आर्शीवाद कमी लेखितो आणि दुसऱ्या गोष्टींना जास्त प्राधान्य आणि महत्व देतो. आम्हांला ज्या गोष्टीचे प्राधान्य, किंमत, मोल आणि महत्व नाही ती परमेश्वराने आम्हांला का दयावी? तुलना - नीति 4:7; मार्क 10:21,22. 34,35

**14:34,35** मत्त 5:13; मार्क 9:50. असा आव आणणे की आम्ही येशूंचे शिष्य आहोत, त्यांची आज्ञा पाळतो आणि तरी शिष्यत्वाकरताचे गुण न बाळगणे म्हणजे असे मीठ होणे ज्या चव (खारटपणा) निघून गेली आहे. मग ते काय उपयोगाचे, याच कामाचे राहील की त्याला फेकून दिले जावे (मत्त 25:30शी तुलना). शिष्यत्वाविना असलेला ख्रिस्तीपणा, त्यागाविना असलेले ख्रिस्तित्व केवळ व्यर्थ आणि कुचकामाचेच नाही, तर ते सैतानाला हसण्याचे कारणदेखील होते. जो कोणी हे वाचतो, त्याने स्वतःला विचारावे, प्रश्न करावा की काय तो खरोखर येशू ख्रिस्तांचा शिष्य आहे? या सर्व अटी मान्य करून, काय मी त्यांचा शिष्य बनू इच्छीतो? या प्रश्नांची उत्तरें महत्वाची आहेत आणि त्यांचे परिणाम अनंत आहेत.

## 15 1

**15:1** मत्त 5:46 यांत कर वसूलणाऱ्याविषयी वाचा. दुष्ट किंवा पापी लोक त्या लोकांकडचा संकेत आहे, जे परूश्यांसारखे धार्मिक होण्याचे ढोंग करीत नव्हते. 2

**15:2** मत्त 9:11-13 पहा. येशूंनी जे करावयाचे होते ते केले, तेव्हां ते त्यांच्याविरूद्ध कुरकुर व तक्रार करूं लागले. यहे 34:2-4; जखऱ्या 11:16. परूशी - मत्त 3:7. 3

**15:3** - मत्त 13:1; 18-23. 4-7

**15:4-7** मत्त 18:12-14 चे नोट्स. 7

**15:7** मत्त 3:2 यात मन परिवर्तनाचे नोट्स. मत्त 9:13 देखील पहा. पाप्यांच्या मागे जाण्यावरून, धार्मिक गुरूंनी येशूंची निंदा केली. (पापी वचन 2). "ज्यांना" मन परिवर्तनाची गरज नाही, असे कांही लोक आहेत काय? होय, ते सर्व जे आता स्वर्गात आहेत. या जगात असे बरेच लोक आहेत ज्यांचा पालट झाला आहे, जे ख्रिस्तांजवळ आलेले आहेत. असेही बरेच लोक आहेत जे परूश्यांसारखे आहेत (18:9), त्यांना असे वाटते की त्यांना मन परिवर्तनाची, नव्या जीवनाची गरज नाहीच मुळी. 8-10

**15:8-10** कळपांतील एक मेंढरू, कळपापासून दूर जंगलात हरविले होते (वचन 4). हे नाणे बाईच्या घरांतच हरविले होते. हरविलेले नाणे आणि हरविलेले कोकरू, मुक्ति प्राप्त नसलेल्या व्यक्तिचे किंवा आध्यात्मिक जीवनात मागे जाणाऱ्या ख्रिस्ती विश्वासूचे हे दयोतक आहेत. मिळाल्यानंतर आनंद होतोच होतो, ते स्वाभाविकच आहे. 11-32

**15:11-32** मूर्खपणामुळे ते कोकरू हरविले होते. बेपर्वाईच्या वागणूकीमुळे ते नाणें हरविले होते. मुद्दामून, पूर्ण जाणीव ठेवूनच तो मुलगा आपल्या बापाच्या घरातून निघून गेला होता; कारण त्याला त्याच्या मनानुसार वागायचे व जगायचे होते - तुलना यश 53:6. 12

**15:12** हा मुलगा त्या लोकांकडे केलेला इशारा आहे, ज्यांना जगिक वस्तु किंवा आमोद-प्रमोद, लगेच-ताबडतोब हवा असतो. 13

**15:13** बापाच्या आधीनतेत, नियमांत, नियंत्रणात राहण्याची त्या मुलाची इच्छा नव्हती. परमेश्वरांच्या नियंत्रणापासून दूर असलेल्या लोकांप्रमाणे तो आपले जीवन जगतो, ज्यांना परमेश्वराचे नियंत्रण आवडत नाही ते असेच बेलगाम जीवन जगतात. त्याचे हे अनियंत्रित, परमेश्वरहीन जीवन हेच दर्शविते की त्याने आध्यात्मिक गोष्टींत/बाबींत परमेश्वराचा त्याग केलेला आहे. अशा लोकांचे सामर्थ्य, बळ, विचार व कल्पनाशक्ती, क्षमता-योग्यता आणि साधनें ही सर्र्वकाहीं केवळ नाशवंत जगिक बाबींवरच खर्च होतात. 15

**15:15** यहूदयांकरिता डुकरें फालतू आणि घृणित पशु होते (लेवी 11:7). हा मुलगा किती खोलखोल स्तरापर्यंत खाली पडला आणि नीच झाला. अशाचप्रकारे पापी मनुष्य, स्वतःला व्यर्थ अशुद्ध बाबींत अडकवून आणि फसवून ठेवित असतो. (तुलना यश 64:6; मत्त 15:18-20; 23:27; रोम 1:24; 6:19; इफि 4:17-19; 1पेत्र 1:18). 16

**15:16** या जगातील लोक अगदी तेच प्राप्त करितात ज्याची तुलना आपण डुकरांच्या भोजनाशी करू शकतो. पहा पौलाचा विचार काय आहे - फिलि 3:8. या जगात त्यांची मदत कोणीच करू शकत नाही. पापांमुळे केवळ दरिद्रता आणि नष्टता जीवनांत येते - रोम 5:6; 7:18. 17

**15:17** जे लोक परमेश्वराला सोडून देतात आणि आपली मनमर्जी करितात, वाटेल तसे वागतात ते खरोखर आध्यात्मिक वेडे आहेत (उप 9:3). त्यांनी भानावर यायची गरज आहे. त्यांच्या बापाच्या घरची आठवणच त्यांना योग्य निर्णय घ्यावयास मदत करिते. 18,19

**15:18,19** ही मन परिवर्तनाची भाषा आहे. मत्त 3:6; 1योहान 1:9. या अध्यायाच्या प्रारंभापासूनच येशू याविषयी सांगत होते. वचन 1,2,7. 20

**15:20** पहा परमेश्वर कसा आहे आणि जेव्हा पापी व्यक्ती त्याच्याजवळ येतो तेव्हा तोत्याच्याशी कसा

व्यवहार करितो, कसा वागतो. तो त्यावर रागावित नाही, तक्रार करित नाही, दंड देत नाहीत पण त्याचे स्वागत करितो.

*"मुके"*- त्याला लाथा पडण्याची गरज होती, पण त्याला प्रेम मिळाले (तुलना - यश 55:7; योहान 3:16; 6:37; इफि 2:4,5; तीताला 3:4,5; याकोब 4:8). **21**

**15:21** परमेश्वरांप्रति आपला व्यवहार संबंध पाहिला तर तो अशाच प्रकारचा असतो. प्रत्येकजण परमेश्वरांची संतान न होण्या योग्य ठरलेला आहे (स्तो 51:4,5; यश 64:6; रोम 3:9-19). या गोष्टी स्वीकार करून आम्ही आपल्या तोंडाने तसा अंगिकार करावयाचा आहे. **22**

**15:22** ज्याचे मन बदलते त्याला परमेश्वर सर्वोत्तम वस्त्र देतो - यश 61:10; जखऱ्या 3:4; रोम 3:21-24 अंगठी दर्शविते की आपला स्वीकार केला आहे आणि मा ानाच्या जागेवर आपण पोचले आहोत (उत्प 41:42; एस्तेर 3:10,12; तुलना - इफि 1:13,14,; 2:4-7). परमेश्वर पश्चत्ताप करणाऱ्याला क्षमेचे चिन्ह/खूण देतो .

*"जोडे"*- इफि 6:15 कदाचित हेच सत्य दर्शविते. **23**

**15:23** यहूदी मांसाहारी होते. त्यांच्यासाठी मेजवाणी किंवा प्रीतिभोजाच्या समारंभात वासरूपेक्षा श्रेष्ठ काहीच नव्हते. येशूंनी असे शब्द वापरलेत की त्यावरून आनंदाचा उत्सव स्पष्ट स्पष्ट प्रगट होतो. **24**

**15:24** बाप म्हणतो की मुलग ा

*"मेला होता"*- तुलना उत्प 2:17; इफि 2:1,5; कल 2:13; 1तीम 5:6. पापांत असल्यामुळे आपल्याला आध्यात्मिक मरण येते, त्याचमुळे आपल्याला नव्या जन्माची आवश्यकता भासते - (योहान 3:3,5,7). या संपूर्ण अध्यायांतून एक गोष्ट ठळकपणे समोर येते की कोणताही गुन्हेगार ज्यावेळी पश्चत्ताप करून मन बदलतो त्यावेळी स्वर्गात मोठा आनंद सोहळा साजरा केला जातो - वचन 7,10; सपन्या 3:17. प्रत्येकदा जेव्हा एक पापी परमेश्वरांकडे वळतो, तेव्हां तेव्हां परमेश्वरांसाठी तो आनंदाचा क्षण (संधी) असतो. **28**

**15:28** मोठया भावाचा इशारा इस्त्राएलाच्या त्या पुढाऱ्यांकडे आहे, जे त्यासमयी कुरकुर करित होते, जेव्हां येशू पापी लोकांना परमेश्वरांकडे आणित होते (वचन 2). या अध्यायांत येशूंनी सर्व दाखले त्यांनाच उल्लेखून म्हटले/सांगितले होते (वचन 3,8,11). पृथ्वीवरून असे लोक नाहीसे झालेले नाहीत. वचन 28-30 यांत आपण अशा लोकांचे कांही पाप पाहतो - करूणा, केल्यावरून क्रोध, जेव्हां दुसऱ्यांचे कल्याण होते तेव्हा ईर्ष्या आणि द्वेष. आपल्या पित्याच्या लहान मुलाला तो "भाऊ" देखील म्हणत नाही - वचन 30. तो मेजवानीत जाण्यास नकार देतो - तुलना 14:18; मत्त 23:13. प्रभूंच्या दृष्टीत हे पाप देखील तितकेच वाईट (नव्हे अतिशय घृणित) आहेत जितके लहान भावाचे होते. **31**

**15:31** इस्त्राएल परमेश्वरांचा खास-विशिष्ट देश होता (अनु 7:6). परमेश्वरांचे राज्य यहूदयांच्या हाती होते - मत्त 21:43; रोम 3:1,2; 9:3,5. मोठा भाऊ, त्या यहूदी धार्मिक पुढाऱ्यांकडे इशारा करितो जे येशूंच्या समयी यात होते - पहा 1करिं 3:21-23 यांत विश्वासूंविषयी काय म्हटलेले आहे. जे परमेश्वरांचे/जवळ आहे, ते त्यांचेच आहे. **32**

**15:32** वचन 24.

# 16[1]

**16:1** आरोप असा होता की त्याने प्रबंध नीट केलेला नव्हता आणि त्यामुळेच श्रीमंत माणसाचे नुकसान झाले .

*"उडवितो"*- ग्रीक भाषेत उधळया पुत्राच्या दाखल्यांत (15:13,20) हाच शब्द वापरलेला आहे. 4

**16:4** त्याने विचार केला, (निर्णय घेतला) की तो अशा लोकांना मित्र करेल, जे त्याची नोकरी गेल्यानंतर त्याचे साहाय्य करतील. 8

**16:8** तो श्रीमंत व्यापारी कारभाऱ्याच्या अप्रामाणिकपणाची/धूर्तपणाची स्तुति करीत नव्हता पण खरी गोष्ट अशी होती की त्याला अप्रामाणिकपणा आवडत नव्हता. पण त्याने ही गोष्ट नीट पारखून पाहिली, त्याकडे बारकाईने लक्ष दिले की कारभाऱ्याने किती चलाखीने आपल्या भविष्यासाठी प्रबंध केलेला होता. या गोष्टीवर येशू टिप्पणी करितात .

*"सैतानाचे संतान"*- हे जगिक लोकांसाठीचे आहे; ते लोक जे दुष्टाईने भरलेल्या जगाशी बांधले गेले आहेत, ते जे परमेश्वरांना ओळखित नाहीत .

*"ज्योतिचे संतान"*- हे ते आहेत जे जगाचा प्रकाश असलेल्या येशूंशी जोडले गेले आहेत - मत्त 5:14; योहान 12:36; इफि 5:8; 1थेस्स 5:5. जगिक लोक, जगिक गोष्टींत जास्त चतुराई/धूर्तपणा/चलाखी दाखवितात, परमेश्वरांचे लोक स्व गोष्टींत रमलेले असतात. सैतानाचे लोक पृथ्वीवरच्या आपल्या भविष्याविषयी विचार करीत असतात, त्यांच्यापैकी बहुतेक लोक, दाखल्यांतील कारभाऱ्यांप्रमाणे, मित्र करण्याकरिता/मैत्री राखण्याकरिता, संपत्तिचा, धनाचा, मालमत्तेचा उपयोग करून मैत्री जोडण्याचा प्रयत्न करितात. 9

**16:9** आपण यावरून कांहीतरी शिकावे असे येशूंना वाटते. ज्योतिच्या संतानांनी आपल्या जगिक वस्तूंचा उपयोग बुद्धीमानीने करावा, त्यांच्या जगिक मालमत्तेने दुसऱ्यांची मदत व्हावयास हवी. आपण ज्यांची मदत येथे (पृथ्वीवर) करू, तेच स्वर्गात आपले स्वागत करतील. पण दुसऱ्यांना आर्थिक मदत केल्याने आपल्याला पापांची क्षमा आणि स्वर्ग प्राप्त होईल असे मुळीच नाही. (पहा इफि 2:8,9; तीताला 3:5,6). याचा अर्थ असाहि नाही की आपण स्वर्गात संपत्ति गोळा करू शकतो (तुलना - मत्त 6:19-21; 25:34-40; स्तो 112:5,6,9; इब्री 6:10). "जगिक संपत्ति" (अधर्माचे धन) - अनुचित पद्धतीने, अयोग्य मार्गाने प्राप्त केलेल्या धनाविषयी येथे संागितले जात नाही. येथे त्याचा अर्थ आहे, ती संपत्ति जी या दुष्ट संसारात प्राप्त केली जाते, मिळविली जाते. प्रत्येक वस्तु जी या दुष्ट जगाशी जुळलेली आहे ती काही ना काही प्रमाणात (सीमेत) या जगाच्या दुष्टतेशी जुळलेली आहेच. 10

**16:10** येशू अप्रमाणिकपणाचा पक्ष घेत नव्हते, पण या विपरीत त्यांनी एक विशेष सिद्धांत पुढे मांडला - पहा प्रियांनो, कोणत्याही मनुष्याची वागणूक, व्यवहार, पद्धत ही मोठमोठया गोष्टींबरोबर लहानसहान बाबीतही दिसून पडते - पहा 19:11-26; मत्त 25:21-23. तो सिद्धांत येशू आपल्या जीवनांत कसा लागू करितात ते पहा; आपण पैशांचे काय करितो, यावरून यासंबंधी नेहमी आपली पारख होत असते. ख्रिस्ती लोक खरा सिद्धांत माहित असूनहि जर चोरी, लबाडी किंवा धोकेबाजी करीत असतील तर हा धोक्याचा इशारा (विचार) आहे. एखादयाच्या जीवनांत अप्रमाणिकपणा असला तर, "खऱ्या येशूंशी" त्याचा संबंध आहेच, यांवर कसा विश्वास ठेविता येईल? योहान 14:6? येशूंवर प्रेम म्हणजे 'सत्यावर प्रेम'. येशूंना पूर्ण प्रामाणिकपणा आणि सत्य

व्यवहाराने खूप आनंद वाटतो/होतो - 1करिं 4:1,2. भविष्यातील परमेश्वर राज्यातील विश्वासूचे पद या गोष्टीवर अवलंबून आहे की तो या पृथ्वीवर (जगात) कसे जीवन जगतो आहे? जे धनाबाबतीत आता अप्रमाणिक आहेत त्यांना भविष्य राज्यांत खूप नुकसान होईल. 11

**16:11** खरी संपत्ति आध्यात्मिक स्वरूपाची आहे, ती कायम टिकणारी आहे, ती परमेश्वराचीच आहे. त्याला ती देणारे किंवा न देणारे - एकमात्र परमेश्वरच आहेत. 12

**16:12** दुसऱ्यांच्या वस्तु म्हणजे ते सर्वकांही जे ख्रिस्तांठायी आपले होऊ शकते (1करिं 3:21-23; कल 1:12; 3:22-25). 13

**16:13** मत्त 6:24 चे नोट्स. याठिकाणी लूकाच्या सुवार्तेत जगिक वस्तूंच्या योग्य वापराची आणि विश्वसनियतेची बाब आहे. प्रामाणिक आणि बुद्धीमान होण्याचा एक मार्ग आहे - तो हा की परमेश्वरांना आपल्या जीवनाचा प्रभु व स्वामी करावे, संपत्तिला स्वामी करूं नये. 14

**16:14** आजही असे पुष्कळ लोक आहेत, जसे त्यावेळी होते. हे परूशी येशूंपासून कांही शिकण्याऐवजी त्यांच्यावर टिका करीत होते, त्यांचा उपहास करीत होते, राग प्रदर्शित करीत होते. "धन" त्यांचा प्रभु झाले होते. त्यांना वाटत होते की ही उत्तम गोष्ट आहे, पण प्रियांनो पैसा उत्तम नोकर आहे खरा पण तो वाईट स्वामी आहे. 15

**16:15** पहा 10:29; 18:9; मत्त 6:1,2,5,16. आश्चर्याची गोष्ट ही आहे की लोकांना वाटते की कांहीही करण्यासाठी आणि कोणताही विचार करण्यासाठी ते स्वतंत्र आहेत आणि त्याविषयी प्रभूंना कळणार नाही (स्तो 10:11; 64:5; 73:11; 94:7-11). या वचनाच्या शेवटी आपल्याला एक सिद्धांत आढळतो जो तोवर सत्य राहील जोवर दुष्ट आणि वाईट लोक या जगात असतील. परमेश्वरांच्या दृष्टीत त्या सर्व गोष्टी घृणित आहेत ज्या वाईट लोकांच्या मते चांगल्या आहेत.

*"संपत्तिवरील प्रेम"*- याविषयीचा परमेश्वरांना वीट आहे - परंतु दुसऱ्या इतर परिसीमेत देखील हा सिद्धांत लागू केला जाऊ शकतो, ज्यांना लोक खूप महत्व देतात. 16

**16:16** मत्त 11:12,13. 17

**16:17** मत्त 5:17,18 शी तुलना. 18

**16:18** मत्त 5:31,32. येशू परमेश्वरांच्या इच्छेच्या (नियम) त्या शक्तीचे (जोर) उदाहरण देतात, जी निरंतर चालते आहे. हे शक्य आहे की पुष्कळ परूश्यांनी आपल्या बायका सोडून दुसऱ्या स्त्रियांशी विवाह केला होता; कदाचित येशूंनी त्यामुळे हे शब्द म्हटले होते. 19

**16:19** पुढच्या वचनांत येशू ख्रिस्त एक जबरदस्त उदाहरण देतात, त्यावरून त्यांना दिलेल्या शिक्षणांवर त्यांना अधिक भर दयावयाचा होता; हा श्रीमंत गरीब अशा लोकांशी संबंधित शिकवणीचा सारांश आहे .

*"एक श्रीमंत मनुष्य"*- त्या लोकांकडे हा इशारा आहे जे दिलेल्या वस्तूंविषयी प्रामाणिक नाहीत (वचन 13), ज्यांनी संपत्तिवर प्रेम केले, त्या गोष्टींवर प्रेम केले ज्या घृणास्पद आहेत (वचन 15). जी संपत्ति परमेश्वरांनी या माणसाला दिली होती, ती प्रत्येक दिवशी स्वतःवर उधळून टाकण्याचा हा दोषी होता. हा धनाचा दुरूपयोग होता, गरीबांची मदत करण्याची कोणतीही इच्छा त्याच्यात नव्हती (वचन 21). 16:20हा योहान 11:1-44 तील लाजर नाही. 21

**16:21** लाजर पूर्णपणे असहाय होता, श्रीमंत माणसाने त्याची अजिबात पर्वा केली नाही. त्याने स्वार्थी होऊन, कठोर अंतःकरणाने भरून, परमेश्वरांच्या इच्छेविरूद्धचा व्यवहार दर्शविला, जरी येशूंनी प्रत्येक ठिकाणी गरीबांच्या मदतीविषयी म्हटले होते, निवेदन केले होते तरी लेवी 19:10; अनु 15:7,8; स्तो 41:1; 82:3; 112:9; नीति 19:17; मार्क 10:21. **22**

**16:22** *"परमेश्वरदूतांनी"*- उत्प 16:7.

*"अब्राहाम"*- उत्प 12-25. ज्या लोकांनी परमेश्वरांवर भरंवसा ठेविला, त्या लोकांचा तो बाप झाला - रोम 4:11-12. अब्राहामाचे उर दर्शविते की जसा अब्राहाम विश्वासू होता तसाच हा भिकारी विश्वासू होता. हा शब्द ते स्थळ दर्शवितो जेथे परमेश्वरांचे लोक मरणानंतर जातात. या जागेला 23:43 यांत स्वर्गलोक म्हणतात. सर्व गरीब लोक या उत्तम स्थळी जात नाहीत - केवळ तेच लोक जे ख्रिस्तावर भरंवसा ठेवितात; ज्यांच्याजवळ तसा विश्वास आहे जसा अब्राहामाजवळ होता. (रोम 4:16; 5:1). **23**

**16:23** *"नरकीय"*- ग्रीक भाषेत 'हेडीज' - जो 11 वेळा वापरला गेला. (मत्त 11:23; 16; 16-18; लूक 10:15; 16:23; प्रेषि 2:27,31; 1करिं 15:55; प्रकटी 1:18; 6:8; 20:13,14). इब्री भाषेत शिओल म्हणजे नरक असाच अर्थ आहे. नोट्स - उत्प 37:35. जे लोक क्षमा प्राप्त न करिता या पृथ्वीवरून निघून जातात, त्या सर्वांसाठी ही पीडामय जागा आहे (25). सर्वच श्रीमंत तेथे जात नाही, अब्राहाम स्वतः धनी होता (उत्प 13:2). परंतु श्रीमंत लोकांसाठी मुक्ति मिळविणे सोपे नाही - 18:24,25. श्रीमंत मनुष्य शिक्षेच्या जागी यासाठी गेला कारण त्याने आपला अविश्वास, आपल्या जीवन शैलीने व्यक्त केला (वचन 19,21). तो 12:16-21 च्या मनुष्यासारखा होता आणि त्यांच्यासारखा ज्यांच्याविषयी याकोब 5:1-5 यांत लिहीलेले आहे. तो मत्त 25:41-46 आणि 1तीम 6:9,10 चे चित्र दर्शवितो. लक्ष दया की अब्राहामापासून हा श्रीमंत मनुष्य पुष्कळ दूर होता. स्वर्ग लोक आणि नरकलोक यांत एक मोठी दूरी होती (दरा होता), परंतु लोक एका जागेवरून दुसरी जागा पाहू शकत तर होतेच पण तेथील लोकांचे ऐकूदेखील शकत होते. **24**

**16:24** ज्याने कधी कोणतीच दया-कृपा दाखविली नव्हती, तो आता दयेची भीक मागित होता; पण त्याला दया मिळाली नाही. मत्त 5:7; 7:2; स्तो 18:25,26; गल 6:7. लक्ष दया की मृत्यूनंतर श्रीमंत मनुष्य आणि लाजर (आणि अब्राहाम) पूर्ण रीती ने शुद्धीवर होते, भानावर होते. मृत्युनंतर आत्मा झोपत नाही, फक्त देह संपून जातो. **25**

**16:25** मृत्यूनंतर आणि न्याय केल्यानंतर पुष्कळ गोष्टी वर-खाली केल्या जातील (उलथा-पालथ होईल). **26**

**16:26** मृत्यूनंतर अधिक काही केले जाऊ शकत नाही, दंडाच्या जागेतून बाहेर देखील येता येत नाही. तुलना करा - मत्त 25:46. लक्ष दया - येथे पुर्नजन्माच्या सिद्धांताविपरीत येशू शिकवित होते. पहा ईयोब 11:12; योहान 3:3; 9:3; इब्री 9:27. एकदा लोक मृत्यूलोकांत गेले की, त्यानंतर ते परत उत्पन्न होणार नाहीत, जन्म घेणार नाहीत - जोपर्यंत त्यांना शरीर दिले जात नाही तोपर्यंत आत्मा वाट पाहील. योहान 5:28,29. **27,28**

**16:27,28** हेडीजमधील लोक, पृथ्वीवर राहणाऱ्या नातेवाईकांच्या मुक्तीची लालसा बाळगू शकतात, पण त्यांची विनंती ऐकली जाणार नाही. **29**

**16:29** *"मोशे आणि संदेष्टे"*- हा इशारा जुन्या करारांकडचा आहे. प्रभूंनी जे सत्य प्रगट केले, त्यावर जगातील

लोकांनी भरंवसा ठेविला पाहिजे आणि मन परिवर्तनाबरोबर परमेश्वरांकडे वळले पाहिजे. **30**

**16:30** जसे अब्राहाम म्हणतो, ही बेकार आणि व्यर्थ आशा आहे. लोकांचे वाईट मन आणि त्यांचा अविश्वास लवकर जात नाही. **31**

**16:31** ज्या लोकांनी परमेश्वरीय बाबी फेटाळल्या, ते येशूंच्या पुनरूत्थानानंतरसुद्धा प्रभावित झाले नव्हते (मत्त 28:11-15).

## 17 1,2

**17:1,2** मत्त 10:15. **4**

**17:4** मत्त 18:21,22 शी तुलना. येथे शब्द मला "क्षमा कर" याकडे लक्ष दया. **5**

**17:5** *"प्रेषित" - मत्त 10:2 .*

*"आमचा विश्वास मोठा करा"*- चारदा वेगळया समयी येशू लोकांना म्हणाले होते की तुमचा विश्वास 'लहान' आहे – मत्त 6:30; 8:26; 14:31; 16:8. येशूंनी त्यांच्या "विश्वासाची मोठी गरज"पाहिली होती, त्यांनी त्यांचा छोटा विश्वासहि पाहिलेला होता, म्हणून त्यांचे सर्व शिक्षण याच विषयावर होते, म्हणून प्रेषित अशी विनवणी करितात. **6**

**17:6** मत्त 17:20 शी तुलना. **7-10**

**17:7-10** या वचनांत कदाचित येशू विषय बदलत आहेत पण खरे पाहतां ते दाखवित आहेत की विश्वास कसा वाढविला जाऊ शकतो. आपण स्वतःला महान समजावे ही पद्धत नाही किंवा आपली छवि आणि आत्मविश्वास वाढविण्याच्या प्रयत्न करावा ही देखील रीत नाही; किंवा मनांत प्रसन्न व्हावे की परमेश्वर प्रभूंनी आमच्या सेवेकरिता आमचे कृतघ्न असावे. मोठया विश्वासाचा मार्ग आहे, स्वतःला नीट समजून घेणे (तुलना 1करिं 3:6,7; 2करिं 3:5; इफि 3:8; रोम 7:14-25; 2करिं 12:7-10). पद्धत अशी आहे की आपण स्वतःला अयोग्य समजावे, आणि हे जाणून घ्यावे की येशूंना हा अधिकार आहे की त्यांनी आम्हांला सांगावे की आम्ही काय करावे; प्रश्न न विचारता त्यांचे म्हणणे मान्य करावे. जेव्हां आपण आपला 'स्व' नाकारतो, येशूंना जीवनाचे केंद्र करितो, येशूंच्या अधिकाराप्रति समर्पण करितो, तेव्हां येशू कांहीही करू शकतात अशा विशाल वाढणाऱ्या विश्वासाची अपेक्षा करू शकतो. विश्वासूचा भरंवसा, अशक्याला शक्य करीत नाही, हे तर अशक्याला शक्य करणारे यीशू आहेत ज्यांच्यावर विश्वासू भरंवसा ठेवितो .

*"निरूपयोगी"*- नवीन करारांत आणखी एकदा हा 'शब्द' उपयोगात आलेला आहे; मत्त 25:30 यांत. जेव्हा विश्वासूच्या मनांत स्वतःविषयी योग्य समज असते, तेव्हां येशूंवरचा त्यांचा भरंवसा वाढत जातो. हे देखील महत्वाचे आहे की आज्ञापालन करणारे मन जेव्हां बायबल अध्ययन करिते तेव्हा त्याचा विश्वास वाढत जातो. **11**

**17:11** पहा 9:51. **12**

**17:12** *"कोढी"*- लेवी 13:1 चे नोट्स. बरेच लांब उभे असण्याचे कारण आपल्याला लेवी 13:45,46 यांत सापडते. **13**

**17:13** येशू ख्रिस्तांशी असे कोण बोलले? तुलना करा मत्त 8:2,3. **14**

**17:14** मत्त 8:4. **16**

**17:16** *"शोमेरोनचा"*- मत्त 10:5; योहान 4:9. **17,18**

**17:17,18** धन्यवाद किंवा आभार न माननने ही एक मोठी वाईट गोष्ट आहे, जी प्रभूंना नाराज करिते. रोम 1:21; लेवी 7:12,13; स्तो.7:17; 1थेस्स 5:18 चे नोट्स. **19**

**17:19** 7:50; 8:48; मत्त 9:22; 15:28. **20,21**

**17:20,21**

*"परूशी"*- मत्त 3:7 .

*"परमेश्वरीय शासन (राज्य)"*- मत्त 4:17; यश 11 व्या अध्यायात जसे आहे त्याप्रमाणे परूशी परमेश्वरांच्या राज्याचे बाहयचिन्ह पाहण्याची इच्छा बाळगित होते. येशूंचे उत्तर स्पष्ट सांगते की परमेश्वरांच्या राज्याचे आगमन झाले आहे; पण त्याप्रकारे नव्हे जशी त्यांची अपेक्षा होती. तुलना - मत्ती 3:2; 4:17; 5:3; 11:12; 12:28. याठिकाणी येशू परमेश्वर राज्याच्या त्या पैलूविषयी बोलत होते जे अदृश्य असून आत्म्याचे आहे. "तुमच्यामध्येच"- परूशी लोकांत किंवा त्यांच्या मनांत परमेश्वरीय शासन नव्हते, परंतु ते त्यांच्यामध्ये यासाठी होते की राजे त्यांच्याबरोबर होते, त्या लोकांबरोबर ज्यांनी त्यांना व त्यांच्या शासनाला स्वीकार केले होते. **22**

**17:22** मत्त 8:20 यांत परमेश्वरांच्या पुत्रावरचे नोट्स. ते स्वतः बापाच्या घरी निघून जातील. त्यांचे लोक समस्या, पीडा, छळ आणि संघर्ष सहन करीत राहतील, पण तरीदेखील ते येशूंच्या आगमनाची वाट पाहत राहतील. **23**

**17:23** मत्त 24:23. **24**

**17:24** मत्त 24:27. **25**

**17:25** पहा 5:35; 9:22, 43-45; 12:50; 13:32,33; मत्त 16:21; यश 53:3. **26,27**

**17:26,27** मत्त 24:37-39. **28,29**

**17:28,29** उत्प 19:1-28. **31**

**17:31** - मत्त 24:17,18. **32**

**17:32** उत्प 19:16,17. ज्यावेळी परमेश्वरांचा दंड येईल, जगिक वस्तूंच्या मागे जाणे किती व्यर्थ होईल. असे वाटते की लोटाच्या बायकोचे मन, त्या सर्व वस्तूंकडे लागलेले होते, ज्या ती सोडून जाणार होती. प्रियांनो, आपला या गोष्टीविषयीची खात्री करून घ्यावी की आपले धन योग्य ठिकाणीच असावे (मत्त 6:19-21). **33**

**17:33** मत्त 10:39. **34,35**

**17:34,35** तुलना - मत्त 24:40,41. **37**

**17:37** मत्त 24:28.

## 18 1

**18:1** विनंतीसंबंध ी

*"आपण खचून जाता, उदास होता कामां नये"*- पहा 11:3; 5-10; 1थेस्स 5:17; इफि 6:18. जेव्हां जसे हवे तसे आपले निवेदन उत्तराच्या स्वरूपात येत नाही; किंवा त्याला उशीर होतो, तेव्हां आपण हताश, निरूपाय होऊन प्रार्थना करणे बंद करू शकतो. आपल्या मनांत तसे नसले तरी सैतान तसा विचार आपल्या अंतःकरणात घालू शकतो. आपण अशा परीक्षेत पडूं नये कारण प्रार्थना बंद केल्यामुळे आपल्या जीवनात पराभवाचे आगमन होऊ शकते आणि आपल्या कामात अपयश देखील. कशीही निराशा असली तरी आपण धीर सोडूं नये, जरी जुन्या चुकांचे स्मरण होत असले आणि वर्तमानातील चुकासुद्धा असल्या तरी किंवा प्रार्थना करण्यात काहीच फायदा नाही असा विचार असला तरी आपण खचून जाऊं नये. आपली परिस्थिती, मानसिक अवस्था आणि आध्यात्मिक संघर्ष कसाही असला तरी याद राखा - प्रार्थना सोडणे ही घोडचूक आहे आणि ती चूक आपल्याला वाईटाकडे नेते, यामुळेच जीवनांत निराशा येते आणि आध्यात्मिक पतन होते. 2

**18:2** स्तो.82. 7

**18:7** परमेश्वर अन्याय करणारा न्यायाधीश आहे असे येशू म्हणत नाहीत. त्यांचा अर्थ असा आहे की जर एक अन्यायी वारंवार विनंती केल्यावर, न्याय करावयास तयार होतो, तर या जगाचे न्यायाधीश परमेश्वर, वारंवार विनंती निवेदन केल्यावर उत्तर कां देणार नाहीहा? न्यायाधीश तर प्रेम आणि तरूणेने भरलेला आहे. पण त्याचा आशय असा नव्हे की प्रभूंच्या लोकांनी कांहीही मागत राहावे, नेहमी मागत राहावे. पण प्रभूंच्या मर्जीनुसार जर ते उत्तम आणि न्याय्य मागणी करितात, योग्य मागणी करितात तर त्यांना ते मिळेल. तुलना - 1योहान 5:14,15. 8

**18:8** मत्त 8:20. येशूंचे द्‌वितीय आगमन - मत्त 16:27. येशू येण्यापूर्वीचा काळ, मोठा पीडादायक असेल, कठीण समय असेल, त्यावेळी फार कमी लोकांजवळ विश्वास असेल - (मत्त 24:9-12; 2थेस्स 2:3; 1तीम 4:1; 2तीम 4:3,4). 9

**18:9** पहा 16:15; 7:39; 5:30; नीति 30:12,13; यश 65:5; यिर्म 2:35. त्याकाळी आणि आजच्या काळी, लोक सत्याविषयी अजाण आहेत. यश 64:6; यिर्म 17:9. हे परूश्याच्या प्रार्थनेत दिसते जे 10-12 यांत आहे; हे आवश्यक आहे की लोकांनी, जसा परमेश्वर आहेत तसाच त्याला पाहावे आणि जसा ते स्वतः आहेत, तसेच जाणावे. 10

**18:10** *"कर वसूलणारा"*- मत्त 5:46. 12

**18:12** *"उपास" - मत्त 6:16. "दशांश"*- तसे यहूदयांना शिकविले होते की त्यांनी आपल्या उत्पन्नाचा दशांश दयावा - उत्प 28:22; लेवी 27:30; गणना 18:21. परूशी असेच करीत होते (मत्त 6:16; 23:23). पण त्यांनी, न्याय, करूणा, प्रामाणिकपणा आणि दोन मोठया आज्ञा सोडून दिल्या होता. मत्त 22:37-40. 13

**18:13** येथे एक लहानशी प्रार्थना आहे पण त्या माणसाच्या ह्रदयांतून निघालेली ती प्रार्थना आहे. लोकांना या ज्ञानाची गरज आहे की त्यांनी स्वतःची दुष्टाई ओळखावी आणि ही गोष्ट लक्षात ठेवावी की येशू दयाळू आहेत. एक गोष्ट लक्षांत ठेवा, आपल्या वाईटाविषयीचा आभास आणि आपली अयोग्यता, आपल्याला प्रार्थनेचे उत्तर मिळविण्याकरिता अयोग्य-अपात्र करीत नाही; पण सत्य याच्या विपरीत आहे. अशी भावना आपल्या जीवनात पवित्र आत्म्याचे कार्य दर्शविते आणि त्यामुळे प्रभु प्रसन्न होतो. पहा - स्तो.51:17; यश 6:5; 57:15;

66:2; मत्त 5:3; 6:12. ईश्वरीकृपेवर पहा - स्तो.51:1; इफि 2:4; तीताला 3:5; 1पेत्र 1:3. **14**

**18:14** म्हणजे कर वसूलणाऱ्याला परमेश्वरांने क्षमा केले पण परूश्याला नाही. परूश्या विचार होता की तो खूप धार्मिक आहे आणि कर वसूलणारा म्हणत होता की तो दुष्ट आहे. "निरपराधी (नीतिमान)" पहा रोम 1:7; 3:21-28; 4:7,8. ज्या मनुष्याने स्वतःची चूक, दुष्टाई कबूल केली, स्वीकारली, त्याच्या विरोधात असलेले सर्व आरोप संपले. येशूंचे शब्द मनुष्यांबरोबर, परमेश्वराचा व्यवहार-पद्धत दर्शवितात. प्रियांनो, आपण हे शिकलो तर फार बरें होईल (14:11; मत्त 23:12; याकोब 4:6). **15-17**

**18:15-17** मत्त 19:13-15; मत्त 18:3. **18-30**

**18:18-30** नोट्स - मत्त 19:16-29; मार्क 10:17-30. 18:31-33 - मत्त 20:17-19; मार्क 10:32-34. **31**

**18:31** जुन्या करारांतील संदेष्टयांकडे येशू संकेत करीत होते. पहा स्तो 22; यश 53; जखऱ्या 13:7. **32**

**18:32** *"गैर यहूदी"*- यहूदी सोडून इतर लोक. **34**

**18:34** पहा 9:45; मार्क 9:32; मत्त 16:22. **35-43**

**18:35-43** मत्त 20:29-34; मार्क 10:46-52. **35**

**18:35** मत्तय आणि मार्क म्हणतात की येशू ज्यावेळी यरीहो सोडीत होते, त्यावेळी ही घटना घडली. काही फरक कळतो काय? नाही, यरीहोचे जुने शहर तेथे होते, तेथे फार कमी लोक राहात असत. याच्याच दक्षिणेकडे यरीहोचे नवीन शहर बनवले होते. मत्तय आणि मार्क येशूंनी यरीहो सोडण्याविषयी सांगतात, लूक यरीहोकडे जाण्याविषयी सांगतो - नोट्स मार्क 4:1. **38**

**18:38** *"दावीदाच्या पुत्रा"*- मत्त 1:1. **42**

**18:42** येशूवर विश्वास ठेवण्याचे सामर्थ्य पुन्हा प्रगट होते (मत्त 9:22; मार्क 10:52). **43**

**18:43** लूकाच्या सुवार्तेत, परमेश्वराच्या स्तुतीचा एक खास विषय आहे - 1:64; 2:13,20; 18:43; 19:37; 24:53.

## 19 1

**19:1** पहा 18:35. हे नवीन यरीहो होते. **2**

**19:2** *"कर वसूलणारा"*- मत्त 5:46. **4**

**19:4** अनेकांच्या मते जक्कयाने झाडांवर चढून बसावे ही काही सन्मानजनक गोष्ट नव्हती आणि ते देखील केवळ एका व्यक्तिला पाहण्यासाठी. त्याने या गोष्टीची पर्वा आणि चिंता केलीच नाही की कोण त्याला पाहील किंवा त्याची थट्टा करेल. **5**

**19:5** या आधी येशू व जक्कयाची मुलाखत झालेली नव्हती, तरीपण येशूंना त्याच्याविषयी सर्वकाही माहित होते (तुलना - योहान 1:48-50; 2:24,25). येशूंना ठाऊक होते की जक्कयाचे जीवन पापांत बुडलेले होते, पण तो सत्य जाणून घेण्यास उत्सुक व भूकेला होता. त्याच्याठायी जे स्वर्गीक प्रेम होते त्यामुळे येशूंना त्याचा कळवळा आला. योहान 4:4 पहा. 2करिं 5:14 शी तुलना करा. **6**

**19:6** धार्मिक गुरू किंवा पुढारी आणि दुसरे लोक बहुधा असे वागत नाहीत. (योहान 1:11). **7**

**19:7** जक्कयाला त्यादिवशी एक नवीन स्वामी मिळाला, ज्याची त्याने निवड केली होती, तो येशूंना प्रभु म्हणाला. आजवर पैसा त्याचा स्वामी होता (16:13). सर्व श्रीमंत लोकांपैकी तो एक होता ज्याने परमेश्वराच्या राज्यांत प्रवेश केला (18:24,25). त्याने जे काही केले त्यावरून दिसते की त्याच्याजवळ विश्वास होता. जक्क्याने ते सर्व केले जे लोक करू इच्छीत नाहीत (16:14; मत्त 19:21:24). यावरून दिसते की त्याच्या अंतःकरणात कार्य झाले होते .

*"चौपट परत देईन"*- लेवी 6:1-5; गणना 5:5-7. यहूदी धर्मानुसार अधिक जास्त दयावयास तो तयार होता. त्याच्या हृदय परिवर्तनामुळे ते झाले – मत्त 3:8. मनाचा पालट, संपूर्ण बाबतीत आणि व्यवहारांत क्रांतिकारी परिवर्तन दाखवितो. विश्वासू दुसऱ्याचे जे नुकसान करितात, त्यांची भरपाई त्यांनी करावयास हवी. **9**

**19:9** पापांपासून मुक्ती आणि मृत्यूपासून जीवनाकडे नेणारा हा मोठा बदल, अचानक होतो (योहान 5:24). प्रेषि 4:12; रोम 1:16 - नोट्स. जक्कय अब्राहामाचा पुत्र होता. उत्प 15:6; रोम 4:11,16. जक्कयाने विश्वास केला होता, त्याच्या परिवर्तनाचे चिन्ह याचे प्रमाण देत होते. **10**

**19:10** *"मनुष्याचा पुत्र" - मत्त 8:20 चे नोट्स येशूंचा पृथ्वीवर येण्याचा विशिष्ट हेतू काय होता ते कळते (योहान 3:16,17); मत्त 5:17. "हरवलेले"*- 15:4-10,32; योहान 3:16. हरवलेले म्हणजे परमेश्वरापासून दूर, त्या मार्गावर चालणे जो नष्ट करितो, (यश 53:6; मत्त 7:13; इफि 4:18). जर येशूंनी हरवलेल्यांचा शोध केला नाही तर लोक कधीच शिक्षेपासून सुटणार नाहीत. **11-27**

**19:11-27** मत्तयातील 25:14-30 च्या दाखल्याप्रमाणेच हे आहे, पण काही अंशी वेगळे आहे. **11**

**19:11** *"परमेश्वराचे राज्य"*- मत्त 4:17. लोकांना वाटले होते की येशू उघड-उघड स्वतःला ख्रिस्त आणि राजा घोषित करतील, रोमी सरकारचे शासन संपवून इस्त्राएलाचे वैभव परत आणतील. येशू म्हणाले, असे कांही होणार नाही. ते जातील (वचन 12), इस्त्राएल राजा म्हणून त्यांचा कधी स्वीकार करणार नाही (वचन 14); पण ते पुन्हा परत येतील (वचन 15). या दरम्यान येशूंच्या विश्वासूंनी आपल्या सेवाकार्यात लागलेलेच राहावयाचे आहे (वचन 13). **12**

**19:12** येशू ख्रिस्तांचा जन्मअद्‌वितीय होता. पहा 1:35; मत्त 1:1. यहूदी लोकांत त्या काळांत राजा करण्याची पद्धत प्रचलित होती. हेरोद, रोम जाऊन आपला अधिकार आणि ताबा घेत असत. येशू ख्रिस्तांचा अधिकार रोमपासूनचा नसून स्वर्गापासूनचा होता (मत्त 28:18; योहान 17:2; प्रेषि 2:33-36; फिलि 2:9-11; पेत्र 3:22). ते परत येतील पण योग्यसमयी (मत्त 16:27; प्रेषि 1:22). **13**

**19:13** *"सेवक"*- ते सर्व लोक जे ख्रिस्तांचे सेवक आहेत (रोम 6:16-22), ते सगळे लोक जे येशूंवर विश्वास असण्याचा दावा करितात. श्रीमंत माणसाने प्रत्येकाला एक मोहर दिली. ग्रीक भाषेत याला शब्द 'मिना' आहे. एका मजूराची तीन महिन्याची मजूरी इतकीच असायची. मत्त 25:14-30 च्या दाखल्यांत आपण बघतो की सेवकांना खूप जास्त आणि प्रत्येकाला भिन्न प्रमाणात दिले गेले होते. कांही गोष्टी अशा जेथे ज्यामध्ये परमेश्वराचे सर्व सेवक भिन्न आहेत; काही अशा गोष्टी आहेत, ज्यांत ते सर्व समान आहेत. सर्व गोष्टींत त्यांच्या विश्वासयोग्यतेची पारख होत असते – 17:10; 1करिं 4:2. **14**

**19:14** ही घटना अरखिलसाच्या जीवनांत तीस वर्षे पूर्वी घडली होती. परंतु हा दाखला येशूंकडे संकेत करितो.

यहूदयांनी रोमी लोकांना सांगितले की, येशु त्यांचे राजे व्हावे, हे त्यांना नकोय. (योहान 19:13-16) आणि त्यांनी आपले हृदयहि बदलले नाही (1थेस्स 2:14-16). **15**

**19:15** येशू ख्रिस्तांना उघडपणे - बिन रोक- टोक राजे म्हणून घोषित केले जाईल आणि ते मोठया वैभवाने पुन्हा येतील. या दुनियेची कोणती शक्ति, कोणते बळ आणि सामर्थ्य त्यांना थांबवू शकणार नाही (प्रकटी 11:15; 19:11-16). त्यावेळी येशू आपल्या सेवकांचे मूल्यांकन करतील - 1करिं 3:12-15; 2करिं 5:10; प्रकटी 11:18. **16**

**19:16** त्याने दीन-नम्र होऊन स्वतःच्या यशाबद्दल स्वतःला जबाबदार केले नाही, पण त्या धनराशिला केले. - तुलना 17:10. **17**

**19:17** पहा 16:10 - एका लहानशा गोष्टीत त्याने स्वतःला सिद्ध करून दाखविले. त्याच्या लहान कामाच्या तुलनेत त्याला त्याचे मोठे प्रतिफळ मिळाले। जेव्हां प्रभु आपल्या सेवकांना प्रतिफळ देतील, तेव्हां ते सर्व मोठे प्रतिफळ असतील, मग त्यांचे कार्य आणि सेवा छोटी का असेना! (मत्त 10:42 शी तुलना) "नगर" तो सन्मान आणि अधिकार दर्शविते, जो पृथ्वीवर प्रगट होणाऱ्या "परमेश्वराच्या राज्याविषयीचा" इशारा आहे. तुलना 22:30; मत्त 19:28; प्रकटी 3:21; 20:6. **18**

**19:18** प्रत्येक सेवकाला समान राशि मिळाली, ज्याचा अर्थ असा आहे की ज्या गोष्टींत त्यांची पारख होत होती, त्या सर्व समान होत्या. म्हणून त्या दोन्हीत कोणते अंतर किंवा फरक होता? शक्यता ही असू शकते की पहिल्या सेवकाने खूप घोर परिश्रम केले होते. तुलना करा - 1करिं 15:10; कल 1:29; 3:23; 4:13; तसेच रोम 16:3-12 यांत विश्वासूंची सूची पहा, काहींनी परिश्रम केलेच नाही, काहींनी कमी परिश्रम केलेत आणि काहींनी खूप अधिक परिश्रम केले. **19**

**19:19** त्याचे कार्य आणि प्राप्ति इतकी अधिक नव्हती जितकी पहिल्या सेवकाची होती; म्हणूनच त्याचे प्रतिफळहि तेवढे जास्त नव्हते (प्रकटी 22:12) तरी, इतक्या छोटयाश्या कामाकरिता हे एक मोठे प्रतिफळ होते. **20-26**

**19:20-26** मत्त 25:24-30. **22**

**19:22** मत्त 25:26 सांगते की सेवक आळशी आणि दुष्ट होते आणि कदाचित ते सत्य आहे. एकतर सेवक आळशी होता आणि म्हणून मालकाच्या आज्ञांचे त्याने उल्लंघन केले (वचन 13) किंवा तो फक्त आपल्या स्वतःसाठीच काम करू इच्छीत होता. प्रभूंनी सर्व विश्वासूंना सेवेचे कार्य दिले आहे. पुष्कळ ख्रिस्ती सेवकांना तशी जबाबदारी दिली गेली पण ते केवळ आपल्यासाठीच मेहनत करितात, येशूंसाठी काहीच करीत नाही? फिली 2:21. परमेश्वरांच्या आज्ञांप्रति उदासीनता - आळशीपणा आणि आपल्या जीवनाप्रति तल्लीनता - क्रियाशीलता - या दोन्ही गोष्टी म्हणजे आज्ञांचे उल्लंघन होय (आज्ञा मोडणे). जबाबदारी/सेवा अमान्य करणे ही दुष्टाई आहे (1शमु 15:22,23). प्रियांनो लक्ष दया - या व्यक्तिला दंड यासाठी मिळाला नव्हता की त्याने काय केले होते, पण यासाठी की त्याने काय केले नव्हते - तुलना मत्त 25:41-46. **27**

**19:27** राजे आणि मुक्तीदाता या रूपांत येशूंना अमान्य करून त्यांनी आपल्या मनाचा कठोरपणा आणि शत्रुत्वाचे प्रदर्शन केले (योहान 1:11; 3:19,20; 15:18; रोम 8:7) या वचनाच्या शेवटच्या शब्दांत असल्याप्रमाणे,

न्यायाच्या दिवशी अशा लोकांचे कल्याण होणार नाही. तुलना - 2थेस्स 1:7-10; प्रकटी 19:11-16. **28-38**

**19:28-38** मत्त 21:1-9. **32-34**

**19:32-34** मार्क 11:4-6. **38**

**19:38** पहा 2:14. **39**

**19:39** मत्त 21:15,16 शी तुलना. **40**

**19:40** हा प्रसंग असा होता की प्रभुंना हेच हवे होते की आनंद-हर्ष-प्रसन्नता आणि स्तुतीचे शब्द कोठूनही/प्रत्येक ठिकाणाहून निघावित. **41**

**19:41** क्रूसावर खिळले जाणे आणि क्लेश व पीडा येशूंची वाट पाहात होते, परंतु ते कधीहि स्वतःसाठी रडले नाहीत. त्यांना "दुःखी व्यक्ती" म्हटले गेले - यश 53:3. त्यांचे "दुःखी होणे" दुसऱ्यांच्या दयनीय अवस्थेमुळे झाले; दुसऱ्यांची केविलवाणी स्थिती येशूंच्या दुःखाचे कारण झाली. **42**

**19:42** येशूंचा ख्रिस्त आणि तारक या रूपांत स्वीकार केल्याने आणि पश्चत्तापाने शांति आली असती. परंतु त्यांच्या दुष्टाईमुळे परमेश्वर त्यांना दंड देत होतो. त्यांना अज्ञानतेत ठेवणे, हा दंडाचा एक भागच होता - तुलना मत्त 11:25; 13:11-16; योहान 9:41. **43,44**

**19:43,44** पहा 24:2; 21:6; 20,24; मत्त 24:21. रोमी फौजांनी यरूशलेमेवर आक्रमण करून ते नष्ट केले. येशू ख्रिस्त परमेश्वर आहेत, परंतु यरूशलेमेच्या लोकांनी, एका अपराध्यासारखा, त्यांच्याशी व्यवहार केला, म्हणून त्यांच्यावर दंड येणे गरजेचे होते. **45,46**

**19:45,46** मत्त 21:12-16. **40**

**19:40** पहा 22:2; मत्त 12:14; 26:4; योहान 5:18; 7:1. **48**

**19:48** पहा 20:19.

## 20 1-8

**20:1-8** मत्त 21:23-27. **1**

**20:1** *"सुवार्ता"*- 2:10; 4:18; 9:6; मत्त 4:23; 9:35; मार्क 1:1. **9-14**

**20:9-14** मत्त 21:33-46. **9**

**20:9** मत्त 25:19. **13**

**20:13** मत्त 3:17. **20-26**

**20:20-26** मत्त 22:15-22. **27-40**

**20:27-40** मत्त 22:23-33. **35**

**20:35** *"येणाऱ्या दुनियेचे"*

*"तेथे"*- येणारे युग. "मेलेल्यांतून पुनरूत्थान होणाऱ्यांत"- या गोष्टीकडे इशारा आहे की जेव्हां पुनरूत्थान होते, त्या समयी काही मेलेल्यांचे पुनरूत्थान होणार नाही (ते नंतर जिवंत उठतील त्यांचे पुनरूत्थान नंतर होईल - प्रकटी 20:5) लूक 14:14; फिलि 3:11. **36**

**20:36** *"परमेश्वरांचे संतान"*(योहान 1:12,13; 1योहान 3:1,2) कधीही मरणार नाहीत - योहान 5:24,29. **37**

**20:37** निर्ग 3:2,6. **39**

**20:39** परूशी लोक जे सदूक्यांच्या विरूद्ध होते, त्यांनी असे म्हटले असावे कारण ते पुनरूत्थानावर विश्वास करीत होते - पहा प्रेषि 23:6-9. **40**

**20:40** मत्त 22:46. **41-44**

**20:41-44** मत्त 22:41-45 .

*"दावीदाचा पुत्र"*- मत्त 1:1 चे नोट्स. **46**

**20:46** मत्त 23:5-7. **47**

**20:47** मार्क 12:40.

# 21 1-4

**21:1-4** मार्क 12:41-44. **5-36**

**21:5-36** पहा मत्त 24:1-44; मार्क 13:1-27. तिन्ही सुवार्ता (मत्त अध्याय 24; मार्क 13; लूक 21); शिष्यांनी जेव्हां येशूंना प्रश्न विचारलेत, तेव्हां येशूंनी यरूशलेमेशी निगडीत/संबंधित घटनांचे वर्णन केले, त्याविषयी सांगतात. 24:3 यांत तीन परिसीमेतील प्रश्न आहेत परंतु मार्क 13:4 आणि लूक 21:7 यांत केवळ यरूशलेमेच्या नष्टतेविषयी माहिती आहे. असे वाटते की विशेषकरून लूकाच्या सुवार्तेत जास्त त्या घटनेविषयी आहे जी 70 ए.डी.यांत घडली होती; आणि मत्तयाच्या सुवार्तेत येशू ख्रिस्तांच्या द्वितीय आगमनाविषयी आणि या युगाच्या समाप्तीविषयी/अंताविषयी वर्णन केलेले आहे. **5**

**21:5** मार्क 13:1. **7**

**21:7** मत्त 24:3. **8**

**21:8** ते दावा करतील की तेच ख्रिस्त आहेत आणि असे देखील की जगाचा अंत जवळ आहे. **12-15**

**21:12-15** मत्त 10:17-20; प्रेषि 6:9,10. **16-19**

**21:16-19** मत्त 10:21,22,30,31. **20-24**

**21:20-24** मत्त 24:15-21 देखील समान आहेत. परंतु मत्तयाच्या घटनांची सुरवात "उजाडपणाच्या धक्कादायक पदार्थ" यांपासून होते; आणि शेवट महाक्लेशांत होता (वचन 21). त्याच्या लगेच नंतर येशू ख्रिस्त पृथ्वीवर परत येतात (मत्त 24:29,30). पण, याच ठिकाणी लूकच्या घटनांनी सुरवात होते, त्याच्या नंतरच फौजांद्वारे यरूशलेमेच्या नाकेबंदी पासून(वेढणे) यहूदयांची गुलामी आणि "गैर यहूदयांचा समय" प्रारंभ होतो. दुसऱ्या शब्दांत, मत्तय त्या घटनांचे वर्णन करितो ज्या या युगाच्या अंती होणार आहेत. परंतु लुक त्या गोष्टी लिहीतो ज्या 70 ए.डी.मध्ये यरूशलेमेच्या विनाशाशी संबधित होत्या (पहा 19:14-44). **22**

**21:22** *"लिहिलेले"*- म्हणजे जुन्या करारांत. **24**

**21:24** जुन्या करारांच्या समयी, अब्राहामानंतर आणि पृथ्वीवर ख्रिस्तांच्या जीवन काळात, इस्त्राएल परमेश्वराचा खास/विशेष देश होता. हा देश परमेश्वरांच्या गोष्टींचे माध्यम, आध्यात्मिक बाबी, शिक्षण आणि

नवीन प्रकाशाचे केंद्र होता. ज्यावेळी इस्त्राएलाने ख्रिस्तांना स्वीकार केला नाही त्यावेळी परमेश्वर गैरयहूदयांकडे वळले. मत्त 21:43; 28:18-20; प्रेषि 28:28; रोम 11:11-14 .

*"गैरयहूदयांचा समय"*- तोच आहे जो वर्तमानकाळी आहे (हे युग). येशूंच्या आगमनानंतर हा समय संपेल. या समयी यरूशलेम इस्त्राएलाच्या ताब्यांत आहे, पण एकदा पुन्हा गैरयहूदी याला आपल्या ताब्यांत घेतील आणि पायांनी सुडवितील - प्रकटी 11:2; जखऱ्या 14:2-4. **15**

**21:25** या वचनानंतर गैरयहूदीयांचा समय समाप्त होतो आणि या जगाचा अंत आपल्यासमोर येतो. वचन 27 च्या शब्दांनी, ज्या त्या घटनांशी जुळतात आणि ज्या वैभवाने येशूंच्या आगमनाविषयी वर्णन करतात हे जाहिर होते/कळते. मत्त 24:29 चे नोट्स. **26**

**21:26** प्रकटी 6:15-17. **27**

**21:27** मत्त 24:30. **28**

**21:28** मत्त 24:33. या युगाच्या शेवटच्या समयी जिवंत राहणारे विश्वासू हे जाणून घेतील की शेवट जवळ आहे .

*"मुक्तीचा"*- मत्त 20:28 चे नोट्स. येथे याचा अर्थ शेवटची मुक्ती असा आहे ज्याविषयी पौल रोम 8:23 आणि फिली 3:2,21 यांत लिहितो. **24-33**

**21:24-33** मत्त 24:32-35. **31**

**21:31** *"परमेश्वराचे राज्य"*- मत्त 4:17. येथे त्याचा अर्थ आहे. परमेश्वराच्या शासनाचे बाहय प्रगटीकरण किंवा राजाचे पूर्ण वैभवाने परत येणे. **32**

**21:32** *"पिढी (वंश)"*मत्तय 24:34 चे नोट्स. **34-36**

**21:34-36** हा सल्ला त्या सर्वासाठीचा होता जे 70 ए.डी च्या नाशापूर्वी जिवंत/यात होते आणि त्यांच्यासाठीचाहि जे या युगाच्या शेवटापर्यंत राहतील. पण ते संपूर्ण पृथ्वीविषयी (वचन 35) सांगत आहेत म्हणून ते कदाचित या युगाच्या अंत समयाकडे इशारा करितात. मत्तयात ते शेवटच्या समयाची तुलना नोहाच्या दिवशांशी करितात (मत्त 24:37-39). **36**

**21:36** हे शब्द दोन बाबींकडे संकेत करितात. (1) यरूशलेमेच्या नाशाचा समय (2) पृथ्वीवर परमेश्वरांचा दंड जो या युगाच्या शेवटी आहे - प्रकटी 15,16. ज्यांचा बचाव होईल ते असे असणार नाहीत जे अज्ञानी, बेपर्वा आणि प्रार्थनाहीन, निष्काळजी होते अर्थात ते ज्ञानी, प्रार्थनामय असतील. जर आपल्याला प्रभूंसमोर न लाजता आणि दंडविना उभे राहावयाचे आहे, तशी इच्छा आहे तर, आपण ख्रिस्तांत कायम असावयास हवे (1योहान 2:28). **37,38**

**21:37,38** याचप्रकारे येशूंनी या पृथ्वीवर आपले शेवटचे दिवस घालविले - लोकांना शिक्षण दिले आणि डोंगरावर प्रार्थनेत त्यांनी वेळ घालविला.

## 22 1

**22:1** निर्ग 12:1-20; लेवी 23:4-8. **2**

**22:2** *"मुख्य याजक"*- निर्ग 28:1. **3**

**22:3** योहान 13:27. नवीन करारांत दुष्टात्मा ग्रस्तांची अनेक उदाहरणें आहेत; परंतु केवळ यहूदा इस्कर्योतविषयी म्हटले गेले की, "दुष्टात्म्यांच्या प्रमुखाने, सैतानाने" यहूदांत प्रवेश घेतला. याचा अर्थ आहे की आपल्या कामांकरिता सैतानाने यहूदांला पूर्ण पूर्ण रीतिने आपल्या ताब्यांत घेतले. तरीही हे सत्य आहे की प्रत्येकजण जो ख्रिस्तांना स्वीकार करीत नाही, त्यांत कांही अंशी सैतान कार्य करीत असतो. इफि 2:2 पहा, जेथे सैतानाला "आकाशातील शक्तींचा शासक" म्हटलेले आहे. 1इति 21:1; मत्त 4:1-10; योहान 8:44; 12:31 चे नोट्स. **4-6**

**22:4-6** मत्त 26:14-16; मार्क 14:10,11; जखऱ्या 11:12. **7**

**22:7** *"बेखमीर भाकरी"*- वल्हांडणाच्या सणाबरोबर आठ दिवसांच्या समयाच्या प्रारंभाचा पहिला दिवस. **8-13**

**22:8-13** मार्क 14:12-16; मत्त 26:17-19. **15**

**22:15** वल्हांडणाचे कोंकरू त्यांच्या (लोकांच्या) सुटकेचा आणि मुक्तीकडे केलेला इशारा आहे. येशू ख्रिस्तांच्या होणाऱ्या बलिदानामुळें, ते परमेश्वराचे लोक होते आणि येशूंनी त्यांच्याबरोबर भोजन घेतांना खूप आनंद अनुभविला; त्याचा अर्थ हा होता की येशूंना दुःख सहन करावे लागेल आणि आपले प्राणहि दयावे लागतील; पण तरीही, या सर्व गोष्टींची जाणीव असतांनाही येशूंनी प्रीतिभोजाचा आनंद घेतला. **16**

**22:16** *"वल्हांडणाचे कोकरूं" किंवा येशू ख्रिस्तांचे बलिदान आध्यात्मिक रूपाने पूर्ण होणे होते (1करिं 5:7). त्यामुळे लोकांच्या आंत आणि बरोबर असलेले परमेश्वरांचे शासन शक्य झाले. आतां येशू ख्रिस्तांची स्पष्ट ठळक उपस्थिती जी त्यांच्या लोकांबरोबर व्हावयास हवी ती या युगाच्या शेवटी (अंतसमयी) पूर्ण प्रकारे होईल (प्रकटी अध्याय 19). "परमेश्वरांचे शासन (राज्य)"*- मत्त 4:17. **17-20**

**22:17-20** मत्त 26:26-29. **21**

**22:21** यावरून स्पष्ट कळते की ज्यावेळी येशूंनी प्रभु भोजाचे आयोजन केले आणि त्यांना त्यांत सहभागी केले त्यावेळी यहूदा तेथेच होता. **22**

**22:22** मत्त 26:24. **23**

**22:23** यहूदा इतका चलाख-ढोंगी होता की, कोणी त्याच्यावर संशयच घेतलेला नव्हता, त्याच्या धोकेबाजपणाची चाहूल कोणाला लागू शकलेली नव्हती. (योहान 13:26-29). **24**

**22:24** त्यांच्यातील हा विवाद (वाद) काही नवा नव्हता (पहा 9:46; मत्त 18:1; मार्क 9:33,34). तरी त्यांनी आपल्या कमी (अल्प) आध्यात्मिकतेचे आणि अपरिपक्वतेचे प्रदर्शन त्यावेळी केले जेव्हा त्यांना तसे करावयास नको होते; ज्या संध्याकाळी ख्रिस्तांना क्रूसावर खिळले जाणार होते त्या संध्यासमयी असा वाद पुन्हा उकरून काढणे, त्यावर विवाद करणे, हे माणसाला हादरून टाकणारे एक प्रकाशनच होते, जे त्यांनी सादर केले. मत्त 20:25-27 शी तुलना. **27**

**22:27** पहा मत्त 20:28; योहान 13:3-5; फिलि 2:5,7. **28,29**

**22:28,29** रोम 8:17; 2तीम 2:12; 1पेत्र 4:13 शी तुलना. **30**

**22:30** मत्त 19:28. **31**

**22:31** पेत्राचे दुसरे नांव शिमोन होते. सैतानाचा पुरेपूर विचार आणि कट होता की पेत्र आणि दुसऱ्या शिष्यांना बुचकाळयांत आणावे, गोंधळात घालून त्यांना नष्ट करावे. येथे शब्द "तुम्हांला" दाखवितो की दुसरे शिष्य त्यांत सामिल होते. शंकाच नाही की पेत्र हा सैतानाचा विशेष लक्ष्य होता. **32**

**22:32** यासमयी येशू सर्व विश्वासूंसाठी विनंती-याचना करितात. (योहान 17:9,15; इब्री 7:25; 1योहान 2:1). हेच कारण आहे प्रियांनो, की येशूंवर विश्वास ठेवणारे लोक शेवटपर्यंत विश्वासात दृढ-ठाम राहतील. आपल्यासाठी ही खरोखर किती धीर देणारी बाब आहे. तुलना - योहान 6:39-40; 10:28; फिलि 1:6; इब्री 10:38; 1पेत्र 1:5. लक्ष दया - येशूंनी म्हटले, "जेव्हां तू पुन्हां मजबूत होशील, परत वळशील", असे नाही की, "जर तू परत वळतील" येशूंना ठाऊक होते की पेत्र आणि सर्व शिष्यांसाठी त्यांनी केलेली प्रार्थना उत्तरासहित त्या सर्वांना प्राप्त होईल - योहान 11:41,42 हेच एक वैशिष्टयपूर्ण व सबळ कारण आहे की येशू ज्यांच्याकरिता प्रार्थना करितात, ते कधी नष्ट होणार नाहीत. **33,34**

**22:33,34** मत्त 26:33-35. **35**

**22:35** पहा 9:3; 10:4; मत्त 10:9,10. **36**

**22:36** येशूंनी शिष्यांना संकेत दिला होता की समय बदलत चालला आहे आणि शिष्यांचा अधिक जोरदार जबरदस्त विरोध होण्याची शक्यता आहे, नव्हे तो होईलच कारण ती काळाची गरज आहे, त्यांनी प्रत्येकवेळी किंमत मोजण्याकरिता तत्पर-तयार असावे; हे स्पष्ट करतांना येशू त्यांना असे म्हणाले .

*"तरवार"-* याचा अर्थ हा नव्हे की येशूंनी दिलेली जुनी शिकवण रदद् केली जावी आणि हिंसेचा मार्ग घेतला जावा (मत्त 5:11,12,38-41); ही बोलण्याची एक पद्धत होती की, भविष्यात भयंकर पीडा, समस्या, छळ आहे, ही सर्व सहन करण्यासाठी शिष्यांनी आपली मानसिक तयारी करावी, मनाची दृढता घेऊन त्यांना सामोरे जावे. एका ख्रिस्ती मनुष्यासाठी हत्यार भौतिक नव्हे तर आध्यात्मिक आहेत - इफि 6:10-18; 1पेत्र 4:1. पहा, मत्त 26:51,52 यांत येशूंनी हिंसेचा विरोध करून ती अयोग्य ठरविली. **37**

**22:37** यश 53:12; मत्त 5:17; लूक 24:44,45. **38**

**22:38** त्यांनी येशूंचे शब्द यथार्थात घेतले, व्यावहारिकदृष्टया घेतले. (मत्त 16:5-12; योहान 6:52). त्यांचा थंडपणा पाहून त्यासमयी येशू कांहीहि बोलले नाहीत. ही गोष्ट नंतर स्पष्ट जाहिर झाली. **39-46**

**22:39-46** मत्त 26:36-46. **39**

**22:39** ते गथशेमाने बागेंत गेले जी जैतून डोंगरांच्या पश्चिम भागात होती. **43**

**22:43** केवळ लूक याची माहिती देतो. यावेळी येशू ख्रिस्त एका भयंकर कठीण अनुभवांतून (पारख) जात होते. या अशा हादरून टाकणाऱ्या समयाला सामोरे जात असतांना त्यांचा प्राण आणि देह ही दोन्ही कमजोर झाली होती. भविष्यात येणाऱ्या कठीण स्थितीचा सामना करण्यासाठी त्यांच्यात ताकदच उरली नव्हती. परमेश्वरदूत - उत्प 16:7. **44**

**22:44** *"पीडेने" - आंतरिक संघर्ष ज्याचा परिणाम त्यांच्या शरीरांवर होत होता, याविषयीचा उल्लेख व वर्णन केवळ लूकच लिहीतो. लूक अगदी ठळक व स्पष्टपणे दाखवितो की ख्रिस्तांची वेदना किती अधिक होती. पीडेत विव्हळून त्यांची दशा पीडामय झाली होती. "प्याला"*खरोखर कडू होता. तुलना मत्त 26:38,39; योहान

18:11. **45**

**22:45** शिष्यांच्या झोपेचे कारण फक्त लूक सांगतो – येशूंच्या पीडेविषयी ऐकून आणि पाहून, ते उदास व खिन्न झाले आणि झोपी गेले. **47-53**

**22:47-53** मत्त 26:47-56. **48**

**22:48** यांत विचारलेला प्रश्न केवळ लूकच लिहितो आणि प्रश्न 49 व्या वचनांत आहे. **49**

**22:49** येशूंनी 'होय' असे उत्तर दिले नाही – वचन 36 चे नोट्स. मत्त 26:52,53. **54**

**22:54** मत्त 26:56,58. **55-62**

**22:55-62** मत्त 26:69-75; मार्क 14:69. **61**

**22:61** फक्त लूक याविषयी लिहितो. ज्यावेळी/ज्याक्षणी येशूंनी वळून पेत्राकडे पाहिले त्यावेळी येशूंची एक नजर, पेत्राच्या ह्रदयाला आरपार चिरणारी भेदणारीआणि त्याच्या ह्रदयाचे तुकडे करावयास पुरेशी होती. **63-65**

**22:63-65** मत्त 26:67,68. येशूंची थटट हेरोदाने आणि त्याच्या शिपायांनी देखील केली (23:11). जेव्हां येशू क्रूसावर खिळलेले होते तेव्हां दुसऱ्यांनी त्यांचा उपहास केला, थट्टा केली. **66-71**

**22:66-71** मत्त 26:63-66. **69**

**22:69** स्तो 110:1; प्रेषि 2:33,34; रोम 8:34; इफि 1:20; इब्री 1:3,13; 8:1; मत्त 27:1,2.

## 23 2

**23:2** वचन 14 - पहिला आरोप खोटा होता. बरब्बा एक विद्रोही बंडखोर होता. त्याला सोडून देण्याची मागणी यहूदी लोक करीत होते (19). दुसरा आरोप देखील खोटा होता – पहा 20:22-25. तिसरा आरोप देखील खोटा होता. हे सत्य आहे की येशूंनी तारक होण्याचा दावा केला होता (22:67-70 मत्त 26:63,64). परंतु या यहूदयांची आशा होती की यहूदी पिलाताची दिशाभूलकरु शकतील, त्याला गोष्टीत भटकवितील. येशूं पिलाताचे समाधान करावयाच्या प्रयत्नात होते त्यांना हे पटवून दयावयाचे होते की त्यांचे कार्य, रोमचे इस्त्राएलावरील शासन समाप्त करण्याचे नव्हते – योहान 18:33-37. **3**

**23:3** मत्त 27:11. **4**

**23:4** वचन 14,15,22; मत्त 27:23; मार्क 15:14; योहान 18:38; 19:6. **6-12**

**23:6-12** केवळ लूक या घटनांचे वर्णन करितो. अशाप्रकारे पिलाताने येशूंना दोषी ठरविण्याच्या जबाबदारीपासून सुटण्याचा प्रयत्न केला. मत्त 27:24 शी तुलना करा. **7**

**23:7** हेरोद गालीलाचा शासक होता. पहा 3:1. **8**

**23:8** 9:9. हेरोदाला केवळ उत्सुकता लागलेली होती. सत्य जाणून घेण्याची आणि त्याविषयी अभ्यास करण्याची त्याची मुळीच इच्छा नव्हती; म्हणून येशूंनी त्याला कांही म्हटले नाही (वचन 9). मत्त 14:1-11 यांत आपण हेरोदाचे चरित्र पाहातो. **10**

**23:10** त्यांनी असा निकाल लाविला की ज्याच्या हाती अधिकार आहे त्यानेच येशूंना फांशी दयावी; कोण असे करेल याची त्यांना काळजी नव्हती. पहा – योहान 18:31. **11**

**23:11** 22:63,64. पिलातासारखाच हेरोद अंधविश्वासू होता. तो देखील येशूंना दंड देण्याच्या आरोपापासून अलिप्त/दूर राहू इच्छीत होता. **12**

**23:12** ते फारच संकटात पडले होते, कारण जो व्यक्ती निरपराध होता, निर्दोष होता त्याला शिक्षा करण्याचा त्यांच्यावर दबाव घातला जात होता, त्यांना प्रेरित केले जात होते. त्या दोघांनी असहानुभूति आणि बर्बरतेचा परिचय दिला, त्यांनी आपल्या ईश्वरी कायदयाचा विरोध केला. त्यांची कमजोरी व दुष्टाई त्या दोघांना एक करू शकली नव्हती. पहा प्रेषि 4:23-30. **13-15**

**23:13-15** मत्त 27:15-26. **16**

**23:16** स्वतः पिलाताने ही गोष्ट पुन्हा म्हटली होती की येशू निर्दोष आहेत, मग त्यांना त्याने कां शिक्षा दयावी? दंडाचा अर्थ होता, निर्दयी होऊन चाबकाचे फटके देणे, ज्यामुळे कधी कधी मरण देखील होत असे – मत्त 27:26. **18**

**23:18** मत्त 27:15,16. **23**

**23:23** कायदा, बुद्धि, विवेक आणि माणुसकी यांहून अधिक दुष्टाईची वाणी घुमूं लागली; दुष्टाईचा आवाज मोठा होता. **26-49**

**23:26-49** मत्त 27:32-56; मार्क 15:21-41. **29**

**23:29** या शब्दांचा अर्थ असा होता : स्त्रियांना बाळें होऊ नयेत; त्यांनी वांझ राहिलेलेच बरें होईल, कारण जे कांही संकट यरूशलेमेवर येणार होते ते बाळकांऐवजी त्या लोकांनीच सहन केलेले बरे होईल. 19:41-44. फक्त लूकच 27-31 या वचनांच्या सत्याविषयी लिहितो. **30**

**23:30** या वचनांत येशू त्या गोष्टींविषयी बोलत होते जी 70 ए.डी.तील यरूशलेमेच्या नष्टतेविषयीची होती, जेव्हां येशू इस्त्राएलांत होते. आध्यात्मिक रूपांत सर्व कांही हिरवेगार होते – आशा होती आणि जीवन होते. येशू गेल्यानंतर, इस्त्राएलाने येशूंना स्वीकार केले नाही म्हणून ते पुन्हा कोरडे व भकास होईल, आध्यात्मिक जीवनाशिवाय वळून जाईल. **32**

**23:32** मत्त 27:28. **33**

**23:33** मत्त 27:33-35; मत्त 27:22 यांत क्रूसाविषयीची वचने. **34**

**23:34** ज्या गोष्टी येशूंनी शिष्यांना शिकविल्या, त्यांचा सराव त्यांनी स्वतः केला. मत्त 5:44 पहा असे कांही त्यांनी शिष्यांना शिकविले नाही जे ते स्वतः करीत नव्हते. येथे येशूंनी रोमी शिपायांसाठी, ज्यांनी त्यांना क्रूसावर खिळले होते, प्रार्थना केली; कारण त्यांनी व्यर्थ विचार करून घेतला होता की येशू अपराधी होते. त्यांची प्रार्थना कदाचित, तेथे जमलेल्या लोकांसाठी होती; कारण लोकांना कळत नव्हते की काय होत आहे, तरी ते मुख्य याजकाचा पक्ष घेऊन त्याला साथ देत होते. प्रार्थना अशी होती की "प्रभु मला क्रूसावर खिळले जाण्याचा त्यांचा अपराध क्षमा करावा", सर्व पापांची क्षमा नव्हे, कारण पूर्ण संपूर्ण क्षमेसाठी मनाचा पालट आवश्यक आहे (24:47; मत्त 3:2). **35**

**23:35** मत्त 27:41-43 .

*"परमेश्वराचा निवडलेला ख्रिस्त"*- यश 42:1; 1पेत्र 2:4. **36**

**23:36** स्तो 69:21; मत्त 27:48. **38**

**23:38** मत्त 27:37. **39**

**23:39** आधी दोन्ही गुन्हेगारांनी येशूंची निंदा केली (मत्त 27:44). पण एकाने येशूविषयीचे आपले मन बदलले. **40,41**

**23:40,41** हे या गोष्टीचे प्रमाण आहे की त्याच्या मनांत पश्चत्ताप होत होता. त्याने स्वतःसाठी निर्दोष असण्याचा दावा केला नाही. त्याने मान्य केले की त्याच्या गुन्यामुळे त्याला दिलेला दंड योग्यच होता. त्याने या गोष्टीचे निरीक्षण केले की येशू निर्दोष होते आणि त्यांच्याहून अगदी वेगळे होते. **42**

**23:42** त्या अपराध्याच्या मनांत येशूंसाठीचा विश्वास निर्माण झाला .आणि ही गोष्ट प्रशंसनीय होती. त्याला कळले की हा दंड झालेला आणि क्रूसावर खिळलेला व्यक्ती, इस्त्राएलाचा मशीहा होता/ख्रिस्त होता. त्याला जाणीव झाली की येशू ख्रिस्तांचे मरण हा काही शेवट नाही, परंतु येशू पुन्हा आपल्या राज्यांत येतील, शासन करतील. त्याने मान्य केले की येशू त्याच्यावर कृपाहि करतील. **43**

**23:43** *"स्वर्ग लोक"*- 16:22 चे नोट्स. अनंतकाळचा आनंद आणि आर्शीवाद देणारा हा शब्द आहे. मुक्ति मिळविण्यासाठी एखादयाला जे जे कांही आवश्यक आहे ते सर्व या अपराध्याला मिळाले. बाप्तिस्म्याशिवाय, मंडळीच्या प्रथेशिवाय, उत्तम कार्य केल्याशिवाय, त्याला मुक्ती लाभली, तो वाचला. मेल्यानंतर स्वर्ग लोकी पोहचला, कोठे त्याला प्रतीक्षा करावी लागली नाही. जर जिवंत राहिला असता तर त्याने अवश्य बाप्तिस्मा घेतला असता, चांगली कार्ये केली असती, परंतु त्याची मुक्ति हेच दाखविते की उत्तम कार्य, रीति आणि प्रथा, तारणाकरिता आवश्यक नाहीत. हे सर्वकांही प्रभूंची कृपा, विश्वास आणि मनाच्या परिवर्तनामुळे शक्य झाले. पहा इफि 2:8,9; तीताला 3:3-7. येशू. होय, केवळ येशूच कृपेचे माध्यम आहेत, तेच सर्वासाठी आशाहि आहेत. **45**

**23:45** हा अलौकिक अंधार परमेश्वरानी पाडला होता, परमेश्वराच्या द्वारे तो पसरला होता. पडदे फाटले – मत्त 27:51. **47**

**23:47** मत्त 27:54. येथे आपण आणखी एका व्यक्तिला परमेश्वराची स्तुति करतांना पाहतो. 1:46,64; 2:13. या रोमी सुभेदाराने पाहिले की येशू किती शांतिमय होऊन मरण सोसत आहेत, शेवटचा श्वास घेत आहेत आणि परमेश्वरानी कशाप्रकारे हे सत्य, स्वर्गातून चिन्ह दाखवून सिद्ध केले, तेव्हा त्याच्या तोंडून आपसुक निघाले, खरोखर, हा एक नीतिमान (सात्विक-खरा) मनुष्य होता. शक्य आहे की त्याच क्षणी त्याला ख्रिस्तांठायी एक खरा विश्वास मिळाला. **48**

**23:48** पहा 18:13. **49**

**23:49** मत्त 27:55,56; मार्क 15:40,41. **50-56**

**23:50-56** मत्त 27:57-61; मार्क 15:42-47. **51**

**23:51** लूक 2:25-38 .

*"परमेश्वराच्या राज्याची"*- मत्त 4:17. **56**

**23:56** मार्क 16:1 चे नोट्स .

*"शब्बाथाच्या...विश्राम केला"*- निर्ग 16:1-10.

# 24₄

**24:4** कधीकधी परमेश्वरदूत मनुष्याच्या रूपांत प्रगट होतात. मत्तय फक्त एका परमेश्वरदूताविषयी आणि मार्क एका पुरूषाविषयी ज्याने पांढरे वस्त्र घातले होते सांगतो ही काही विचित्र गोष्ट नाही कारण कधी कधी बोलणाऱ्याला पाहिले गेले आणि जो त्याच्याबरोबर होता, त्याचे वर्णन केले गेले नाही. मार्क 4:1 चे नोट्स. **7**

**24:7** -

*"पुन्हा"*- मत्त 16:21; 17:22,23; लूक 9:22. गालीलांत असतांना एकापेक्षा जास्त वेळा, येशूंनी शिष्यांना सांगितले होते; या स्त्रिया तेथे असतांनाहि येशू तसे बोलले होते. **9**

**24:9** मार्क 16:14. **10**

**24:10** मार्क 16:11. **12**

**24:12** कदाचित पेत्राने स्वतः अंगिकार केला की येशू जिवंत उठले असतील. योहान, पेत्राबरोबर गेला आणि जेव्हा कबरेची दशा त्यांनी डोळयांनी पाहिली तेव्हा विश्वास केला की येशू जिवंत झाले आहेत. योहान 20:3-9. **13-35**

**24:13-35** मार्क देखील याविषयी सांगतो (मार्क 16:12,13 परंतु फक्त लूकच याविषयी विस्तारपूर्वक माहिती देतो). **16**

**24:16** परमेश्वराने त्या दोघांना, येशूंची ओळख होऊं दिली नाही, पण असे वाटते की येशूंचे पुनरूत्थान असे होते की कांही लोक त्यांना ओळखूं शकले नाहीत. (वचन 31,36,37; मत्त 28:17; योहान 20:14-16,19). **17**

**24:17** कधी कधी येशूंनी असे प्रश्न विचारलेत; येशूंना त्यांचे उत्तर ठाऊक नव्हते म्हणून नव्हे, तर लोकांनी आपले विचार प्रगट करावेत, असे येशूंना हवे होते. **19**

**24:19** याच त्या सर्व गोष्टी होत्या कां कि येशू संदेष्टा होते? बाकी कोणत्याच गोष्टींवर त्यांनी विश्वास केला नव्हता का? **21**

**24:21** क्रियेचा भूतकाळ "आशा होती" वर लक्ष दयां. असे वाटते की येशूंच्या मरणांबरोबर त्यांच्या शिष्यांची आशा नष्ट झाली होती, संपली होती. **24**

**24:24** *"कबर रिकामी आहे"*हा समाचार देखील शिष्यांवर प्रभाव टाकू शकला नाही, त्यांना वाटलेच नाही की येशू जिवंत आहेत. थोमासारखे ते येशूंना पाहू इच्छीत होते (योहान 20:25). **25,26**

**24:25,26** त्या लोकांना जुन्या करारांतील संदेष्टयांनी म्हटलेल्या गोष्टी ठाऊक होत्या. त्यांनी विचार केला की ते येशूंवर विश्वास करितात, पण यांत ते मूर्ख होते आणि मंद, की तो लेख, ते विधान येशूंकडे संकेत करीत होते. जुन्या करारांतील संदेष्टयांनी येणाऱ्या ख्रिस्तांचे वैभव आणि दुःख या दोन्हीविषयी लिहिले होते – स्तो 22; यश 53; 9:6,7; 11:1-16. त्या काळांतील यहूदी लोक दुःखाशिवाय, वैभवाची आशा करीत होते. **27**

**24:27** वचन 44. आता येशू त्यांचा समज आणि कमजोरी नीट करीत होते. पहा जुना करार, येशू ख्रिस्ताच्या वर्णनाने भरलेला आहे आणि तो देखील मोशेच्या पुस्तकांपासून! जर आपण विश्वास धरिला आणि आज्ञा पाळली तर येशू ख्रिस्त आपल्याला बायबलचा पहिला भाग स्पष्ट समजावून सांगू शकतात; आणि असे ते

पवित्र आत्म्याच्या साहाय्याने करितील (योहान 14:26; 15:26; 16:13-15). **28**

**24:28** त्या दोघांना येशूंना आपल्या घरी निमंत्रण दयावयाचे होते, याशिवाय त्यांना दुसऱ्या गोष्टीत रस नव्हता - प्रकटी 3:20. त्यांनी येशूंना त्यांच्याबरोबर राहावयाचे निमंत्रण दिले, त्यांना ते कोण आहेत हे कांही ठाऊक नव्हते (तुलना - मत्त 25:34-40; इब्री 13:2). **30**

**24:30** पाहा 9:16; 22:19. **31**

**24:31** जिवंत उठल्यानंतर येशू अचानक कोठेही जाऊन पोचत असत किंवा नाहीसे होऊन जात असत, कधी कधी दरवाजा/दार बंद असतांना (वचन 36; योहान 2:19); येशूंचे शरीर तेच होते, ज्याने दुःख सहन केले होते आणि मरण सोसले होते (वचन 38-43), परंतु त्यांत बदल झालेला होता. तुलना - 1करिं 15:35-44; फिलि 3:21. **32**

**24:32** येशू ख्रिस्तांजवळ असे सामर्थ्य आहे की त्यांनी अंतःकरणाला तजेला दयावा, प्राण ताजातवाना करावा. **33**

**24:33** वचन 9. **34**

**24:34** पेत्राचे नाव शिमोन होते. तो केफा ही म्हटला जात होता (1करिं 15:5). कोणत्याच सुवार्तेत याचे वर्णन नाही. **36**

**24:36** योहान 20:19 शी तुलना करा. ते कदाचित असा विचार करीत होते की केवळ आत्माच बंद खोलीत येऊ शकत होता. **37**

**24:37** मार्क 6:49,50 शी तुलना. **39**

**24:39** क्रूसावर खिळल्यामुळे येशूंच्या हातापायांत चिन्ह होते. हे शब्द सिद्ध करितात की येशूंचे शरीर, कबरेतून निघाले होते. येशूंचे जिवंत होणे केवळ आध्यात्मिक नव्हते. तेच शरीर जे पुरले गेले होते, जिवंत झाले, आता हे शरीर जिवंत होते. हे शरीर पाहता येत होते, स्पर्श केला जाऊ शकत होता आणि ते शरीर भोजन करीत होते - वचन 42,43. **41**

**24:41** वचन 25 - आपल्या शिष्यासारखेच मनुष्य होते - त्यांना विश्वास होत नव्हता. **43**

**24:43** योहान 21:12-15. **44**

**24:44** यहूदी लोकांनी बहुधा जुन्या करारांला दोन भागांत विभागलेले होते - नियमशास्त्र आणि संदेष्टा (वचन 27; मत्त 5:17). कधी कधी तीन भागांत - नियमशास्त्र, संदेष्टा आणि स्तोत्र. आता असलेला जुना करार आणि तेव्हा असलेल्या जुन्या कराराच्या पुस्तकांच्या क्रमात फरक आहे. स्तोत्राचे पुस्तक तिसऱ्या भागाचे पहिले पुस्तक होते. आता ख्रिस्ती लोक बहुधा जुन्या कराराला चार भागांत विभाजित करितात - मोशेची पुस्तकें ज्यांत पाच पुस्तकें आहेत (उत्पत्ति ते अनुवाद), ऐतिहासिक पुस्तकें (यहोशवा ते एस्तेर); कविता-काव्य (ईयोब ते गीतरत्न) आणि भविष्यवाणीची पुस्तकें (यशया ते मलाखी). येशूंविषयीची भविष्यवाणी आणि प्रकाश; जुन्या करारांतील वेगवेगळया भागांत आहे. येशूंनी आपल्या शिष्यांना ठळक ठळक शिकविले होते - एकाच समयी नव्हे तर 40 दिवसांच्या अवधीत (प्रेषि 1:3). **45**

**24:45** आजही बायबल समजून घेण्यासाठी येशू लोकांची बुद्धि उघडितात. तुलना - योहान 16:13; इफि 1:17,18; योहान 2:20. **46,47**

**24:46,47**

*"मन परिवर्तन - पश्चत्ताप"*- 13:3-5; मत्त 3:2,8; प्रेषि 17:30. "क्षमा"- मत्त 6:12; 9:5-7; 12:31; 18:23-35; इफि 1:7; 1योहान 1:9. मनाचा पालट झाल्याशिवाय पापांची क्षमा नाही. पहा प्रेषि 5:31; 26:18. पापांच्या क्षमेसाठी येशू ख्रिस्तांचे दुःख सहन करणे, मरणे आणि जिवंत होणे आवश्यक होते. सर्व जगात सत्याचा प्रसार आवश्यक होता (मत्त 28:18-20; मार्क 16:15). सर्वात आधी यहूदी लोकांना त्यानंतर गैर यहूदीयांना - प्रेषि 1:8; 3:26. **48**

**24:48** योहान 15:27; प्रेषि 1:8. आपल्या साक्षीकरिता स्वतः दुःख भोगून मरण्याद्वारे, शिष्यांनी आपले सत्य,खरेपणा आणि प्रामाणिकता प्रगट केली (प्रेषि 5:40-42; 7:57-60; 12:1-4; 14:19,20; 2करिं 11:23-26). **49**

**24:49** पहा प्रेषि 1:4 - परमेश्वरबापाने पवित्र आत्म्याची प्रतिज्ञा केली (यश 44:3; योएल 2:28; योहान 7:37-39; 14:16,17). ख्रिस्ती सेवकांनी अशी कल्पनाहि करता कामां नये की परमेश्वराच्या सामर्थ्यावाचून ते येशूंसाठी काही करू शकतील. प्रेषितांची कृत्यें दर्शवितात की प्रभूंच्या सामर्थ्याने काय शक्य आहे/होते. पवित्र आत्मा, आध्यात्मिक बळ, सामर्थ्य आणि प्रभाव देतो, कारण मनुष्यांकडे ही सर्व जन्मजात नसतातच. **50**

**24:50** बेथानी जैतून डोंगरावर होते आणि यरूशलेमेच्या पूर्वेकडे. "त्यांना आर्शीवाद दिला"- उत्प 12:1-3; लेवी 9:22-24; गणना 6:22-27. **51**

**24:51** प्रेषित 1:9. **52**

**24:52** बायबल समजण्यासाठी त्यांचे मन उघडिले गेले. जिवंत झालेले येशू त्यांच्यासमोर होते. त्यांना कळले की येशू परमेश्वर आहेत आणि उपासना करण्यायोग्यसुद्धा आहेत. तुलना - मत्त 28:17; योहान 20:28,29. पहा, येशूंविषयी त्यांचे ज्ञान, त्यांची आराधना, त्यांचा आनंद, प्रसन्नता, त्यांना यास्तव मिळाली की त्यांनी येशूंवर विश्वास केला, तो आनंद शोधावयास ते गेले नव्हते (तुलना - 1पेत्र 1:8). **53**

**24:53** लूक पुन्हा त्याच विषयावर समाप्त करितो, ज्यावर त्याने संपूर्ण सुवार्तेत भर दिला होता अर्थात परमेश्वरांची स्तुति. (1:46,64; 2:13). आपणहीपरमेश्वराची स्तुति करू या, त्या गोष्टींसाठी ज्या परमेश्वराने येशू ख्रिस्तांत आणि त्यांच्याद्वारे केल्या.